शनिवार । १५ ऑगस्ट १९८१ । एक रुपया

साप्ताहिक

माणूस

# खऱ्या इतिहासाकडे....

श्री. ग. मा.

(१) भारतीय भांडवलदारांना ब्रिटिश भांडवलदारांच्या पकडीतून मुक्त व्हावे असे जेव्हा वाटू लागले तेव्हा भारताचे स्वातंत्र्य जवळ आले अशी भारतीय स्वातंत्र्याची एक मार्क्सवादी उपपत्ती आहे.

(२) दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहती सांभाळणे इंग्रजांना व परवडणारे होते. त्यामुळे भारताला स्वातंत्र्य देण्याशिवाय ब्रिटनला पर्यायच नव्हता असा मानवेन्द्रनाथ रॉय यांचा निर्वसाहतीकरणाचा (Decolonisation) सिद्धान्त होता. या सिद्धान्ताप्रमाणे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले असे रॉयवादी मानतात.

(३) नाविकांचे बंड, रासबिहारी बसू–सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेचे 'चलो दिल्ली', देशांतर्गत ४२ चा भूमिगत सशस्त्र–निःशस्त्र उठाव आणि युद्धोत्तर जागतिक परिस्थिती याचा परिपाक म्हणजे भारताचे स्वातंत्र्य, असा, आपल्या १८५७ पासून सुरू असलेल्या स्वातंत्र्ययुद्धाचा पट, सावरकरांनी आपल्या अभिनव भारत सांगता समारंभानिमित्त, १९५२ मध्ये पुण्यात केलेल्या तीन भाषणातून विस्तृतपणे मांडला आहे.

(४) अहिंसेने भारताला स्वातंत्र्य मिळाले अशी गांधीवाद्यांची धारणा आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या या चार उपपत्ती आहेत. पहिली अती आर्थिक व चौथी अती नैतिक आहे. दुसरी व विशेषतः तिसरी अलिकडे मान्यता पावू लागलेली आहे. अहिंसेने स्वराज्य मिळाले हा कालपरवापर्यंतचा प्रचार आता बराच कमी झालेला आहे. उलट म. गांधींच्या काँग्रेसचा वारसा चालवू म्हणणारे अरस किंवा शरद पवारच शहीद भगतसिंगांच्या नावाने उभारलेल्या मंडपात आपली अधिवेशने-मेळावे भरवताना दिसतात व जी काही २०४ हुतात्मा स्मारके महाराष्ट्रात यापुढे गावोगाव उभी राहणार आहेत, त्यापैकी बहुसंख्य स्मारके, भूमिगत किंवा सशस्त्र-निःशस्त्र उठावाच्या प्रयत्नात ज्यांचे बलिदान झाले, अशा स्वातंत्र्यसैनिकांचीच आहेत. मुंबईच्या क्रांतीमैदानावर ९ ऑगस्टला झालेल्या हुतात्मा स्मारक कार्यक्रमाच्या मुख्य उद्‌घाटन सोहोळ्याला, एखादा शुद्ध गांधीवादी न बोलावला जाता सशस्त्र क्रांतीवादी शिवराम हरी राजगुरु यांचे बंधू दिनकर हरी राजगुरु यांना हा बहुमान दिला जातो, यावरूनच गेल्या पाच-दहा वर्षात लोकमत व त्याचबरोबर सरकारी मत कसे बदलत चालले आहे हे ध्यानात येते. इतिहासच तसा घडला आहे त्याला सरकार, अगदी ते कितीही गांधीभक्त असले तरी काय करू शकणार ? स्वातंत्र्यलढ्याचे, शेवटच्या वीस-पंचवीस वर्षातले नेतृत्व निर्विवादपणे गांधीजींकडे होते. पण अहिंसा किंवा सत्याग्रह या गांधीमार्गांवर गांधीजींच्या अनुयायांचाच विश्वास उरलेला नव्हता. बहुसंख्य काँग्रेसजन भूमिगत, सशस्त्र उठावाच्या मार्गाकडे वळलेले होते. गांधीजींचा आत्मक्लेशाचा मार्ग त्यांनी सोडून दिलेला होता. शत्रूला अधिकाधिक क्लेश देण्याच्या सावरकरी किंवा सशस्त्र क्रांतीवाद्यांच्या मार्गावर बहुसंख्य काँग्रेसजन दाखल झालेले होते. कै. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांच्या गांधीनिष्ठेबद्दल कोण शंका घेऊ शकेल ? पण खुद्द अण्णासाहेबच भूमिगत होते व गुप्त हालचाली वगैरे करत असतानाच शेवटी ते पकडले गेले, ही वस्तुस्थिती आहे. त्यावेळच्या थोरथोर काँग्रेसनेत्यांनी सुभाषचंद्रांना जपानचे हस्तक म्हणून हिणवले व सुभाषांची आझाद हिंद सेना भारताच्या सीमेवर आली तर आपण तिच्याशी लढू अशा घोषणा केल्या. आता जयप्रकाश, लोहिया ही मंडळी गुप्तपणे सुभाषबाबूंशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत होती अशी माहिती उजेडात येत आहे. (पहा-केसरी दि. ९ ऑगस्ट १९८१, श्रीपाद केळकर यांचा लेख) 'शेवटी निःशस्त्रवादी काँग्रेसच काही काळ सशस्त्र क्रांतीवाद्यांची मठी बनली,' असे या काळाला अनुलक्षून सावरकरांनी म्हटले आहे. सावरकरांनी सैनिकीकरणाची मोहिम हाती घेतली म्हणून त्यांना 'रिक्रुटवीर' म्हणणारे हेच काँग्रेसजन! पण याच मोहिमेतून सुभाषचंद्रांच्या आझाद हिंद सेनेला बळ लाभत होते हे कसे विसरता येईल ? खुद्द सुभाषचंद्रांनीच सिंगापूर येथील 'आझाद हिंद' नभोवाणीवरून केलेले एक भाषणच आज उपलब्ध आहे. आझाद हिंद सेनेचे सरसेनापती या नात्याने केलेल्या या भाषणात सुभाषचंद्र म्हणतातः 'When due to misguided political whims and lack of vision almost all the leaders of Congress party have been decrying all the soldiers of the Indian Army as mercenaries, it is heartening to know that Veer Savarkar is fearlessly

मलपृष्ठ २ वर →

मुंबई वार्ता

# समृद्ध जीवनानुभव–रंगरेषांमधून....

मुंबईतल्या पावसाळ्यातले काही सुखद क्षण असतात धो–धो पावसात निथळणारा जहांगीर आर्ट गॅलरीचा परिसर हे तसंच एक दृश्य. संध्याकाळचो दिवेलागणीची वेळ नुकत्याच पडून गेलेल्या पावसाच्या आकाशातल्या खुणा. डोळयाना सुखावणारी आणि काळोखात झपाट्यानं विरत चाललेली हिरवी झाडी. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमचा सौम्यपणे चकाकणारा चंदेरी घुमट. समोरचं ज्ञानवृद्ध एल्फिन्स्टन कॉलेज आणि डेविड ससून लायब्ररी आणि त्या दोहोंच्या समोर असलेली टुमदार जहांगीर आर्ट गॅलरी गॅलरीत आणि गॅलरीबाहेर दोन्ही ठिकाणी रंगात आलेला एखादा मॉन्सून आर्ट शो !

तीस वर्षांपूर्वी जहांगीर आर्ट गॅलरी अस्तित्वात आली. त्यापूर्वीची, म्हणजे १९४०–५० च्या सुमाराची गोष्ट. मुंबईतल्या तेव्हाच्या कलाविश्वातली सर्वात महत्त्वाची वार्षिक घटना म्हणजे बॉम्बे आर्ट सोसायटीचं वार्षिक प्रदर्शन पलीकडच्या टाउन हॉलमध्ये नेव्हल बँडच्या गंभीर सुराच्या पार्श्वभूमीवर हे प्रदर्शन भरायचं. आता खरं म्हणजे मी हे प्रदर्शन पाहिलेलं किंवा अनुभवलेलं नाही ! पण आजचे जहांगीर आर्ट गॅलरीचे जुने कलाकार ज्या नोस्टाल्जियानं या प्रदर्शनांबद्दल बोलतात त्यातून त्यांचं संपूर्ण चित्र अगदी त्याच्या वलयां सकट डोळ्यासमोर उभं रहातं प्रदर्शनाला आलेले कलाकार, कलाप्रेमी आणि बाकीच्या हायब्रो मंडळीच्या उपस्थितीनं रंगीबेरंगी झालेलं वातावरण त्याद्वारे आपल्यालाही अनुभवता येतं.

कलाजगताचं आणखी एक केन्द्र म्हणजे नेपियन सी रोडवरचं डॉ. लँगहॅमरचं घर. ऑस्ट्रियन राष्ट्रीयत्व असलेले डॉ. लँगहॅमर आपल्या नाझीविरोधी विचारसरणीमुळे आपल्याच देशाला पारखे झाले होते. मुंबईत येऊन इथं नव्यानं उदयाला येणाऱ्या, आकार घेऊ पहाणाऱ्या कलात्मक घडामोडीचा ते केन्द्रबिंदु झाले कित्येक कलाकारांच्या कुंचल्याना त्याच्याकडून वळण लागलं. लँगहॅमरच्याच खटपटीतून बॉम्बे आर्ट सोसायटीनं रॅम्पार्ट रोला एक छोटंसं 'आर्टिस्टस् सेन्टर' उभारलं. (त्याचं हल्लीचं लोकप्रिय नाव म्हणजे चित्रकार आरांचा अड्डा ! पुढे हे सेन्टरही तसं अपुरं पडू लागलं अशा एका आर्ट गॅलरीची आवश्यकता भासली की, जी प्रशस्त असेल, दोन चित्रांमध्ये जिथे योग्य तेवढी जागा सोडता येईल, चांगली प्रकाशयोजनाही असेल आणि शिवाय शहरातल्या एकूण आर्ट मुव्हमेंटपासून ती फारशी लांबही नसेल.

मग या प्रयत्नातून आर्टिस्टस् सेन्टरच्या जवळच जहांगीर आर्ट गॅलरी मूर्त स्वरूपात आली. यंदाच्या वर्षी या गॅलरीला तीस वर्षं पूर्ण झाली. इथल्या दोन प्रशस्त दालनात काही ना काही तरी चित्रप्रदर्शनं नेहमी भरलेली असतात. वरच्या मजल्यावरच्या केमोल्ड आर्ट गॅलरी आणि टॅरेस आर्ट गॅलरी मध्ये प्रस्थापित आणि मुरब्बी कलाकारांची हजेरी असते खालची दालनं नवोदितांना अल्प दरानं उपलब्ध असतात. याच्या जोडीला तळघरात जुन्या कलात्मक वस्तूंच्या विक्रीसाठी 'ॲंटीकार्टस' कलाविषयक पुस्तकांची एक समृद्ध लायब्ररी. गाजलेल्या आणि दुर्मिळ चित्राच्या मूळ प्रतीची एक लायब्ररीही पहिल्या मजल्यावर आहे. पुष्कळशा गाजलेल्या चित्राची मुद्रणं गॅलरीनं अगदी अल्प किंमतीत विकायला ठेवली आहेत. हा एक अभिनव उपक्रम गॅलरीचा अविभाज्य भाग असलेलं छोटंसं सामोवर रेस्टॉरंट म्हणजे कलाकाराची सतत चाललेली मैफल. एके काळी रोज सकाळी इथेच बसून टाइम्सचे संपादक शामलाल आणि व्यंगचित्रकार लक्ष्मण रोजच्या व्यंगचित्राची चर्चा करत असत !

जहांगीर आर्ट गॅलरीचा यंदाचा खरा मोसम मात्र अजून सुरू व्हायचा आहे. एखादं राजस्थानी कलावस्तूंचं प्रदर्शन, नाही तर सोविएट मुलांच्या चित्राचं प्रदर्शन याहून चित्रात अधिक रंग भरलेला नाही साधारण उन्हाळा, पावसाळ्याची सुरवात म्हणजे गॅलरीतला तसा 'स्लॅक सीझन !' कारण चित्राचे रसिक आश्रयदाते आणि चित्रं खरेदी करणारे प्रेक्षक बहुधा मुंबईबाहेर थंड हवेच्या ठिकाणी गेलेले असतात सप्टेंबर-ऑक्टोबरच्या सुमाराला गॅलरीला परत नवी टवटवी येते


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : अकरावा

१५ ऑगस्ट १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

पण हा सारा खटाटोप कशासाठी ? कलाकारांना उत्तेजन मिळावं हे तर आहेच; पण लोकामध्ये चित्रकलेची आवड निर्माण झाली पाहिजे, अभिरुचि वाढली पाहिजे हाही यामागचा उद्देश आहे. जहांगीर आर्ट गॅलरीत सध्या दररोज सुमारे २५०० प्रेक्षक येऊन जातात; पण गॅलरीची सोयिस्कर जागा, तिथल्या चित्राचा दर्जा, एकूण मुंबईची लोकसंख्या आणि त्यातही रसिकांचं संख्यात्मक प्रमाण या साऱ्या गोष्टी लक्षात घेतल्या तर २५०० हा आकडा काहीच नव्हे! ऑफिस संपल्यावर धावपळ करीत व्ही. टी. नाही तर चर्चगेट गाठणारी कितीशी पावलं 'जहांगीर'च्या पायऱ्याकडे वळतात ? पावलं सोडा, निदान माना तरी ? कलाकार, रसिक, समीक्षक आणि कलाप्रेमी यांचं हे वर्तुळ आत्मसंतुष्टपणे आपल्या–आपल्यातच आवर्तनं घेत रहातं बाहेरचं कुणी त्या वर्तुळात पोचतच नाही. याचं कारण काय ? चित्राची दुर्बोधता ? प्रेक्षकाची अनभिज्ञता ? कलाकाराचा अलिप्तपणा ? की एकूण अभिरुचीचाच अभाव ?

या साऱ्या संदर्भात प्रत्यक्ष चित्रकाराचं म्हणणं काय असतं, हे जाणून घ्यावं म्हणून मी श्री. प्रभाकर बर्वे याना भेटायचं ठरवलं. प्रभाकर बर्वे तरुण वयातच मानसन्मान आणि मान्यताही मिळवलेले जानेमाने चित्रकार आहेत. समीक्षक, कलाकार आणि रसिकांच्या वर्तुळात त्यांच्याबद्दल आदर आहे. त्यांच्या शब्दाला वजन आहे. त्यांच्या पेंटिंग्जमध्ये ते याहूनही अधिक उंची गाठतील अशा सुखद आशा–अपेक्षाही आहेत.

'खरं म्हणजे चित्रकलेला रसिकाकडून सापत्न भावानं वागणूक मिळते. अगदी अव्वल दर्जाच्या चित्रकारांची साधी नावंसुद्धा सर्वसामान्य लोकांना माहीत नसतात, मग त्यांच्या कलेची माहिती आणि कलेचा आस्वाद तर दूरच राहिला ! माझा प्रांत चित्रकलेचा. तरी किती तरी लेखक–कवीविषयी आणि अन्य कलाकाराविषयी मी बोलू शकेन. मला दिलीप चित्र्यांची कविता कळते. कुमार गंधर्व किंवा किशोरी अमोणकराच्या गाण्यातलं मर्म ओळखता येतं; पण यातल्या किती कलाकाराना हेब्बर आणि हुसेनच्या पेंटिंग्जविषयी असं म्हणता येईल ? लोकाची चित्रकलाविषयक जाण ही कॅलेंडरवरच्या चित्रांपर्यंत धावते आणि तिथेच संपते. रविवर्मा हा एक श्रेष्ठ चित्रकार होता इथच चित्रकलाविषयक ज्ञान थांबलेलं आणि प्लास्टरची गुलाबी, नाही तर निळघा रंगाची शंकर किंवा कृष्णाची मूर्ती घरात लावणं ही चित्रकलेच्या अभिरुचीची परमावधी ! चित्रकलेविषयी ही अनास्था का ?'

यावर माझा प्रश्न सरळच होता. एक तर आधुनिक चित्रकला किंवा मॉडर्न आर्ट समजणं जरा कठीणच. खरं म्हणजे जिला आपण मॉडर्न आर्ट म्हणतो, ती आता 'मॉडर्न' राहिलेली नाही ! साधारण दुसऱ्या महायुद्धाच्या काळात निर्माण झालेली ही मॉडर्न आर्ट, आता चाळीस-पन्नाशीची प्रौढा झाली आहे ! पण हा मुद्दा निराळा. सामान्य माणसालाही नवचित्रकला अनेकानेक इझम्सच्या धुक्यातच हरवलेली वाटते हा खरा मुद्दा आहे. रंग–आकारांच्या या आकृतीबंधातून चित्राचा अर्थ नेमका कोणता ? इथे बहुधा माणसं अडखळत असावीत.

'पण प्रत्येक चित्राच्या सुरुवातीलाच त्याच्यावर अर्थ लादणं या कल्पनेलाच मुळी माझा विरोध आहे !' –बर्वे म्हणाले. चित्रकला ही मुख्यत: रंग आणि आकारांची कला आहे. तेव्हा ते रंग आणि आकार, त्याची तरलता यांचा आस्वाद घ्यायला हवा. चित्रातला अमुक एक आकार म्हणजे 'हा चंद्र' किंवा 'हे फूल' असं त्यावर लेबल लावून टाकू नका. त्याआधी त्या आकाराचं त्याच्या चौकटीतल्या अवकाशाशी असलेलं नातं लक्षात घ्यायला हवं त्यातच त्या आकाराची–त्या चित्राची मेख असते. निसर्गातल्या झाडाच्या, फुलांच्या, इतकंच काय पण दगड-धोंडघाच्या आणि पडक्या भिंतीच्या आकाराचे बंध जाणून घ्यायला हवेत. आकाशाच्या, मातीच्या रंगांच्या छटा तपशीलवार पहायला हव्यात. 'निळा रंग' 'हिरवा रंग' एवढचा एकाच शब्दात त्याची वासलात लावू नका! चित्राचा अर्थ या त्याच्या आकृतीबंधातच असतो. चित्रकाराची धडपड असते ती मनात उतरलेल्या या प्रतिमांना साकार करायची. प्रत्यक्ष रंगरेषा रेखताना हे आकार आपोआप घडत जातात, हातातून उतरत जातात आणि मी त्याना तसंच उतरू देतो. हे असंच का आलं आणि ते कुठं चुकलं, हे सारं प्रतिभा सांगते चित्रात हवा तो नेमकेपणा आला आहे की नाही ते–इंटयुइशननं–प्रतिभा-ज्ञानानंच कळतं आणि चित्र समजून घ्यायला, त्याचा आस्वाद घ्यायलाही अंतर्ज्ञानच लागतं. दृश्य स्वरूपातली माया आणि त्यामागचं सत्य, म्हणजेच त्या प्रतिमा आणि त्यामागे असलेला आशय याचा अनुभव मला एकाच क्षणी होतो. चित्राचा आशय आणि अभिव्यक्ती या एकात एक गुंफलेल्या असतात. अनुभवाच्या या अभिव्यक्तीत नेमका अर्थ कुठे आहे ते स्पष्ट शब्दात लिहून का ठेवायला हवं ? तसं मांडलं तर कदाचित ते चित्र मग चित्र रहाणारही नाही. कदाचित त्याची कविताही होईल !

'आता उदाहरणादाखल माझं हेच पेंटिंग पहा ना– 'दि अदर शोअर.' राखाडी पार्श्वभूमी. चित्राच्या उजव्या कोपऱ्यात 'डल' वाटणाऱ्या तपकिरी रंगातलं पक्ष्याचं डोकं. त्याच्यावर थोडं डावीकडे फुलपाखराचा रंगीबेरंगी पंख. त्याच्या थोडं वर एक काळी सावली. मग एक अर्धवट भिंत आणि भिंतीपलीकडे दिसणारा स्त्रीचा अर्धवट चेहरा. आता चित्र पहाताना यातली पहिली पायरी म्हणजे अर्थातच चित्राच्या बाह्य स्वरूपाचा आस्वाद घेण्याची. निरनिराळे आकार त्यांचं चित्राशी नातं. निरनिराळे रंग, त्यांची मांडणी. पक्ष्याचा भरड रंग, त्याची तीक्ष्ण चोच बटबटीत डोळा. फुलपाखराच्या पंखाचे तरल रंग, भिंतीपलीकडच्या चेहऱ्याचा रेखीवपणा. शांततेचा भाव ही मांडणी अशीच का ? या प्रतीकांमागच्या प्रेरणा कोणत्या ? तपकिरी रंगाच पक्षी म्हणजे निब्बर व्यवहार. फुल-


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# अपूर्व होऔ शब्दशिल्प...



'नारायण', 'अंतूबर्वा','रावसाहेब', 'हरितात्या', ही पुलंनी लिहिलेली व्यक्तिचित्रं म्हणजे मराठी साहित्यातील शब्दशिल्पंच! पुलंच्या मिस्किल आणि गहिऱ्या नजरेतून चितारलेल्या व्यक्तिचित्रांनी मराठी मनात कायमचं घर करून ठेवलं आहे. नकळत डोळयांच्या कडा भिजवून टाकणाऱ्या या व्यक्ती आणि वल्लींशी एक अतूट नातं निर्माण झालंय. प्रत्येकाच्या मनात त्या घर करुन राहिल्यायत.
पुलंच्या मार्मिक आणि सहजसुंदर विनोदांनी सर्व महाराष्ट्राला मनमोकळं हसायला शिकवलं.

सभ्यतेची मर्यादा किंचितही न ओलांडता पुलंचा विनोद अगदी निःसंकोचपणे घराघरात गेलाय. विनोदाची कितीही पारायणं झाली तरी प्रत्येक वेळेस ती विनोदस्थळं ताजी वाटतात, पुन्हा नव्यानं हसायला लावतात. निवडक पुलंच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाची आणखी एक भेट—पुलंची काही व्यक्तिचित्रं अन् लेख प्रत्यक्ष त्यांच्याच आवाजात—आता पुल म्हटल्यावर हे वाचन साभिनय असणारच! हे सर्व आता कॅसेटमध्ये उपलब्ध.

**अलूरकर म्युझिक हाउस**

४, स्वप्ननगरी, कर्वे रोड, पुणे ४११००४ फोन ३०६६२

PROGRAF

**प्रसिद्धी सप्टेंबरमध्ये. आगाऊ नोंदणी १ ऑगस्ट ते २० ऑगस्ट १९८१**

पाखराचा पंख म्हणजे नाजूक भावना, स्वच्छंदीपणा, पण हे दोन्ही या लौकिकातलं, भिंतीच्या पलीकडे जो चेहरा दिसतो तो दुसऱ्या तीरावरचा. त्या चेहऱ्यावर आहे नितांत, अंतिम शांतता. तो कदाचित देवदूताचाही असेल. या दोन तीरामध्ये जी सावली आहे, ती एका अदृश्य पर्वताची. हा पर्वत चित्रात नाही. कदाचित तो अस्तित्वातच नसावा. सावलीची माया आपण मानलेली आणि ही सारी आकृत्याची मांडणी वर्तुळसदृश आहे. मानवी मनाचे फेरेही असेच असतात. रुक्ष व्यवहार, सौंदर्य, पारलौकिकातल्या शांततेची आस, मग फिरून एकदा व्यवहार–अशा काहीशा चक्रमेनिक्रमातून मानवी आयुष्य फिरत रहातं. चित्रातल्या प्रतिमांचा हा मला अभिप्रेत अर्थ झाला. अशा अनेक अर्थांच्या शक्यता असणं ही चित्राच्या समृद्धपणाची, यशाची एक खूण आहे.

'हे आणखीन एक चित्र पहा. एक शाळेसारखी दिसणारी बैठी इमारत. त्यावर लटकावलेली पोस्टाची पेटी. ती एक ठळक खूण आणि ती इमारत बघत पाठ करून बसलेलं एक काळं मांजर. उभे राहिलेले दोन मोठे कान आणि लांबलचक पसरलेली त्याची शेपूट एवढे दोनच काय ते तपशील; बाकी सारी नुसती पाठच पाठ!'

'या चित्राचा अर्थ?'

'थावा अर्थ नाही, या चित्राला 'मूड,' आहे. नोस्टाल्जियाचा किंवा स्मरणरमणीयतेचा! हे माझ्या नागावच्या शाळेचं पेंटिंग. एका उत्कट आणि परिचित अनुभवाचं प्रकटीकरण. ही मांजर माझ्या ऑफिसमधून चित्रात शिरली. मी ही शाळा परत जाऊन, पाहिली तर ती अशी नव्हतीच मुळी! पण माझ्या स्मरणातली स्मरणरमणीयतेमधली शाळा ही अशी होती आणि तिचं हे चित्र आहे!

'ते पलीकडचं चित्र पहा. अजून ते अपूर्ण आहे, कारण ते प्रोसेसमध्ये आहे. सत्य आणि माया ही अस्तित्वाची दोन वेगळी रूपं मानली जातात; पण मायेमधलंही सत्य दाखवणार अस या चित्राच एक स्वतःचं असं लॉजिक आहे. चित्राच्या वरच्या भागातल्या एका इमारतीचं प्रतिबिंब तिच्यापासून खूप दूर पडल आहे व जुना एक फुटका घडा आणि त्यातून बाहेर पडून साचून राहिलेलं पाणी. घड्यावर रंगवलेला मासा. वरच्या बाजूला अर्धच चक्र. ते अशोक चक्र असेल, बैलगाडीचे चाक असेल, नाही तर कुंभाराचं चाकही असेल. या प्रतिमामध्ये आणि त्यांच्या या आकृतीबंधामध्ये अर्थाच्या किती तरी शक्यता आहेत. कवितेसारख्या तुम्ही लावत जाल, तसा चित्राचा अर्थ उलगडत जाईल.'

बर्व्यांसारख्या चित्रकाराला तर शब्दापेक्षाही रंगाची भाषा अधिक अर्थपूर्ण आणि जवळची वाटते चित्राच्या या जगात शब्दजंजाळापेक्षा कमी क्लिष्टीकरण असतं! मात्र चित्रात काय म्हटलं आहे ते बघणाऱ्यानं शांतपणे 'पेशंटली' पाहिलं पाहिजे. ज्ञानेश्वरी किंवा विंदा करंदीकरानी केलेलं तिचं आधुनिकीकरण वाचताना तुम्ही परत परत थांबता. एकेका ओवीचा अर्थ प्रयत्नपूर्वक समजून घेता. मग चित्राबद्दल असाच विचार का नाही?

कधीकधी अभिरुचिसंपन्न मनावरसुद्धा हिन्दी चित्रपटांनी कोळिष्टक पसरतं. हे चित्रपट तंत्रदृष्ट्या प्रगत आहेत. ते चांगली व्हिज्युअल्स मांडतात. पण तंत्राच्या अंगानं येणारा आश्रय मात्र इतका भिकार असतो की, सारी चित्रकलाच त्यामुळं खालच्या पातळीवर येते.

आपली सारी शिक्षणपद्धतीच अशी आहे की, इथे चित्रकलेला फारसं महत्त्व नाही. शिक्षण भाषेच्या जंजाळात अडकलं आहे. रंग आणि आकारसुद्धा कम्युनिकेशनची माध्यमं असतात. हे मुळी कधी सांगितलंच जात नाही. परिणामी, कलाकार आणि समाज यांच्यात दरी निर्माण होते. कलाकाराची कला हस्तिदंती मनोऱ्यात वाढते, तकलादू होते. समाजाचीही काही कमी हानी होत नाही. चित्रकलेचं हे मर्म जाणून घेतलं तर एक विशाल दालन खुलं होईल. निसर्गानं आणि माणसानं स्वत:देखील सौंदर्याचे, कलेचे, ज्ञानाचे एवढे अप्रतिम नमुने तयार केले आहेत; पण डोळे मिटून त्यांच्याकडे पाठ फिरवायची म्हटली तर स्वतः होऊन एक समृद्ध जीवनानुभव नाकारला जाईल आणि याहून अधिक दुर्दैवी ते काय असणार?

—ललिता बर्वे

# ऊर्जा समस्या

## नैरोबीची परिषद

वा. दा. रानडे

जगापुढील ऊर्जा समस्येचा विचार करून काही कार्यक्रम आखण्याच्या उद्देशाने नैरोबी येथे संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे एक परिषद १० ऑगस्टला सुरू झाली असून ती २१ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी परिषदेला उपस्थित होत्या, एवढेच नव्हे तर त्यांनी तेथे महत्वाचे भाषण केले. जगातील व भारतातील ऊर्जेची गरज व निर्मिती यादृष्टीने आज काय परिस्थिती आहे आणि ऊर्जानिर्मिती वाढविण्यासाठी कोणत्या योजना हाती घेण्यासारख्या आहेत, इतर देशात कोणते प्रयोग केले जात आहेत, भारताला त्यांचा कितपत उपयोग होऊ शकेल या दृष्टीने नैरोबी परिषदेतील चर्चा उपयुक्त ठरणार आहे.

ऊर्जा समस्या कमी-अधिक प्रमाणात जगातील सर्वच राष्ट्रांना जाणवत आहे आमच्याजवळ विपुल कोळसा साठे आहेत म्हणून समाधान मानण्यासारखी अमेरिका, रशिया व चीनचीही आज परिस्थिती नाही. जगातील उपलब्ध कोळसा साठ्यांपैकी ८० टक्के या देशामध्ये आहेत, पण काही वर्षांनी हे साठे कमी होणार हे लक्षात घेऊन पर्यायी उर्जेचे उत्पादनवाढीचा कार्यक्रम त्यांनाही हाती घेणे भाग पडत आहे. 'क्लब ऑफ रोम' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शास्त्रज्ञांच्या एका गटाने काही वर्षांपूर्वी मानव जातीच्या भवितव्यासंबंधी निराशाजनक अहवाल प्रसिद्ध केला होता. पृथ्वीवरील नैसर्गिक साधन संपत्तीचे साठे झपाट्याने संपुष्टात येऊ लागले आहेत. तेल २० वर्षांपेक्षा अधिक काळ, तांबे १९ वर्षांपेक्षा अधिक काळ, पारा १२ वर्षांपेक्षा अधिक काळ पुरणार नाही. आणखी बरीच नैसर्गिक साधने जवळ जवळ संपत आली आहेत. इंधनतज्ञ्नी आणि पाण्याचे साठे फार मर्या-

दित आहेत. सध्यापेक्षा दुप्पट किंवा तिप्पट नवे साठे आपण शोधून काढले, शेती उत्पादन दुप्पट वाढविले, अणुशक्तीचा जास्त उपयोग केला तरी एकविसाव्या शतकाच्या पहिल्या काही दशकांत मानवजातीचा सामुदायिक विनाश होईल, असे या शास्त्रज्ञाचे भाकित होते. परिस्थिती एवढी निराशाजनक नाही. सागर तळाशी अजून खनिज तेलाचे विपुल साठे आहेत. याकडे दुसऱ्या काही शास्त्रज्ञांनी लक्ष वेधले होते. ते काही असो, ऊर्जा निर्मितीची नवी पर्यायी साधने शोधायला हवीत, याची जाणीव विकसित राष्ट्रांना या निष्कर्षांमुळे झाली. १९७३–७४ मध्ये तेल उत्पादक अरब राष्ट्रांनी तेलाच्या किंमती वाढविल्या, त्यामुळे पर्यायी इंधन निर्मितीच्या प्रयत्नांना आणखी गती मिळाली.

नैरोबीच्या परिषदेत मुख्यत: पर्यायी इंधन निर्मितीच्या योजनांचाच विचार व्हावयाचा असून सौर शक्ती, सागराच्या लाटांपासून वीज, वाऱ्यापासून वीज किती प्रमाणात निर्माण करणे शक्य आहे यासंबंधी तज्ञांचे निष्कर्ष सादर केले जावयाचे आहेत. जगातील तेल साठ्यांपैकी ३० टक्के तेल पश्चिम आशियातील अरब राष्ट्रांमध्ये आहे. त्यापैकी एक दशांशापेक्षा अधिक तेल आतापर्यंत वापरले गेले आहे. रशियाजवळ २५ टक्के तेलसाठा आहे. त्यापैकीही एक बाराशांपेक्षा अधिक भाग आतापर्यंत वापरला गेला आहे. अमेरिकेत व आफ्रिकेत प्रत्येकी दहा टक्के तेलसाठा आहे. त्यापैकी अमेरिकेतला निम्म्यापेक्षा अधिक साठा यापूर्वीच वापरला गेला आहे. दक्षिण अमेरिकेत आठ टक्के तेलसाठा असून त्यापैकी दोन पंचमांश वापरला गेलेला आहे, अमेरिकेत तेल-उत्पादनाची कमाल मर्यादा १९७० मध्येच गाठली गेली आणि त्यानंतर दरवर्षी तेथील तेल-उत्पादनात घट होत आहे. 'वर्ल्डवॉच इन्स्टिटयूट'ने प्रसिद्ध केलेल्या डेनिस हेस यांच्या 'रेज ऑफ होप' या पुस्तकात ही माहिती दिलेली आहे.

अणुशक्तीने उर्जेचा प्रश्न कायमचा सुटेल; मुबलक वीज निर्माण करता येईल अशा आशा सुरवातीला व्यक्त करण्यात आल्या होत्या. पण या साधनाच्या मर्यादा आता स्पष्ट झाल्या आहेत. अणुशक्ति निर्मितीच्या प्रक्रियेत जे द्रव्य किंवा घटक वाया जातात त्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न समाधानकारकपणे सोडविणे शास्त्रज्ञांना अजून शक्य झालेले नाही. अणुभट्ट्यासाठी अमेरिकेकडे १९७३ मध्ये ३६ मागण्या आलेल्या होत्या त्यानंतर १९७४ मध्ये २७, १९७५ मध्ये ४, आणि १९७६–७७ मध्ये अवघी एक याप्रमाणे अणुभट्ट्याच्या मागणीत घट झाली.

अणुशक्तीकडून आता सौरशक्तीकडे वळायला हवे, हा विचार त्यातूनच पुढे आला. उष्ण कटिबंधातील देशांना तर सौरशक्तीचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग करता येईल. वर उल्लेख केलेले डेविस हेग यानी सूर्यशक्तीच्या उपयोगाबाबत, 'एनर्जी : द सोलर प्रॉस्पेक्टस्' हे पुस्तक लिहिलेले असून सौरशक्तीपासून मुबलक ऊर्जा मिळू शकेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. तंत्रज्ञान आणि पुरेसे भांडवल उपलब्ध होऊ शकले तर आणखी वीस वर्षांत उष्णकटिबंधातील देश आपल्याला लागणाऱ्या ऊर्जेपैकी ४० टक्के ऊर्जा सूर्यशक्तीपासून मिळवू शकतील. सूर्यशक्तीच्या बाबतीत एक फायदा असा की, अणुशक्तीप्रमाणे वाया घटकद्रव्याचा प्रश्न तेथे उपस्थित होत नाही, प्रदूषणाचाही प्रश्न नाही ! अमेरिका, जपान, फ्रान्स या देशांनी सूर्यशक्तीच्या वापराचे बाबतीत बरीच प्रगती केलेली आहे. भारतानेही या शक्तीचे महत्त्व व उपयुक्तता ओळखून या क्षेत्रात प्रगती करायला सुरुवात केली आहे. 'सोलर सेल्स'च्या संशोधनात भारत विकसनशील देशामध्ये आघाडीवर आहे. दिल्लीजवळ सेंट्रल इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड हा सार्वजनिक क्षेत्रातील कारखाना सोलर सेल्सच्या उत्पादनासाठी उभारण्यात येत आहे. यावर्षी तेथे ४० ते ५० किलोवॉट सेल्स तयार होतील आणि १९८४ पर्यंत त्याने पूर्ण उत्पादनक्षमता गाठल्यावर तेथे एक मेगॅवॉट सेल्सच उत्पादन होऊ लागेल. सूर्यशक्तीपासून मिळणाऱ्या विजेने लडाखमधील एका खेड्यातील सबंध विजेची गरज भागविली जाते. ग्रामीण भागात वीज पुरवठा करण्यासाठी सूर्यशक्तीचा कसा वापर करता येईल याची यावरून कल्पना येईल.

भारतातील चाळीस केंद्रामध्ये आज पर्यायी इंधनाबाबत प्रयोग व संशोधन चालू आहे. ज्या उद्योगात कमी व मध्यम उष्णतेची गरज असते तेथे सूर्यशक्तीचा वापर करून तेलाच्या वापरात २५ टक्के व कोळशाच्या वापरात ४० टक्के बचत करता येईल. यामुळे दरवर्षी ५ ते ६ कोट टन कोळशाची बचत होईल असा विज्ञान व तंत्रशास्त्र खात्यातील वरिष्ठ सल्लागार श्री. महेश्वर दयाळ यांचा अंदाज आहे.

गोबर गॅसचाही भारतच्या ग्रामीण भागात पर्यायी इंधन म्हणून उपयोग करण्यास भरपूर वाव आहे. गाईच्या शेणापासूनच कुटुंबाची गरज भागविणारे १ कोटी ८० लाख छोटे गॅस प्लँट आणि समूहाची गरज भागविणारे मोठे ६ लाख ६० हजार गॅस प्लँट उभारता येतील, असा नियोजनमंडळाचे माजी सचिव टी. एल. शेखर यांचा अंदाज आहे. सहाव्या योजनेत दहा लाख छोटे कौटुंबिक गॅस प्लँट उभारण्यासाठी पन्नास कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गोबर गॅस निर्मितीस एवढा मोठा वाव असताना, प्रत्यक्ष निर्मिती व वापर मात्र फार कमी आहे. सध्या देशात ७५,००० गोबर गॅस किंवा बायो गॅस प्लँटस् चालू आहेत. त्यांच्या वाढीचा पद्धतशीर कार्यक्रम हाती घ्यावयास हवा.

समुद्राच्या लाटांपासून वीज निर्माण करण्याचे प्रयत्न कच्छच्या आखातात व मद्रास किनाऱ्यावर चालू आहेत. नद्यांवर मोठी धरणे बांधून जलविद्युत् निर्मितीपेक्षा छोट्या जलविद्युत् योजना हाती घेण्याचे दृष्टीने प्रयोग चालू आहेत. सतत वाहणाऱ्या झऱ्यांपासून एक किलोवॉट वीज निर्माण करता येईल व त्यावर छोट्या खेड्याच्या गरजा भागतील. खडकी विद्यापीठाच्या इंजिनिअर्सनी पाच किलोवॉट जलविद्युत् निर्माण करणाऱ्या छोट्या केंद्राची योजना तयार केली असून ते उभारण्यासाठी फक्त तीस हजार रुपये खर्च येईल.

पर्यायी ऊर्जानिर्मिती वाढविण्यासाठी अशाच तऱ्हेने अधिक योजनाबद्ध कार्यक्रम हाती घ्यावयास हवा.

☐

## उत्तरमीमांसा : १८ :

स. शि. भावे

# पस्तिसाव्या स्वातंत्र्यदिनाचे सर्वभक्षक आव्हान

आज पंधरा ऑगस्ट. पस्तिसावा स्वातंत्र्य-दिन !

आपण स्वतंत्र होऊन चौतीस वर्षे पुरी झाली. पस्तिसाव्या वर्षाच्या उंबरठ्यावर उभे असताना, तुमच्या-आमच्यासारख्या सामान्य भारतीयाच्या मनात आज कोणती भावना आहे ? धन्यतेची ? समाधानाची ? आशावादी आत्मविश्वासाची ? की पराभूत झाल्याची ? फसवले गेल्याची ? अगतिक-तेची ? असहाय्यतेची ?

मला वाटते, हे कबूल केले पाहिजे की, आज आपल्यासारख्या कोट्यवधी भारतीयांच्या मनात निराशा आहे, असहायता आहे, अग-तिकता आहे. एखाद्याला वाऱ्यावर सोडून द्यावे तशी फसवले जात असल्याची भावना आहे.

सामान्य माणूस देशासाठी काहीच करत नाही का ? देशाकडून त्याने काही किमान अपेक्षा कराव्या एवढा अधिकार त्याला नाही का ?

'देशाने तुम्हाला काय द्यावे असा विचार करू नका, तर आपण देशाला काय देऊ लागतो, याचा विचार करा !', हे राष्ट्राध्यक्ष केनेडींचे आवाहन आजही अनेकांच्या ध्यानात असेल. हीच वृत्ती प्रत्येक नागरिकाने मनात बाळगावी असेच कोणी झाले तरी म्हणेल.

पण यातील 'प्रत्येक नागरिकानें' हा विचार महत्त्वाचा आहे. काळा पैसा बाळग-णारे, त्यांना वठणीवर आणू न शकणारे, सर्व पातळ्यांवरील मतदाराचा क्षुद्र आणि क्षुल्लक निमित्ताने घडोघडी विश्वासघात करणारे असे सारे उच्चपदस्थ जर ही वृत्ती बाळगीत नसतील तर तशी वृत्ती तू (च) बाळगली पाहिजेस असे केवळ सामान्य माणसाला कोणत्या तोडाने सागणार ?

सामान्यतः सर्वच सुविधांना सामान्य माणूस आज मुकतो आहे. उपजीविका हा तर कोणत्याही जीवाचा मूलभूत हक्क ! या उपजीविकेची शाश्वती आज पन्नास टक्के भारतीयांना नाही. वस्त्र आणि निवारा या नंतरच्या दोन गरजा ! येथे पूर्तता नाहीच, शाश्वतीही नाही ! चोर-दरोडेखोर यांच्या-पासून वैयक्तिक सुरक्षितता हवी. तीही हमी आजचे शासन देऊ शकत नाही. सुरक्षित संचार-प्रवास- त्याचीही हमी नाही !

म्हणजे जे कोणी शासनाचे नेतृत्व करतात त्याची, सुरक्षिततेची हमी देण्याची मनःपूर्वक इच्छा नाही, असे नाही; पण ते स्वतःच अगतिक झाले आहेत. संरक्षक दलाच्या संख्येत सतत वाढ होत आली आहे, त्यांच्या अधिकारात वाढ होत आली आहे, तरीही; जनतेला संरक्षकांचा विश्वास वाटत नाही. उलट त्यांच्यापासूनच भीती वाटते. संरक्षकां-नाही समाजविघातक शक्तींच्या आक्रमणाला तोंड देताना आत्मविश्वास राहिलेला नाही. संरक्षकदलांचा धाक कमी झाल्याचा विषण्ण करणारा अनुभव पोलीस-अधिकाऱ्यांना वारंवार येत आहे शासकांनाही संरक्षकदलांचा पूर्वीइतका भरंवसा राहिलेला नाही !

संरक्षकदल स्वत च केव्हा संपावर जाईल, केव्हा आंदोलन सुरू करील याचा भरंवसा राहिलेला नाही. पोलीसदल संपावर जाते तेव्हा सध्या राखीव दलाला बोलावतात. राखीव दलाचे आंदोलन सुरू झाले की सीमा-सुरक्षादलाला बोलावतात. सीमासुरक्षादलात शिस्त राखण्यासाठी लष्कर आणि समजा लष्करच उठले तर ?

आज लष्करी उठावाची शक्यता नाही, हे खरे आहे. नि:पक्षपाती कार्यक्षम पद्धतीच्या परंपरेत तयार झालेले संयमी सेनाधिकारी हे लष्करी संयमाला प्रमुखपणे कारणीभूत आहेत. राजकीय पक्षांनीही आजवर लष्करा-पासून योग्य अतर राखले आहे याची नोंद अभिनंदनपूर्वक घ्यायला हवी. मात्र, लष्कर व सीमासुरक्षादल सोडले तर इतर संरक्षक-दलांची विश्वसनीयता पूर्वीपेक्षा फार खाला-वली आहे, हे कोणासही कबूल होईल यात शंका दिसत नाही.

संरक्षकदलातील या ऱ्हासाचा येथे विशेष उल्लेख केला आहे. कारण अन्न-वस्त्र-निवारा हे कमी असेल आणि कायदा व सुव्यवस्था जारी असेल तरीदेखील सामान्य माणसांना जगायला एक भक्कम आधार असतो. हाही आधार जेव्हा उखडतो तेव्हा मग खरी असुरक्षिततेच्या कॅन्सरची स्थिती प्राप्त होते. शाळेत गेलेले मूल सायंकाळी नीट परतेल ना, ही काळजी आज प्रत्येक आईच्या मनाला दिवसभर पोखरीत असते. कसले हे नेतृत्व ? कसले हे शासन ? माझ्या मुलाच्या सुरक्षेची हमी हे मला देऊ शकत नाहीत,' असे जर या आईला वाटले तर ते किती स्वाभाविक म्हणावे लागेल !

□

येथे, हा पक्ष की तो पक्ष, हे नेतृत्व, की ते नेतृत्व असा फरक करता येत नाही ही स्थिती खरोखरी केविलवाणी आहे. कोणताही पक्ष असो, कोणतेही नेतृत्व असो, समाजघातक, दरोडेखोर शक्तीपुढे त्यांना आज अगतिकच व्हावे लागते आहे !

आज आपली समाजव्यवस्था, आपली अर्थव्यवस्था ताब्यात आहे तरी कुणाच्या ? तर स्मगलराच्या ताब्यात काळा पैसा उभा करून त्याचे साम्राज्य उभारणाऱ्या बड्या गुंडांच्या ताब्यात. सर्व कायदेकानू सहज बाजूला सारू शकणाऱ्या गुन्हेगाराच्या ताब्यात.

शासन, नोकरशाही, संरक्षकदले ही सारी या गुंडांनी आज ओलीस धरलेली आहेत. या गुन्हेगार जगाला आणि त्याच्या बलिष्ठ प्रमु-खांना जे हवे ते नाकारण्याची ताकद, नोकर-शाही व संरक्षकदले; यांच्या ठिकाणी नाही. त्यांना जे नको ते अमलात आणण्याची ताकद

या तीन क्षेत्रात नाही. ताकदच नाही असे नव्हे तर हिंमतही नाही. कारण या तीन क्षेत्रातील सध्याच्या प्रतिष्ठिताचे आसनच मुळी या गुन्हेगार–गुंडाच्या आश्रयावर अवलंबून आहे.

शासकांची निवडणूक या गुंड–गुन्हेगारांवरच अवलंबून असते. नोकरशाहीची शुभ्र परीटघडी सभ्यता याच्या स्नेहाळ नजरेवर अवलंबून असते. संरक्षकदलाचे तर त्यांच्या सहकार्याशिवाय चालतच नाही. गुंड-गुन्हेगाराची यंत्रणा हे परावलंबन चांगले जाणून असते. शासन, नोकरशाही व संरक्षकदले याचे अधिकाधिक आणि नवेनवे लाड करून या अवलंबनात ताजा ताजा मिंधेपणा सतत कसा मिसळत ठेवायचा याचे तंत्र या यंत्रणेला अवगत झालेले आहे. या यंत्रणेच्या अस्तित्वाची ती एक अटच असते.

आजचे शासकच नव्हेत, तर विरोधी पक्ष, त्याचे नेते, त्यांच्या संघटना, कामगारसंघटना यानाही ही गुन्हेगारयंत्रणा लाडावून परावलंबी बनवत असते. कारण हे संभाव्य भावी शासक असतात. शिवाय संघटना, मग ती कोणतीही असो, ही एक सामाजिक ताकद असते. ती स्वतःच्या ताब्यात असणे हे गुन्हेगारयंत्रणेच्या कार्यक्रमाचे अपरिहार्य अंग असते.

गंमत म्हणजे, पांढरा पैसा म्हणून आपण ज्याचा गौरव करतो आणि काळ्या पैश्यामुळे बिचारा पांढरा पैसा अडचणीत आला आहे, अशी सहानुभूती बाळगतो, तो पांढरा पैसा ह्या काळ्या पैशाच्या हातात हात घालूनच खरे म्हणजे वावरत असतो. काळ्या पैशाच्या आधारावरच पांढरा पैसा फोफावत असतो.

विषमतेमुळे क्रांती होऊ नये म्हणून कल्याणकारी राज्याची कल्पना आली. कल्याणकारी राज्य म्हटले की, अधिकाधिक सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रे शासनाच्या कक्षेत जातात. ' सार्वजनिक क्षेत्र ' निर्माण होते. यातून मुक्त भांडवलशाही अर्थरचनेवर जे वाढते नियंत्रण येते त्या नियंत्रणाला शह म्हणून काळा पैसा आलेला आहे.

काळा पैसा ही एक शासनाच्या नियंत्रणाबाहेरची अर्थव्यवस्था आहे. पांढऱ्या पैशाच्या अर्थव्यवस्थेवर शासनाचे नियंत्रण जसजसे वाढते (उदा. आयुर्विम्याचे आणि बँकांचे राष्ट्रीयीकरण, संपत्तीकर, सक्तीच्या ठेवीबद्दल वाढ इ.) तसतसा या नियंत्रणाचा जाच सुसह्य व्हावा म्हणून काळ्या अर्थव्यवस्थेचे क्षेत्र व तिचा प्रभाव वाढतो. परिणामी बाजारात वस्तूंचे भाव वाढतात. वस्तू अदृश्य होत असतात.

या अरिष्टावर उपाययोजना करावी अशी शासनाची मनापासून इच्छा असली तरी शासकाना ती करता येत नाही. एक तर, ज्याच्या मदतीने ही उपाययोजना करायची ती नोकरशाही आणि ते संरक्षकदल या काळ्या अर्थव्यवस्थेने आधीन करून घेतलेली असतात. दुसरे म्हणजे लोकशाहीत शासक बदलते असल्याने एकच धोरण किमान पाच वर्षे तरी अमलात येईल अशी शाश्वती नसते. तिसरे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शासक स्वतःच या काळ्या अर्थव्यवस्थेवर अवलंबून असतात. पक्षाची बांधणी, पक्षाचे निवडणुकीतील यश इत्यादींसाठी सारे इच्छुक राजकारणी या काळ्या अर्थव्यवस्थेवर केविलवाणेपणाने अवलंबून असतात. जे कोणी तसे अवलंबून राहणे नाकारतात त्यांना शासनापासून वंचित व्हावे लागते !

¤

आणखी असे की, ही काळी अर्थव्यवस्था केवळ एका देशात असते किंवा एका देशाच्या मर्यादेत काम करते, असे नाही. जिथे जिथे पूर्ण मुक्त किंवा अर्धमुक्त अर्थव्यवस्था आहेत अशा सर्व देशांच्या अर्थव्यवस्थामध्ये या काळ्या अर्थव्यवस्थेचा शिरकाव झालेला आहे. स्कॅंडिनेव्हियन राष्ट्रांमध्ये आहेत तशा बहुतांशी सहकारी तत्त्वांवर चाललेल्या, संपन्न आणि जवळजवळ स्वयंपूर्ण अर्थव्यवस्थामध्येही शिरकाव करण्याचा काळ्या अर्थव्यवस्थेचा प्रयत्न असतो. इतकेच नव्हे तर, प्रकटपणे कम्युनिस्ट अर्थव्यवस्था मिरवणाऱ्या देशांतही, स्थानिक शासकाना आपलेसे करून शिरकाव करण्याचे या काळ्या अर्थव्यवस्थेचे प्रयत्न चालू असतात.

फार प्रभावशाली अशी ही अनियंत्रित अर्थव्यवस्था आहे. जुन्या काळातील दर्यावर्दी चाच्यांप्रमाणे या अर्थव्यवस्थेचा संचार व अधिकार आंतरराष्ट्रीय पातळीवर चालत असतो प्रत्येक राष्ट्राला त्याचे चलनी नाणे वेगवेगळे असते. ही आंतरराष्ट्रीय काळी अर्थव्यवस्था मात्र सोने, हिरे, अन्नधान्य, रसायने, शस्त्रास्त्रे अशा वस्तुविनिमयाव चालते. बहुतेक राष्ट्रांच्या पांढऱ्या अर्थव्यवस्था या अनियंत्रित अर्थव्यवस्थेच्या हाल चालीप्रमाणे सुधारतात व कोसळतात ' जगातील भांडवलदारांनो आणि श्रीमं व्यापारी–दलालांनो, एक व्हा '– ही या समा तर आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेची अप्रग घोषणा आहे.

¤

हा काहीसा विस्तार एवढ्यासाठी केल की स्वातंत्र्यानंतर आपल्याला जे अपयश आलेले आहे, त्याची कारणे केवळ राष्ट्रीय नाहीत आणि कालचे किंवा आजचे शासक हेच केवळ या अपयशाला जबाबदार नाहीत हे आज मागे वळून बघताना आपले आपल्याला स्पष्ट व्हावे. आपल्यासारख्या सामान्य नागरिकांच्या मनातला आजचा वैताग व त्वेष थोडा सुसह्य व्हावा.

आजच्या स्वातंत्र्यदिनी हा वैताग सुसह्य व्हावा यासाठी आपल्याला आणखी एक गोष्ट करता येईल, करणे इष्ट होईल. गेल्या चौतीस वर्षातली जमा आपण पाहू या !

दुसऱ्या महायुद्धानंतर जी जी म्हणून राष्ट्रे वसाहतीच्या गुलामगिरीतून मुक्त झाली त्यापैकी फक्त आपल्या भारतातच गेली चौतीस वर्षे लोकशाही पद्धती टिकली आहे.

ब्रिटिश वारशाला याचे श्रेय देण्यात येते. आणि काही अंशी ते खरेही आहे; पण काही अंशीच खरे आहे. ब्रह्मदेश, श्रीलंका, पाकिस्तान हे प्रदेशही ब्रिटिशांचा वारसा सांगतात. पण या आणि ब्रिटिशव्याप्त इतर देशांना भारतासारखी लोकशाही पद्धती वापरता आली असे म्हणता येणार नाही. आपल्या भारतीय परंपरेला याचे बरेच मोठे श्रेय देता येते; पण त्याचा विस्तार पुन्हा केव्हा तरी !

स्वातंत्र्यानंतर दोन–चार वर्षातच सरदार पटेलांनी भारताचे राजकीय एकीकरण साधले. निर्वासित, संस्थाने, काश्मीर, हैद्राबाद, जुनागढ, गांधीहत्या असे प्रश्न समोर असतानाही, घटनापरिषदेचे कार्य शांत चित्ताने पण वेगाने चालू होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेली भारतीय प्रजासत्ताकाची घटना, अवघ्या अडीच वर्षांत, २६ जानेवारी १९५० ला आपण स्वतःसाठी

मंजूर करून घेतली. याच वर्षी उद्योगमंत्री डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी यानी भारताचे पहिले औद्योगिक धोरण आखले. १९१५ साली पहिली पचवर्षीय योजना सुरू झाली. १९५२ साली पहिल्या सार्वत्रिक निवडणुका; १९५५-५६ साली अत्यंत गुप्ततेने झालेले आयुर्विम्याचे राष्ट्रीयीकरण अशा अनेक विधायक, दूरपरिणामी, अभिमानास्पद निर्णयांची आणि घटनांची आठवण आज आपणांस करता येईल.

१९४६ च्या अंतरिम (interim) संयुक्त सरकारपासून २७ मे १९६४ रोजी निधन होईतो, पं. जवाहरलाल नेहरू देशाच्या नेतृत्वपदी अठरा वर्षे होते! त्याच्या हातून अनेक चुका झाल्या असे इतिहासाला म्हणावेच लागेल! जयप्रकाशांशी त्यानी समझोता केला नाही ही त्यातली एक महत्त्वाची चूक! पण लोकशाही, समाजवाद, इहवाद, शास्त्रनिष्ठा, नियोजन याची मुळे या देशात रुजविण्याचे महत्कार्य पंडितजीनी केले आहे हेही आपणांस मान्य करावे लागेल.

आजच्या परिस्थितीत त्याचे एक धोरण विशेष आठवावेसे वाटते. राष्ट्रीय नेता म्हणून त्यांनी स्वीकारलेले गुणग्राहक समावेशकतेचे धोरण फार मोलाचे होते! आपले पहिले पहिले परराष्ट्रसंबंधी अधिकारी गोपाळस्वामी अय्यंगार किंवा बेनेगल नरसिंग राव किंवा नंतरचे अर्थमंत्री 'सी. डी.' देशमुख—हे 'आय. सी. एस.' यंत्रणेतील अधिकारी होते. आपले पहिले अर्थमंत्री षण्मुखम् चेट्टी हे एका संस्थानचे दिवाण होते. डॉ. आंबेडकर, श्यामबाबू मुखर्जी, सरदार बलदेवसिंग ही गुणी माणसे कॉंग्रेसला वीस वीस वर्षे विरोध करणाऱ्या पक्षातली होती!

मुख्य म्हणजे पक्षांतर्गत लोकशाहीचा कल ओळखून भिन्न प्रकृती सरदार पटेलांशीही त्यांनी सौहार्द ठेवले. गांधीहत्येनंतर नेहरू व पटेल फुटले असते तर देशाला न सोसवणारा फटका बसला असता! पण दोघांनीही स्व-भावाला मुरड घातली. आपण वयाने वडील, संघटनेत प्रबळ हा विचार सरदारांनी बाजूला ठेवला हे त्यांचे देखील मोठेपणच होय! ५० सालानंतर सरदार पटेल आणखी जगले असते तर पं. नेहरू इतक्या लवकर खचले नसते आणि ६२ साली चिनी धक्क्याने आपण कोलमडला तसे कोलमडला नसता, असा अंदाज करता येईल.

देशहिताच्या या समावेशक धोरणामुळेच ६२ च्या चिनी धक्क्यानंतर आपण त्वरेने सावरलो. ६५ आणि ७५ ही पाकिस्तानने लादलेली दोन्ही युद्धे आपण जिंकली!

केवळ युद्धे जिंकली एवढेच नव्हे तर आपण आपले शास्त्रतंत्रज्ञान वाढविले. निरनिराळ्या क्षेत्रात आपण पूर्णतः किंवा अंशतः स्वयंपूर्ण झालो. अणुविज्ञान आणि अंतराळ व जल याचे संशोधन यात आंतरराष्ट्रीय पातळीची प्रगती साधली. नॅट विमान, विजयंत रणगाडा ॲपल उपग्रह—या आपल्या विक्रमी यशाची आठवण आज प्रत्येक भारतीयाला आनंदित करीत असेल!

हे यश ज्या समावेशक देशप्रेमाच्या भावनेतून शक्य झाले, त्या भावनेची आज आपल्याला सर्वाधिक गरज आहे.

बड्या राष्ट्रांची शस्त्रास्त्रस्पर्धा, आतरराष्ट्रीय काळ्या अर्थव्यवस्थेचा बळकट होणारा विळखा, विकसित देशाचे आर्थिक साम्राज्यवादी धोरण यांचा फास आपल्या गळ्याभोवती जास्त जास्त आवळला जात आहे. ऊर्जेचा दहा वर्षांनी पडणार असलेला भीषण दुष्काळ आणि जगावर दहावीस वर्षांनी कोसळणारे लोकसंख्यावाढीचे संकट याची आणि इतर जागतिक धोक्याची भर यात घालायला हवी. म्हणजे हे ध्यानी येईल की, समावेशक राष्ट्रहिताच्या धोरणाशिवाय भारताचा तरणोपाय नाही! व्यावहारिक तपशिलाच्या भाषेत बोलायचे तर अटलबिहारी बाजपेयी हे परराष्ट्रमंत्री, यशवंतराव चव्हाण हे गृहमंत्री, नानासाहेब गोरे हे संरक्षणमंत्री असे मंत्रिमंडळ पंतप्रधानांबरोबर सहभावनेने काम करीत आहे, असे झाले पाहिजे!

सर्वसाधारण भारतीय जनतेच्या मनातली ही मूक आकांक्षा इथे फक्त व्यक्त केली आहे. ७७ चा प्रयोग फसला. ८० चा नवा प्रयोगही चहूबाजूनी ढासळतो आहे म्हणून नवा समावेशकतेचा उपाय आज हवा आहे!

समावेशकतेच्या या प्रयोगात भारतीय जनता कमी पडणार नाही, असे विश्वासाने म्हणता येईल. ६२, ६५, ७१, ७५, ७७, ८० अशा आव्हानांच्या समयी, आपण कमी पडलो नाही हे जनतेने दाखवून दिले आहे! देशप्रेमासाठी विनतक्रार हालअपेष्टा सोसण्यातही जनता कधी मागे हटलेली नाही!

आज कमी पडत आहेत ते राजकीय पक्ष व त्याचे नेतृत्व. अधिकारारूढ आणि विरोधी असे उभय पक्ष आज क्षुद्र, संकुचित सत्तामार्गावर भाडत बसले आहेत. त्यांच्या भांडणानी जनतेची करमणूक होते आहे. खरी बिकट स्थिती आहे ती ही! ही संकटस्थिती ओळखून, आत्मपरीक्षणाच्या भूमिकेने, राजकीय पक्षानी देशप्रेमाची समावेशक वृत्ती स्वीकारण्याचा निर्धार आजच्या मुहूर्तावर करायला हवा आहे. सर्वसाधारण भारतीयाच्या मनात आज हीच मागणी स्फुरत असेल यात शंका नाही! □


## नवीन दाखल झालेली पुस्तके

1. Megacorp Jonathan Black
2. Noble House (Best seller) James Clavell.
3. **This Life** (An autobiography) SicIney Poifier.
4. **Private Practice** (A medical novel) Linda Wolfe.
5. **The Master Sniper** (A Thriller) Stephen Hunter.

१. जिव्हार स्वानंदाचे (लेख) विजया राजाध्यक्ष.
२. बासरी (कथासंग्रह) वसुधा पाटील.
३. विरोध (कादंबरी) कुसुम अभ्यंकर.

महागाईने डोळे वटारले! रोजच्या जीवनाने वैताग आणला!! सहनशक्तीचा कडेलोट झाला!!! मग जाणार कोठे? मन:शांती मिळविण्याचे एकच ठिकाण—आवडती पुस्तके! तीही 'फिनिक्स' मधील!

**दि फिनिक्स लायब्ररी**

**७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

अवतीभवती । शरद कृष्णन्

# शेतावरून शहराकडे, कामावरून गुन्हेगारीकडे धावणारे शेतमजूर

१५ ऑगस्ट. भारतीय स्वातंत्र्यदिन ! प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही 'जय जवान–जय किसान' चे नारे लगावले जातील, समारंभांतून, भाषणांतून आणि चित्रपटांतूनही आपण ज्याचा जय किसान म्हणून गौरव करतो तो किसान बिचारा हतबल होऊन नारे ऐकत असतो. प्रत्यक्षात या किसानाची पर्वा फारशी कोणी करत नाही. म्हणून तर एखादा 'योद्धा शेतकरी' उभा रहाताच बघता बघता हे त्याच्या मागे ठासून उभे राहतात, त्याला शक्ती देतात आणि आपल्या प्रश्नांची सोडवणूक करून घेण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रयत्नांची नितांत आवश्यकताही आहे. नवी दिल्लीच्या विकासयोजनांसाठी ज्या पद्धतीने आजूबाजूच्या छोट्या छोट्या खेड्यांमधील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी हिसकावून घेण्यात येत आहेत, त्यांचा तपशील पहाता ही गोष्ट लक्षात येते. नवी दिल्लीच्या परिसरामधील अनेक छोट्या खेड्यामधील असंख्य शेतकऱ्यांच्या जमिनी दिल्ली प्राधिकरणाने शहर विकास योजनांसाठी अक्षरशः बळकावल्या आहेत ! गेली १५–२० वर्षे ही जमिनी बळकावण्याची प्रक्रिया सतत चालू आहे. ज्यांच्या शेतजमिनी घेतल्या गेल्या त्यांना योग्य वेळी, योग्य प्रमाणात नुकसानभरपाईही देण्यात आलेली नाही ! परिणामी अनेक असंतुष्ट शेतकरी दिल्ली प्राधिकरणाशी संघर्ष करण्यासाठी दिल्लीमध्ये आले. त्यांची बेकार मुले रस्तोरस्ती हिंडू लागली. चटकदार शहरी जीवन भिरभिरत्या नजरेने पाहू लागली ! पैसा असला की सारे काही मिळते हे समजून चुकल्यावर पैसा मिळवण्यासाठी काहीही करण्याची त्यानी तयारी ठेवली आणि अगदी सहजगत्या ती गुन्हेगारीकडे खेचली गेली ! २९ जुलै रोजी घडलेल्या एका गुन्ह्याचा तपशील खाली देत आहे.

### पैशासाठी वाटमारी

२९ जुलै रोजी रंगपुरी या खेड्यामधून पप्पू नावाचा तरुण साकेत कॉलनीमधील आपल्या घरी जाण्यासाठी स्कूटरवर स्वार झाला. त्या वेळी त्या बिचाऱ्याला आपल्या नशिबी काय वाढून ठेवले आहे याची कल्पनाही नव्हती ! आणि कशी असणार ? कारण पप्पूला स्वत बद्दल दांडगा आत्मविश्वासही होता, म्हणून तर घरचे आर्थिक व्यवहारही तो आत्मविश्वासाने पाहू लागला होता. त्याच्या पालकांनाही मुलाच्या कर्तृत्वाची पावती मिळाली होती. त्याच्या काही निर्णयांमुळे कुटुंबाचा आर्थिक लाभही झाला होता. तर असा हा पप्पू सहाय संध्याकाळी घरी निघाला. नेहमीच्या रस्त्याने पुढे जात तो 'अंधेरी बोर' नावाच्या कमी गर्दी असलेल्या वळणावरून सावधपणे जरासा पुढे गेला मात्र, झुडपाआड दडून बसलेल्या तीन तरुणानी त्याच्यावर हल्ला केला ! लोखंडी सळयानी त्याला बेदम मारले. काय होते आहे हे लक्षात येण्यापूर्वीच त्याला स्कूटरवरून खेचण्यात हल्लेखोर यशस्वी झाले. तो प्रतिकार करू लागताच तिघानी मिळून त्याला बेशुद्ध पडेपर्यंत मारले! त्याचे खिसे तपासताना हल्लेखोरांना चांगली ४ हजार रुपयांची रोकड मिळाली ! खेरीज घड्याळ व चेनही हाती लागली. चांगले अपेक्षेपेक्षा मोठे घबाड मिळाले म्हणून ते खूष होऊन गेले ! पप्पूला तसाच टाकून हडप केलेल्या मालाची विल्हेवाट लावण्यासाठी ते जवळच असलेल्या आपल्या गावी पळत सुटले. तासाभरात ते परत गुन्ह्याच्या जागी आले. जबर जखमी झालेला पप्पू रस्त्यातच विव्हळत पडलेला होता. हे प्रकरण आपल्या अंगावर चांगलेच शेकणार हे लक्षात आल्याने त्यानी तिथून पळ काढला! पुढे पोलिसानी पप्पू सहायला सफदरजंग हॉस्पिटलमध्ये दाखल केले; परंतु दुर्दैवाने त्याचे निधन झाले! एका संपन्न कुटुंबामधील कर्तृत्ववान मुलगा गुन्हेगारीचा बळी ठरला!

पोलिसानी गुन्ह्याचा तपास सुरू केला आणि चौथ्याच दिवशी तिन्ही पोराना ताब्यात घेतले ! गुन्ह्याचा तपास करणे तसे अवघड नव्हते. कारण गुन्हेगार सराईत नव्हते. आपण केवढा गंभीर गुन्हा करतो आहोत याची त्यांना कल्पना नसल्याने अनेक दुवे त्यांनी मागे ठेवले होते. त्यामुळे पोलिसाचे काम सोपे झाले खेरीज पकडलेल्या तरुणाजवळ तीन हजाराची रोकड व पप्पूचे घड्याळ मिळाले! कोण होते हे गुन्हेगार ? अधिक चौकशी केल्यावर असे आढळून आले की, हे तिघेही शेतकरी कुटुंबामधील आहेत. मग प्रश्न निर्माण झाला, त्यांनी गुन्हे का करावेत ? त्याचे उत्तर असे मिळाले की, त्यापैकी फक्त एकाजवळ स्वतःची जमीन होती; परंतु दिल्ली प्राधिकरणने शहरविकासासाठी ती ताब्यात घेतली. परिणामी तो तरुण–सुदरसिंग बेकार झाला ! शिक्षण पुरेसे झालेले नव्हते. जमिनीचे पैसेही आले नाहीत. कोर्ट–कचेऱ्या करण्याची ताकद नाही. परिणामी प्राधिकरणाच्या अधिकाऱ्याना तगादा लावण्यासाठी तो आपल्याच शेतात काम करणाऱ्या दोन शेतमजुरांसह दिल्लीत आला. खर्चासाठी पैसे हवेत म्हणून एका गॅरेजमध्ये तिघही कामाला लागले. काम बेताचे, दाम बेताचा; पण बघता बघता अनेक शहरी छंद मात्र लागले! भागावे कसे ? उपाय एकच; अधिक पैसा हाती पाहिजे! मग गॅरेजमध्ये छोट्या–मोठ्या चोऱ्या सुरू केल्या. चोरलेल्या मालाला किंमत मिळवणे सर्वांना जमत नाही. शंभर रुपयाची वस्तू दहा रुपयाला विकावी लागते. तेव्हा हे काही फारसे लाभदायक नाही, हे त्यांच्या लक्षात येऊन चुकले. तिघानी ठरवले की, वाटमारी करून पैसा मिळवायचा ! त्याच्या पहिल्याच प्रयत्नात बिचारा पप्पू सहाय आपला जीव गमावून बसला. त्याला मारण्याचा आपला उद्देश नव्हता; केवळ चोरी करण्याचा हेतू होता, असे त्यानी सांगितले. ते फारसे

मानले जाणार नाही. त्यांना व्हायची ती शिक्षा होईलच; पण प्रश्न असा निर्माण होतो की, शेतावर सोने पिकवण्याची हिंमत असणारे हे हात जर तोडले गेले आणि त्यामुळे जर ही अशा स्वरूपाची गुन्हेगारी बोकाळली तर त्याची जबाबदारी कोणावर ?

दिल्लीच्या परिसरामध्ये गेल्या वीस वर्षांमध्ये दिल्ली प्राधिकरणाने जमिनी अशा झपाट्याने बळकावल्या असल्याने असंख्य शेतकरी आणि शेतमजूर आपल्या कामापासून हटवले गेले आहेत आणि सर्वांत क्लेशदायक बाब म्हणजे या शेतमालकांना वाजवी नुकसान-भरपाईही लगोलग देण्यात आलेली नाही ! १९५९ मध्ये दिल्ली विकास प्राधिकरणाने एक फतवा काढून शहरविकासासाठी जमिनी ताब्यात घेण्यास प्रारंभ केला. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ७० हजार एकर शेतजमीन त्या वेळी ताब्यात घेण्यात आली. ज्या खेड्यामधील जमीन घेण्यात आली त्या खेड्याचे सारे जीवन उध्वस्त झाले जमिनीवर प्राधिकरणाचा अग्रहक्क असल्याने या जमिनी अन्य कोणालाही विकता येणार नाहीत, असेही जमीन-मालकांना सागण्यात आले. बरे, जो भाव तेव्हा ठरला त्या भावाने लगोलग वर्ष-सहा महिन्यात हिशेब पूर्ण केले गेले असेही नाही !

## जमिनी गेल्या ! पैशाचा पत्ता नाही !!

प्राधिकरण-अधिकाऱ्यानी अनेक शेतकऱ्याना नोटिसा बजावून जमिनी ताब्यात घेतल्या आणि आपल्याला हव्या त्या पद्धतीने या जमिनींचा वापरही सुरू केला; परंतु मालकाना पैसे मात्र दिले नाहीत ! १९५९ साली या जमिनीसाठी त्याचे महत्व लक्षात घेऊन ६० पैसे ते ५ रु. स्क्वेअर यार्ड हा दर ठरला. या दराने त्याना रक्कम हाती पडण्यास पूर्ण बावीस वर्षे लागली ! प्राधिकरणाने व्यापारी व निवासी इमारतीसाठी जमिनी विकून बक्कळ पैसा केला आणि या पैशाचा शंभराव्वा हिस्सासुद्धा मूळ मालकाला मिळू शकला नाही. आपल्याला ठरल्याप्रमाणे तीन वर्षांत पैसे दिले न गेल्याने दर वाढवून मिळावा अशी मागणी या मंडळीनी केली. कदाचित् संघटनेच्या ताकदीवर ही मागणी मूळ धरू शकली असती; परंतु ती गटाने अथवा व्यक्तिगत पातळीवर केली गेल्याने या मागणीचा साधा विचारही झाला नाही ! ५९ साली ताब्यात घेतलेल्या जमिनीला त्या वेळी ठरवलेल्या भावाने वीस वर्षांनंतर पैसे देणे हा क्रूर प्रकार होता; परंतु संबधितानी तो सहन केला. शेतकऱ्यांपैकी एक छोटूराम बात्रा म्हणतात– शेतजमिनी ताब्यात घेतल्यावर लगेच पैसे दिले असते तर या व्यवहाराला काही तरी अर्थ होता; पण वर्षानुवर्षे व्यवहार कागदोपत्री राहिला आणि पैशांचा पत्ताच नव्हता ! जवळ-जवळ १५० शेतकरी कुटुबाना आपला शेतीचा पिढीजात व्यवसाय सोडून मोलमजुरी करून बकाल शहरी जीवनात स्वतःला व कुटुबियांना लोटून घ्यावे लागले !

आता अलीकडेच दिल्ली प्राधिकरणाने आणखी तीस हजार एकर शेतजमीन ताब्यात घेण्याबाबतचा फतवा घोषित केला आहे. पहिल्या सत्तर हजार एकर जमिनींपैकी १५ हजार एकर जमीन अद्यापी अविकसित आहे. तिच्यावर शेतीही होत नाही किंवा विकसित करून घेऊन बांधकामही केले जात नाही. ही जमीन प्राधिकरणाचा कब्जा सूचित करणारी कुंपणे मिरवत पडून आहे आणि या परिस्थितीत आणखी तीस हजार एकर जमीन शहरविकासासाठी ताब्यात घेतली जात आहे ! आता या जमीनमालकाना नोटिसा बजावल्या गेल्याने हे जमीनमालक चिंतेतच आहेत. कारण त्यांचा आजवरचा अनुभव असे सागतो की, ही जमीन एकदा प्राधिकरणाच्या फतव्याखाली अडकली की कोणाचे काही चालत नाही ! शेतमालकाला शेतीही करता येत नाही अथवा जमीन विकताही येत नाही ! प्राधिकरणवाले जेव्हा केव्हा पैसे देतील तेव्हा ते घ्यायचे आणि गप्प बसायचे अशी ही विचित्र हुकमत आहे !

शहरविकासाच्या योजना आखताना जमिनी ताब्यात घेतल्या गेल्या तर निदान आर्थिक व्यवहाराची बाजू संभाळली जावी अशी अपेक्षा जमीनमालकानी व्यक्त केली तर त्याना बोल लावता येणार नाही. तसेच निश्चित योजना तयार झाल्यावरच जमिनीच्या कब्जाबाबत फतवे काढावेत. शेतमालकांना तर शेतजमिनीवरून हुसकायचे आणि ताब्यात घेतलेल्या जमिनी १०-१२ वर्षे पाडून ठेवायच्या हा कसला विकास ? शेतकरी मोहेंदर सिंग म्हणतो– प्राधिकरणाने ताब्यात घेतलेली माझी जमीन गेली ८ वर्षे पडून आहे. मी अधिकाऱ्याना म्हणालो, जमीन तुमची. तुम्ही त्यावर काय इमले उभारायचे आहेत ते उभाराल तेव्हा उभारा; पण ती जोपर्यंत पडून आहे तोपर्यंत मला कसण्यासाठी द्या ! मी त्यातून सोने पिकवीन ! प्राधिकरणाचे अधिकारी म्हणतात–'मोहेंदरजी, आप ठीक कहते हैं। लेकिन सवाल सिर्फ आप का नही; बाकी लोगो का क्या करें ? अगर सब किसान इस तरह की बातें करने लगेंगे तो हम काम नही कर पाएंगे !' हे उत्तर ऐकून कंटाळलेल्या मोहिंदरने प्राधिकरणाचे कुंपण तोडून ट्रॅक्टर आत घातले. तेव्हा त्याला व त्याच्या दोन मुलाना मारपीट करून बाहेर काढण्यात आले. लाभ झाला तर तो इतकाच की, त्याला या जमिनीपोटी ४५ हजार रुपयांची रक्कम मिळणार होती ती एक महिन्यात मिळाली. आता हा मोहिंदर सिंग दक्षिण दिल्लीमध्ये आपल्या मुलासह राहतो. एक मुलगा थोडा-फार शिकलेला आहे त्याचे किराणा मालाचे दुकान आहे. मोहिंदरनेच त्याला पैसा दिला आहे.

बेगमपूर हे दिल्ली प्राधिकरणाच्या नजरेत भरलेले दुसरे खेडे. या खेड्यामधील १२ हजार एकर जमीन प्राधिकरणाच्या ताब्यात आहे. १९६७ साली ताब्यात घेतलेल्या जमिनीवर अजूनही बाधकाम झालेले नाही. म्हणजेच गेली १४ वर्षे या सुपीक जमिनी पडून आहेत. प्राधिकरणाला समजेल अशा रुपये आणे पैंच्या भाषेत बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, या सुपीक जमिनी नुसत्याच पडिक राहिल्याने सुमारे १ कोटी ४० लाख रुपयाचे नुकसान झाले ! पण हा हिशेब प्राधिकरणाच्या डोक्यात बसत नाही. येथील शेतकऱ्यानी संयुक्तपणे अनेक प्रयत्न केले. प्रसिद्ध किसान-रॅलीनंतर पंतप्रधानांची भेट घेतली; पण बघू, काही तरी करू, यापलीकडे फारसे गाडे हालत नाही आणि जमीन अक्षरशः धुपत पडून आहे ! हा सारा तपशील ज्यानी दिल्लीच्या 'स्टेटसमन'मध्ये प्रसिद्ध केला आहे ते श्री. बी. एम्. सिन्हा म्हणतात–'केवळ उत्सुकतेपोटी मी या प्रश्नावर प्राधिकरण-अधिकाऱ्याशी चर्चा केली. तेव्हा मला असे सागण्यात आले की, भावनात्मक दृष्टिकोणातून या प्रश्नाकडे पाहून चालणार नाही. एकदा आम्ही जमिनी ताब्यात घेतल्या की, शेती

बंद ! यामागील नुकसानीची आर्थिक बाजू त्याना पटवून दिली तरी त्याकडे दुर्लक्ष करण्यात येते. या जमिनी बळकावण्याच्या प्रकारात कायदेशीर बाजू प्राधिकरणाला अनुकूल असली तरी एकंदरीत हा प्रकार शेतकऱ्यावर अन्याय करणारा आहे हे त्यानाही पटते; परंतु त्याचा इलाज चालू शकत नाही !'

### शेती नाही, मजुरी नाही ! करायचे काय ?

छोटूराम नावाच्या शेतकऱ्याचा मी वर उल्लेख केला आहे. हा छोटूराम आज ६० वर्षांचा आहे. दक्षिण दिल्लीला लागून असलेल्या लडोसरानी या खेड्यात त्याची ५ बिघे जमीन होती. होती अशासाठी म्हणायचे की प्राधिकरणनामक राक्षसाने ती १९६५ साली ताब्यात घेतली आणि ७२ साली त्या जागेवर निवासी घरे उभी केली ! छोटूराम, प्राधिकरणाचा 'शेतजमीन खाणारा राक्षस' असा उल्लेख करतो ! आज या छोटूरामचे वय आहे ६० वर्षांचे. त्याची जमीन गेली लाख मोलाची. हाती चार पैसे पडले. ते कौटुंबिक गरजांवर खर्च झाले. आता करायचे काय ? दोन मुलगे आहेत. त्यांना नोकरी नाही. मजुरी नाही. अर्धपोटी राहून हा किसान आपला परिवार सभाळतो आहे; पण कोणाला त्याचे फारसे सोयरसुतक नाही !

शहरविकासाला जागा लागते. झपाट्याने ती बळकावली जाते. हा प्रश्न केवळ दिल्लीपुरता आहे असे नाही. सर्वच मोठ्या शहरांना हा प्रश्न भेडसावत आहे. मुंबईची गर्दी हटवण्यासाठी सिडकोने ज्या जमिनी ताब्यात घेतल्या त्याही शेतजमिनी होत्या. शहरांचा विस्तार होत असताना खेड्यांमधील केवळ जमिनीच खाल्ल्या जातात असे नाही, तर संपूर्ण जीवनच या बदलामुळे व्यापले जाते. पुण्याच्या विस्ताराचा विचार करतानाही ही गोष्ट लक्षात येते. कोथरूड, हिंगणे यांसारखी खेडी वीस वर्षांपूर्वी जशी होती तशी आज दिसत नाहीत. आज ती पुण्याने गिळून टाकली आहेत ! तेथील शेतकऱ्याचा पोरगा बससाठी रुपया फेकून पुण्यात धावतो. दिवसभर कोठे तरी राबता घालतो. सायंकाळी घरी जातो; पण त्याचे आयुष्य शहराने परिपूर्ण व्यापून टाकले आहे ! सुटीच्या दिवशीही तो शहराकडे धाव घेतो. कधी स्वत:चे षौक पूर्ण करण्यासाठी तर कधी बायकापोरांना सिनेमा वगैरे दाखवण्यासाठी ! शेतकऱ्याचा किंवा शेतीकाम करणाराचा 'मजूर' बनवण्याची ही प्रक्रिया सर्वत्र वेग धरून आहे. बदलत्या परिस्थितीचा हा एक अपरिहार्य भाग आहे असे जरी मानले तरी त्यातून जे असंतुलन निर्माण होत आहे त्यावर विचार होणे अगत्याचे आहे. 'जय जवान जय किसान'चे नारे लगावून किंवा स्वातंत्र्यसोहाळ्याच्या समारंभातून भाषणे देऊन हे प्रश्न सुटणार नाहीत. त्यावर सखोल विचार करून उपाय शोधून काढणे आवश्यक आहे ! □


## प्रसिद्ध झाले




शेतकरी नेते श्री. शरद जोशी
यांचे व्यक्तिमत्त्व व विचार
सादर करणारे, तसेच त्यांच्या
व कै. माधवराव बोरस्ते,
श्री. प्रल्हाद पाटील,
श्री. माधवराव मोरे
इत्यादींच्या नेतृत्वाखाली
लढल्या गेलेल्या नासिकच्या
ऊस–शेतकरी–आंदोलनाचा
चक्षुर्वैसत्यं वृत्तान्त
कथन करणारे पुस्तक–

**लेखक : विजय परुळकर**

**सचित्र आवृत्ती । पंचरंगी मुखपृष्ठ । किंमत : रुपये छत्तीस**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

चिंचवड-पुणे येथील संघवी केशरी कॉलेजात दरमहा प्राध्यापकांच्या सभेत निबंधवाचन होते. राज्यशास्त्राचे प्रा. चित्तरंजन दामले यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या हिंदुराष्ट्रवादावर निबंध वाचला. प्राचार्य डॉ. मा. पा. मंगुडकर, प्रा. तुंगार, प्रा. देव, प्रा. लांडगे आदींनी निबंधावर चर्चा केली. निबंधवाचन–चर्चेचा हा सारांश प्रा. देवदत्त तुंगार यांनी विस्तृत स्वरूपात येथे सादर केला आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकरप्रणित हिंदुराष्ट्रवाद

प्रा. चित्तरंजन दामले, संघवी कॉलेज, चिंचवड, पुणे १९

'हिंदू' हा शब्द प्राचीन ग्रीक वाङ्मयात आढळतो. मूळ 'सिंधू' ह्या संस्कृत शब्दाचा 'स'चा 'ह' होतो ह्या भाषाविज्ञानातील विशिष्ट नियमाने 'सिंधू'चे परिवर्तन 'हिंदू'त झालेले आहे. सिंधू नदीच्या परिसरातील लोक असा प्रादेशिक अर्थ त्याला होता. आपण मोहन-जो दडो येथील उत्खननित संस्कृतीला सिंधू-संस्कृती म्हणतो. इंडस् हा इंग्रजी शब्दही सिंधू शब्दाचेच इंग्रजी रूप आहे. सिंधू व सिंधुस्थान हे शब्द भविष्यपुराण, पृथ्वीराज रासो, कवी भूषणाचे शिवाजीमहाराजांवरचे स्तुतिपर काव्य, गुरु गोविंद सिंह्यावरील नाटक, पहिले बाजीराव पेशवे, तसेच पेशव्यांचे निजामाकडील वकील गोविंदराव काळे, दिल्लीचे तख्त फोडणारे सदाशिवरावभाऊ पेशवे इ. च्या लिखाणातही हिंदू व हिंदूपदपादशाही हे शब्द आढळतात. ह्या देशाला भरतखंड, भारतवर्ष, आर्यावर्त इ. अन्य नावेही कालौघात वापरलेली आहेत; पण फार प्राचीन काळापासून आजपर्यंत सातत्याने फार मोठ्या प्रमाणात हिंदू व हिंदुस्थान हेच शब्दप्रयोग वापरात आहेत.

पारशी धर्मग्रंथ झेंद अवेस्तामध्येही 'हिंदू' असा उल्लेख आहे. **अरबस्थानात भारतीय मुसलमानांना 'हिंदू' मुसलमान म्हणूनच ओळखतात.** आर्यसमाजाचे म्हणणे असे की, अरबी भाषेत हिंदू हा शब्द शिवी म्हणून वापरतात म्हणून हा शब्द वापरू नये. त्याला उत्तर असे की, ह्या शब्दाचा मूळ अर्थ स्पष्ट आहे तो प्रादेशिक शब्द असून त्याचा धर्मग्रंथ व धर्ममताशी, संप्रदायाशी संबंध नाही.

काही वर्षांपूर्वी पाकिस्तानातील अमेरिकन वकिलातीतील एका अधिकाऱ्याने आपल्या कुत्र्याचे महमद असे नाव ठेवले होते. त्या कुत्र्याने महमदाच्या श्रेष्ठतेला बट्टा लागला असे होत नाही तर उपरोक्त माणसाच्या मनाचा हलकेपणा दिसतो. दुसरे उदाहरण, सरदारजी म्हणजे अक्कलशून्य माणूस हा शीख लोकांवरचा विनोदाचा प्रकार पाहून शीखांनी स्वतःला सरदार म्हणवायचे सोडले नाही. एका मराठी शब्दकोषात मारवाडी ह्या जातिवाचक शब्दाचा अर्थ शिवीसदृश्य दिल्याने महाराष्ट्रातील मारवाड्यांनी मारवाडी म्हणवून घ्यायचे सोडले नाही तर शब्दाचा विपरीत अर्थ काढून टाकावा म्हणून ओरड केली. वर उल्लेखिलेल्या पाकिस्तानातील प्रकरणातही तीव्र प्रतिक्रिया होऊन कुत्र्याचे नाव बदलण्यात आले व संबंधित व्यक्तीला मायदेशी पाठविण्यात आले !

रामाला उत्तरेचा आक्रमक मानणारे व चपलांचा हार घालणारे, रावण श्रेष्ठ मानणारे द्रविडस्थानचे पुरस्कर्ते श्री. नायकर यांनी स्वत:च्या 'रामस्वामी' नावातील राम वगळला नाही. तेव्हा आपण हिंदू म्हणवून घेण्याचे सोडण्याऐवजी अरबी भाषेतील हिंदू शब्दाचा गुलाम, नीच माणूस हा अर्थ काढून टाकावा ही मागणी करणे ठीक होईल व ती अमान्य झाल्यास सर्व भारतीय भाषांतून अरब शब्द नीच माणूस, गुलाम ह्या अर्थाने ताबडतोब वापर करावयास सुरुवात करणे योग्य ठरेल.

## पार्श्वभूमी

**कोणताही विचार एका विशिष्ट परिस्थितीत निर्माण होतो. हिंदुराष्ट्रवादही त्याला अपवाद नाही.** मुस्लिम जातीयवाद किंवा मुस्लिम राष्ट्रवादाची ती एक नैसर्गिक व स्वाभाविक प्रतिक्रिया होती. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात हिंदु-मुस्लिम ऐक्य दिसून येते; पण त्या युद्धाच्या वेळेसच सर सय्यद अहमद ह्या मुस्लिम गृहस्थाने वेगळ्या दिशेने विचार करण्यास सुरुवात केली. १८७० मध्ये मुस्लिमांनी हिंदूपेक्षा वेगळा मार्ग आक्रमावा, तसेच ब्रिटिशांची जवळीक साधावी असा फुटीर विचार त्यांनी मांडला व १८७५ मध्ये मोहेमिडियन अँग्लो-ओरिएंटल स्कूल सुरू केले. त्याच शाळेचे पुढे १९२० मध्ये अलीगढ मुस्लिम विद्यापीठात रूपांतर झाले. सुरुवातीपासूनच फुटीरतेचे विष ह्या संस्थेतून जोपासले गेले. प्रिन्सिपल बेक ह्या इंग्रज गृहस्थांनी हा विषवृक्ष जोपासण्यात फार रस घेतला. व्हाइसरॉय मिंटो यांच्याकडे मुस्लिम शिष्टमंडळ नेऊन मुस्लिमांसाठी राखीव जागा ठेवण्याची मागणी करण्यापाठीमागे प्रिन्सिपल बेक होते! **१९०६ मध्ये मुस्लिम लीगची स्थापना झाली.**

पंजाबमध्ये जमीनविक्रीबाबत हिंदु-मुस्लिम यामध्ये पक्षपात करणारे कायदे केले होते. यातून हिंदूहितासाठी एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू झाली. बंगालमधील हिंदु-मुस्लिम दंग्यातून तेथेही हा विचार मूळ धरू लागला. त्यातूनच **अखिल भारतीय हिंदुसभा १९१५ मध्ये स्थापन झाली.** ब्रिटिश शासनाने मुंबई प्रांतातून सिंधप्रांत हा मुस्लिम बहुसंख्येचा भाग वेगळा काढला. १९१९ ते

१९२२ मध्ये खिलाफत चळवळीमध्ये वरवर हिंदु-मुसलमान-एकता दिसलं तरी त्यातूनच मुस्लिम जातीयवाद अधिक बळकट झाला. या चळवळीच्या शेवटी मलबारमधील मोपला मुस्लिमांनी हिंदूवर अत्याचार केले. मोपल्यांचे हे बंड शेवटी ब्रिटिश फौज पाठवून मोडून काढावे लागले. (१९२१) हिंदु स्त्रियावर बलात्कार करणे, हिंदु सांप्रदायिक, सार्वजनिक कृत्याना अडथळे करणे, प्रार्थनामंदिरे पाडणे इ. कृत्यांमुळे हिंदू-मुस्लिम तेढ वाढतच गेली.

सुरुवातीस हिंदुसंघटनेचे अखिल हिंदुसमाजसुधारणा घडवून आणणे, अस्पृश्यता नष्ट करणे, एकता निर्माण करणे, इत. ध्येय होते व कॉंग्रेसचे पुढारी हिंदुसभेचे नेते होते. पुढे सिंध वेगळा करण्याच्या १९२८ मधील सरकारी निर्णयापासून हिंदुसभा व कॉंग्रेस यातील मतभेद स्पष्ट झाले. **कॉंग्रेसच्या मुस्लिमांना झुकते माप देण्याच्या धोरणाने दोघांमध्ये अंतर पडले.**

याच सुमाराला पॅन इस्लामिक चळवळ पुढे आली. म. गांधीजीचे खिलाफत चळवळीतील निकटवर्ती मौलाना महंमद अली हे ह्या चळवळीचे म्होरके होते. त्यानी त्या वेळी असे म्हटले आहे की, **नीचातला नीच मुसलमान मला म. गांधींसारख्या पवित्र हिंदु गृहस्थापेक्षा श्रेष्ठ वाटतो.** त्या उद्गारातून मुस्लिमांचा उद्धटपणा व दुराग्रहीपणा कोणत्या थराला गेला होता हे कळते. परधर्मात गेलेल्या अनेक जणाची हिंदू धर्मनेत्यानी शुद्धी सुरू केली. स्वामी श्रद्धानंदांचा त्याच कारणाने खून झाला ! पॅन इस्लामिक चळवळीची प्रतिक्रिया पॅन हिंदू चळवळीची स्थापना १९३६ झाली होण्यात झाली. १९३७ मध्ये स्वा. सावरकरांनी हिंदुमहासभेत प्रवेश करून हिंदुमहासभा प्रभावी बनवण्यास सुरुवात केली. भारताची फाळणी होईपर्यंत हिंदुसभा प्रभावी राहिली. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र हिंदुसभेचा पाठिंबा झपाट्याने कमी झाला व गांधीखुनामुळे जवळजवळ संपला !

## हिंदू व हिंदुधर्म

सुरुवातीलाच हे स्पष्ट केले पाहिजे की, हिंदू म्हणजे हिंदुधर्मीय व हिंदुधर्मीय म्हणजे जातिभेद मानणारे, मूर्तिपूजक, श्रुतीस्मृतीपुराणोक्त लोक अशा समजुतीमुळे बौद्ध, जैन, शीख व अन्य काही संप्रदायांचे लोक स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यास बिचकत असतात. याबाबत सावरकरानी हिंदू हा शब्द प्रादेशिक आहे हे स्पष्ट करून, अर्थाचा घोळ नाहीसा होण्यासाठी, 'हिंदुत्व' हा शब्द त्यानी रुढ केला.

लो. टिळकांनी हिंदुची केलेली व्याख्या याच कारणाने सावरकरांनी अयोग्य असल्याचे प्रतिपादन केले. वेदप्रामाण्य, उपास्यदेवतेसबंधी निश्चित नियम नसणे व साधनानां अनेकता अशा लक्षणांनी युक्त, श्रुतीस्मृतीपुराणोक्त धर्म मानणारे हिंदू असे लो. टिळकाचे मत होते. कारण त्यात अवैदिक असणाऱ्या जैन, बौद्ध, लिंगायतआदींचा समावेश होऊ शकणार नव्हता.

अनेकांचे प्रयत्न असफल झाल्यावर, ज्याची व्याख्या करता येत नाही तो हिंदू अशीही एक व्याख्या करण्यात आली. आजपर्यंत हिंदुच्या व्याख्येचे जे प्रयत्न झाले त्यापैकी सावरकरांची व्याख्या तर्कशुद्ध स्वरूपाची आहे, तसेच ती व्यापकही आहे. त्यांनी

आसिंधुसिंधूपर्यंता । यस्य भारतभूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चैव । स वै हिंदूरिति स्मृतः ।।

याप्रमाणे व्याख्या केली आहे. त्यातील घटक स्पष्ट आहेत. हिंदुस्थान अथवा भारताच्या संबंधी सिंधूनदीपासून समुद्रापर्यंत, आसेतु हिमाचल, हा उपखंड आमची भूमी आहे अशी ज्यांची श्रद्धा आहे, जो ह्या देशाचा रहिवासी, रक्तसंबंधी आहे व ज्याची ही धर्मभूमी आहे तो तो हिंदू होय !

## हिंदू कोण ?

सावरकराच्या मते वरील व्याख्येनुसार आर्य व आर्येतर द्रविडआदिद्रविड इ. वैदिक–अवैदिक, एकेश्वरी–अनेकेश्वरी, ईश्वर मानणारे, ईश्वर न मानणारे, मूर्तिपूजक–मूर्तिपूजा न करणारे बौद्ध, जैन, शीख, ब्राह्मो, आर्यसमाज, प्रार्थनासमाज, लिंगायत इ. तसेच सर्व आदिवासी पंथ, गणपती, विष्णू, शंकर, देवी व इतर अनेक देवतांचे पंथोपंथ ह्या सर्वांचा ह्यात समावेश आहे.

**थोडक्यात ज्या संप्रदायाची व पंथाची मूळ सुरुवात भारताबाहेर झालेली नाही ते सर्व संप्रदाय हिंदू या शब्दात समाविष्ट होतात.**

'पुण्यभू' हा शब्द धार्मिक स्वरूपाचा आहे असा आक्षेप काहीजण घेतात; परंतु पुण्यभू हा शब्द एखाद्या विशिष्ट संप्रदायाशी निगडित नसून विशाल अर्थाचा आहे हे वरील स्पष्टीकरणातून सिद्ध होईल. एनसायक्लोपिडिया ब्रिटानिकाने सावरकराची व्याख्या मानलेली दिसते असे त्या ग्रंथातील पान ५० वरील 'हिंदू' शब्दाचे स्पष्टीकरण वाचले म्हणजे कळते.

सावरकराच्या मते (१) समुद्रवलयांकित हिंदुस्थान ह्या उपखंडावर ज्याची भक्ती आहे, प्रेम आहे. (२) तसेच जो या भूमीशी रक्ताच्या नात्याने जोडलेला आहे म्हणून ज्याचे वाड–वडील हिंदू होते व आहेत, जे स्त्री-पुरुष हिंदूशी विवाहबद्ध होतील तेही हिंदूच समजले जातील. एवढेच नव्हे तर भगिनी निवेदिता, ॲनी बेझंटसारखे वंशपरंपरागत हिंदू नसलेले व रक्तसंबंधी नसलेले लोक सावरकरांनी अपवाद म्हणून हिंदूच धरले आहेत. (३) वरील अटी पूर्ण करणाऱ्यांच्या साप्रदायाची स्थापना मूळ ह्याच भूमीतील पाहिजे. (४) हिंदुसंस्कृतीचा, परंपरांचा व पूर्वजांच्या गौरवशाली इतिहासाचा अभिमान पाहिजे. (५) वंशाने हिंदू पाहिजे असे प्रतिपादन करताना भारतातील विविध वंश हे शुद्ध स्वरूपात नसून त्याच्यात रक्ताची देवाण–घेवाण झालेली आहे हे त्यानी स्पष्ट केले आहे. एवढेच नव्हे तर जगात कोठेच शुद्ध वंशाचे लोक नाहीत हेही त्यांनी स्पष्ट केले आहे व असे म्हटले आहे की, त्यातल्या त्यात रक्तशुद्धी ज्यू व हिंदूनी राखली आहे. कारण ह्या दोन गटानी अन्य धर्मीय गटांशी शरीरसंबंध टाळले आहेत.

## प्रश्न असा निर्माण होतो की ह्या हिंदूराष्ट्रवादात अस्पृश्यतेचे काय? जातिभेदाचे काय ?

सावरकरांनी हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार करताना शुद्ध विज्ञाननिष्ठ व मानवतावादी दृष्टिकोन घेतलेला आहे. त्यांचे ध्येय हिंदूंचे

नैतिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय पुनरुत्थान करण्याचे आहे. अस्पृश्यता व जातिभेद हे हिंदुराष्ट्रवादाचे आवश्यक घटक नाहीत. अस्पृश्यता ही मानवताविरोधी आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे. वेदामध्ये समानतेचा पुरस्कार आहे. सर्वांना मंत्र समान, सर्वांना सभा समान, सर्वांना मन समान, सर्वांना चित्त समान. (ऋग्वेद १० १९१-३) सातव्या शतकातील यु-एन-संग ह्या चिनी बौद्ध प्रवाश्याच्या नोंदीप्रमाणे त्या वेळी त्याला तीन ब्राह्मण, पाच क्षत्रिय, दोन वैश्य व दोन शूद्र राजे त्याने प्रवासलेल्या प्रदेशांतून होते, असे आढळल्याचे त्याने नमूद केले आहे.

शीख व शीखेतर हिंदू याच्यात विवाह होतात. एवढेच नव्हे तर एकाच घरातील एक भाऊ शीख असतो व दुसरा नसतो हेही सावरकरानी दाखवून दिलेले आहे. जैन-जैनेतर-विवाह इ. अनेक आंतरजातीय व आंतरसांप्रदायिक विवाह पौराणिक, मध्ययुगीन व अर्वाचीन काळातील दाखवून देऊन त्यांनी जातिभेदाला विरोध केलेला आहे. तसेच त्यांनी अंधश्रद्धानाही विरोध केलेला आहे. **मात्र त्यांचा सर्वच अंधश्रद्धांना विरोध आहे. मग त्या परंपरागत वा सनातन्यांच्या असोत की जैन बौद्धादी अवैदिकांच्या असोत, वा ख्रिश्चन-मुसलमानांच्या असोत.**

सावरकरांनी मुस्लिम, ख्रिश्चन, ज्यू, पारशी यांना हिंदुत्वातून वगळले आहे पहिली गोष्ट अशी की, या सर्वांची पवित्र धर्मभूमी भारतापेक्षा वेगळी आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे हे धर्म फक्त आमच्याच मार्गाने मोक्षप्राप्ती होईल, अन्य मार्गाने तुम्ही नरकात जाल असे मानतात. ह्याउलट हिंदुधर्म कोणत्याही मार्गाने गेले तरी मोक्षप्राप्ती होईल असे मानतो. ख्रिश्चन व मुसलमान हे दोन्ही धर्म अत्यंत आक्रमक व प्रचारी आहेत. तसेच ते संस्थात्मक आहेत. हिंदूचे मात्र तसे नाही.

मुस्लिम व ख्रिश्चन लोक हे ह्या भूमीच्या परंपरेपासून दूर झालेले आहेत. त्यानी, विशेषतः मुस्लिमानी परकीय धर्माबरोबर, तिकडच्याच सांस्कृतिक परंपराचा स्वीकार केलेला आहे. आपले पूर्वज हिंदू होते ह्याची लाज त्यांना वाटते. त्याऐवजी आपला वंशसंबंध अरब, इराणी, तुर्की, अफगाणी इत्यादी आहे हे दाखविण्याचा प्रयत्न मुस्लिमाकडून केला जातो हेही सावरकरांनी दाखवून दिले आहे. हिंदुस्थानातील ख्रिश्चन व मुसलमान हे ह्या देशातील हिंदूचेच रक्ताचे नातलग आहेत. त्यांच्या पूर्वजाना सत्तेच्या जोरावर, जबरदस्तीने वा फसवून वा अन्य विपरीत मार्गांनी धर्मांतरित केलेले आहे. **ज्यांनी धर्मतत्त्वे पटून धर्म बदलला अशांच्याबाबत परकीय सांस्कृतिक परंपरांचा स्वीकार होत नसतो हे रेव्ह. ना. वा. टिळकांसारख्या उदाहरणावरून दिसून येते.**

ब्रिटिशानी हेतुतः भारताचा विकृत व विपर्यासी इतिहासच शिकविलेला आहे. हिंदूचा इतिहास हा लाजिरवाणा तसेच पराभूतांचा इतिहास आहे असे बिंबविण्याचा प्रयत्न केला आहे. प्राचीन काळापासून इ. स. सातव्या शतकाअखेर ह्या भूमीवर वैभवशाली काळ होता. तत्पूर्वीच्या सर्व आक्रमकांना एक तर भूमिपुत्रानी पराभूत केले किंवा पचवून टाकले. इ. स. ७११ मध्ये महमद बिन कासीमची सिंधवरील स्वारी ही हिंदुस्थानच्या इतिहासातील वेगळी घटना. तेथपासून साधारणपणे ११०० इ. स. पर्यंत सतत आक्रमक टोळीवाल्या मुस्लिमांच्या सैन्याशी लढाई चालू होती. इ. स. १२०० पासून पुढे ह्या लढाया सीमावर्ती न राहता भारतभूमीवर लढल्या गेल्या.

मात्र ब्रिटिश भारतात येण्याच्या सुमारास भारताचे राजकारण मराठ्यांच्या, हिंदूच्या पूर्णपणे हातात होते. तेव्हा हिंदू हे अनेक शतके मुस्लिम व ब्रिटिश-ख्रिश्चन राज्यकर्त्यांविरुद्ध लढत होते, लढाई कायम स्वरूपात थांबलेली नव्हती, ही गोष्ट दडविली जाते. याउलट युरोप व मध्य आशियामध्ये, आशियामध्ये सर्व राष्ट्रे मुस्लिम आक्रमकापुढे शरणागत ठरली हे ध्यानात घेणे जरुरीचे आहे.

लोकमानसावर विलक्षण पकड असलेल्या म. गांधींना विरोध करणारी राजकीय भूमिका घेतल्याने, तसेच सर्व धर्मातील अंधश्रद्धांवर कडाडून टीका केल्याने व सावरकरांची ज्वलज्जहाल विज्ञाननिष्ठा सर्वसामान्य आमजनतेला पेलवणारी नसल्याने, पुष्कळ वेळा राजकारणातील सोयीसाठी राजकीय तसेच जातीयवादी नेते सावरकराचे प्रतिगामी, मध्ययुगीन, संकुचित, जातीयवादी असे चित्र उभे करतात. वस्तुतः ते बुद्धिनिष्ठ, विज्ञाननिष्ठ व जहाल तसेच कृतिशील सुधारक होते. त्यांच्या हिंदुत्व, हिंदुपदपादशाही व हिंदुराष्ट्रदर्शन ह्या ग्रंथातून त्यांचे विशाल विचार दिसतात. अर्थात अन्य अनेक ठिकाणीही त्यांचे हे विशाल विचार सापडतात.

## हिंदू नाहीत त्यांचे काय ?

मुस्लिम, ख्रिश्चन, अँग्लोइंडियन, ज्यू व पारशी याचे भवितव्य हिंदुराष्ट्रात काय ह्याबाबत सावरकरानी १९३९ च्या कलकत्ता अधिवेशनातील, तसेच अहमदाबाद येथील भाषणात, विविध लेख व उपरोक्त पुस्तके यांमध्ये हिंदुराष्ट्रवादाची भूमिका स्पष्ट केली आहे. **त्यांनी पारशी लोकांचे हिंदुराष्ट्रीय जीवनाच्या प्रवाहात मिसळून गेल्याबद्दल कौतुक केले आहे.** पारशानी ह्या देशाला आपली भूमी मानले आहे. एतद्देशीय भाषा, पोषाख इ. गोष्टींचा स्वीकार केला आहे. कोणत्याही सवलती मागितलेल्या नाहीत. फुटीरतेची भावना नाही. ते या देशाशी एकरूप झालेले आहेत. ज्यूदेखील त्यांचे धार्मिक व सामाजिक वेगळेपणा वगळता ह्या देशाशी समरस झालेले आहेत. त्यांनीदेखील सवलतीची मागणी केलेली नाही. पारश्यांचा कित्ता इतरानी म्हणजे ख्रिश्चन, अँग्लोइंडियन व प्रामुख्याने मुस्लिमानी गिरवावा अशी त्यांची अपेक्षा होती. ख्रिश्चनांबाबत ते म्हणतात की, त्यातील बरेच लोक राष्ट्रीय प्रवाहात आहेत. प्रामुख्याने प्रश्न मुस्लिमांचा आहे. ते प्रथम मुसलमान व नंतर भारतीय आहेत. नेमके हेच शब्द नुकतेच दिल्लीच्या जामा मशिदीचे इमाम सय्यद बुखारी यानी काढले आहेत! (१९८० मे/जून)

स्वतंत्र हिंदुस्थानात पारशी, ज्यू, ख्रिश्चन, अँग्लोइंडियन व मुस्लिम याना हिंदूप्रमाणेच स्थान राहील. हक्क व कर्तव्ये यात फरक असणार नाही. मात्र धार्मिक अल्पसंख्य म्हणून कोणतेही खास हक्क कोणालाही मिळणार नाहीत. समता व लोकशाहीच्या आधारे व दर्जानुसार सर्व राजकीय, प्रशासकीय जागा-सैन्यदलाच्यासुद्धा सर्वांना खुल्या राहतील.

या देशाचा अधिकृत धर्म हिंदू असेल, याचा अर्थ अन्य धर्मीयांची कत्तल होईल किंवा सक्तीने धर्मांतर केले जाईल असा होत नाही. त्यांनी असे दाखवून दिले आहे की, लोकशाहीचे माहेरघर समजले गेलेल्या इग्लंडला अधिकृत धर्म आहे. अँग्लिकन चर्च ह्या नावाने ओळखला जाणारा प्रॉटेस्टंट ख्रिश्चन पंथ इग्लंडचा अधिकृत असून केवळ नामधारी सत्ता असलेली राजपदावरील व्यक्ती फक्त ह्याच पंथाची असल्यास ह्या पदावर येऊ शकते. एवढेच नव्हे तर इंग्लंडच्या वरिष्ठ सभागृहात २५ धर्मगुरू सदस्य, धर्मातील विशिष्ट पद भूषवीत असल्याने पार्लमेंटचे पदसिद्ध सदस्य बनतात आणि तरीही तेथे लोकशाही आहे व सर्वांना पुरेसे धर्मस्वातंत्र्य आहे. हिंदुराष्ट्रवाद धर्मगुरूंना पार्लमेंटमध्ये स्थान देत नाही की खास हक्कही देत नाही. त्यामुळे धार्मिक अल्पसंख्यांना भिण्याचे कारण नाही व अन्य मतलबी लोकांनी हिंदुराष्ट्र झाल्याची खोटी भीती घालण्याचेही कारण नाही.

एखाद्या धर्म अधिकृत धर्म मानला तर धार्मिक अल्पसंख्यांकांवर अन्याय होईल ही भीती बाळगण्याचे कारण नाही. नेपाळ हिंदुधर्मी; परंतु तेथील मुसलमान सुखाने नांदत आहेत. त्याचप्रमाणे सिलोन, भूतान, ब्रह्मदेश हे बौद्धधर्मी असूनही तेथे अन्य धर्मीय नांदत आहेत. इंडोनेशिया मुस्लिमधर्मी असूनही तेथे अन्य धर्मी सुखाने नांदत आहेत सीरिया, लेबानन ह्या देशातून मुस्लिम धर्म अधिकृत असून तेथे ख्रिश्चनांची संख्या खूपच आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील. अशा परिस्थितीत हिंदुस्थानात अधिकृत धर्म हिंदु ठरवला तर असे काय आभाळ कोसळणार आहे ? ज्या देशात जे लोक बहुसंख्य, त्या देशावर त्या लोकाचीच छाप असते.त्याला अल्पसंख्यांकानी विरोध करून कसे चालेल ?

**अल्पसंख्यांकांना सुखाने जगू देणे ही जशी बहुसंख्यांकांची जबाबदारी तशीच अल्पसंख्यांकांनी बहुसंख्यांकांचे स्थान निरपवाद मान्य करणे व समाजहितविरोधी मागण्या न करणे ही त्यांची जबाबदारी नाही काय ?** भारतात मुस्लिमाची संख्या मोठी असल्याने मुस्लिम राष्ट्र परिषद 'राबात' येथे भरली असताना, त्यात सदस्य म्हणून सहभागी होण्याच्या अयशस्वी प्रयत्नानतर, निरीक्षक म्हणून फकरुद्दीन अली अहंमद गेले होते. ह्या पार्श्वभूमीवर नेपाळ-नरेशाना विश्व हिंदु परिषदेत येऊ नये असा सल्ला दिला जावा हे गैर दिसत नाही काय ?

'देवबद' ह्या ठिकाणच्या मुस्लिम धर्मपीठाचा शतसांवत्सरिक महोत्सव साजरा झाला. तेथे भाषण करताना पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी भारत हे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे मुस्लिम राष्ट्र आहे असे म्हटले. त्यानंतर काही दिवसांनी सुप्रसिद्ध पत्रकार व नवभारत टाइम्सचे माजी संपादक, ज्ञानपीठ पारितोषिकविजेते, सच्चिदानंद वात्स्यायन (अज्ञेय) हे साप्ताहिक 'हिंदुस्थान'मध्ये लिहितात (एप्रिल २७-१९८०) की, ज्या अर्थाने भारत हे सर्वात मोठे मुस्लिम राष्ट्र आहे त्याच अर्थाने सर्वात मोठे हिंदुराष्ट्र आहे !

भारतीय मुसलमानाना आपल्या परंपराना विरोधी अरबी, तुर्की, इराणी, दुराणी परंपरांबद्दल आस्था आहे. भारतात जे मुस्लिमराज्य होते ते वर उल्लेखिलेल्या आक्रमक राजाचे व त्यांची राजयंत्रणा प्रामुख्याने याच लोकांची होती. भारतीय मुसलमानाला ते हिंदूपेक्षा जवळचे मानत असले तरी हलकाच मानत होते. ह्या परकीय मुसलमानानीच एतद्देशीयांचे जे जुलूमजबरदस्तीने धर्मांतर केले, त्यांची संतती म्हणजे आजचे भारतीय मुस्लिम होत, ही गोष्ट दुर्लक्षिली जाते. अपवाद म्हणून एखादा टक्का धर्मतत्त्वे पटल्याने, तर दोनचार टक्के लालचीने किंवा काही ऐहिक स्वार्थ साधतो म्हणून स्वखुषीने धर्मांतरित झालेले असतील.

भारतीय मुसलमान येथील परंपरेबद्दल अभिमान बाळगू लागले तर चित्र बदलेल. राम, कृष्ण, बुद्ध, महावीर हे देव किंवा देवदूत म्हणून मानले नाहीत तरी थोर पूर्वज मानाल की नाही ? वेद हे अपौरुषेय व ईश्वरीय धर्मग्रंथ म्हणून मानले नाहीत, जसे जैन, बौद्ध, शीख मानत नाहीत तरी ते जगातील सर्वात जुने वाङ्मय मानणार की नाही ? धार्मिक भाग वगळून बाकी सर्व मानाल की नाही ?

मुस्लिम धर्म अधिकृत धर्म असलेल्या पाकिस्तानने, पाकिस्तानची माहिती देणारी जी सरकारी पुस्तिका प्रसिद्ध केली आहे, त्यात महंमद बिन कासीम हा आक्रमक अरब होता, असे म्हटले असून एतद्देशीय 'हिंदु' राजा दाहीरचा आपला पूर्वज म्हणून गौरवाने उल्लेख केला आहे. तसेच सुप्रसिद्ध संस्कृत व्याकरणकार हिंदुधर्मीय पाणिनीचाही पूर्वज म्हणून गौरव केला आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

भारताची फाळणी झाल्यावर सर्व मुस्लिम पाकिस्तानात व पाकिस्तानातील सर्व मुस्लिमेतर भारतात अशी लोकसंख्येची अदलाबदल झाली असती तर सध्याच्या भारतीय मुस्लिमाच्या दृष्टिकोणात आपोआपच हा स्वागतार्ह बदल झाला असता व भारतातील प्राचीन, मध्ययुगीन वैभवशाली परंपरेचा अभिमान त्यांच्यामध्ये निर्माण झाला असता त्यामुळे हिंदुराष्ट्रवादाचा बराचसा जोर नाहीसा झाला असता असे वाटते. स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदुराष्ट्रवादी प्रबळ होते. फाळणीनंतर स्वातंत्र्यकाळात त्याचे राजकीय सामर्थ्य कमी होते. मात्र मुस्लिम फुटीरतावादी व जातीयवादी सक्रिय झाल्यावर पुन्हा हिंदुराष्ट्रवादाचे बळ वाढीस लागल्याचे दिसू लागले. १९७१ मध्ये पाकिस्तानचे दोन तुकडे झाल्यावर पुन्हा हिंदुराष्ट्रवादी मागे पडल्याचे स्पष्ट दिसते. त्यानंतर मुस्लिम फुटीरतावादी व जातीयवादी बळकट होऊ लागल्याबरोबर हिंदुराष्ट्रवादाचेही बळ वाढीस लागलेले दिसते. हा चढउतार दिसण्याचे कारण हिंदुराष्ट्रवाद ही मुस्लिम फुटीरता, जातीयवादाची प्रतिक्रिया आहे हेच होय.

मुख्य प्रवाहात सामील होऊन हिंदुराष्ट्रवादी ही गोष्ट साध्य करू शकले असते; पण अल्पमत स्वीकारून कडवे हिंदुराष्ट्रवादी एकटे पडले व सतत सत्तेच्या बाहेर राहिल्याने त्यांचे ईप्सितही साध्य करू शकलेले नाहीत. इंग्लिश नॅशनॅलिझम व इंडियन नॅशनॅलिझम या दोन्हीतील 'नॅशनॅलिझम' मध्ये जसा मूलभूत फरक नाही तसाच इंडियन नॅशनॅलिझम व हिंदु नॅशनॅलिझम यात मूलभूत फरक नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

## प्रश्नोत्तरे, आक्षेप, उत्तरे

प्रश्न १ : हिंदुराष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान प्रतिक्रियात्मक आहे असा निष्कर्ष काढलेला आहे. तो मान्य केल्यास त्याचे तत्त्वज्ञान म्हणून मूल्य कमी होते.

उत्तर : मी आपल्याशी सहमत आहे.

प्रश्न २ : भावात्मक भाग नाही हा दोष आहे.

उत्तर : मी आपल्याशी सहमत आहे.

प्रश्न ३ : 'पुण्यभू' मध्ये धार्मिक भाग येतो.

उत्तर : रूढ अर्थाने धार्मिक भाग येत नाही. कारण भारतात उत्पन्न झालेल्या सर्व संप्रदाय व पंथ ( रिलिजन्स ) याचा त्यात समावेश होतो. एखाद्या विशिष्ट पंथालाच विशेष स्थान दिलेले नाही.

प्रश्न ४ : 'हिंदू लॉ' हिंदूशिवाय बौद्ध, जैन, शीख यांनासुद्धा लागू होईल असे तुम्ही म्हटले आहे. म्हणजे सरकारच्या सोयीसाठीचा हा कायदा आहे, तो म्हणजे धर्माची व्याख्या नव्हे.

उत्तर : मूळ घटनेत जे म्हटले आहे ती हिंदुधर्माची व्याख्या असे मी म्हटलेले नाही. हिंदू कोण हे त्यावरून कळते, तसेच व्याख्यानाच्या सुरुवातीस सांगितलेला हिंदू व हिंदुधर्म यातील फरक लक्षात घ्या. त्यात गल्लत करू नका. शिवाय हिंदुराष्ट्रवाद तुम्ही सांगितलेल्या कोणत्याही एका संप्रदायाचा पुरस्कार करीत नाही.

प्रश्न ५ : हिंदुधर्माचा ग्रंथ वेद. त्यात हिंदू शब्दाचा उल्लेख का नाही ?

उत्तर . वेदात सिंधू शब्दाचा उल्लेख आहे. हिंदु हा शब्द भारतीयेतर भाषात निर्माण झालेला आहे म्हणून त्याचा उल्लेख येणे शक्य नाही.

प्रश्न ६ : हिंदू शब्द भारतीय नाही मग तो आपण आपल्यासाठी वापरणे सोडून दिले पाहिजे.

उत्तर : हिंदू शब्द केवळ परकीयांनी दिलेले नाव आहे किंवा परकीय शब्द आहे म्हणून सोडायचा ठरवला तर भारतीय नसलेल्या अनेक गोष्टी आपण स्वीकारलेल्या आहेत. त्यासुद्धा सोडावयास पाहिजेत इंडिया, इंडियन हे शब्दसुद्धा परकीयच आहेत, तेही सोडले पाहिजेत. इंग्रजी भाषा, अनेक आधुनिक वस्तू, यंत्रे, तंत्रे हीही सोडावी लागतील. शिवाय आपण स्वतःला काय म्हणवतो ह्यापेक्षा लोक आपल्याला काय नावाने ओळखतात ते लक्षात घेणे आवश्यक आहे लो. टिळकाचे संपूर्ण नाव विचारले असता 'बाळ गंगाधर टिळक' असेच उत्तर सर्वांकडून मिळेल; पण त्याचे ठेवलेले नाव वेगळेच होते !

प्रश्न ७ : आर्य उत्तर ध्रुवावर राहत होते असे लो. टिळकांचे मत आहे. मग उत्तर ध्रुव ही आमची पितृभू व पुण्यभू ठरते. त्यामुळे ते सावरकरांच्या वर दिलेल्या व्याख्येप्रमाणे 'हिंदू' ठरत नाहीत.

## प्रसंगानुरूप बदल

उत्तर : आर्यवंश हा शब्दप्रयोग चूक आहे. आर्य म्हणजे श्रेष्ठ त्याचा वंशाशी संबंध नाही असे अनेकाचे मत आहे उदा. डॉ. बी. आर. आंबेडकर. दुसरे असे की, नॉर्डिक वंशाचे ज्याला तुम्ही आर्य वंशाचे असे म्हणता—लोक सध्याच्या भारतीय लोकात मिसळून गेलेले आहेत. त्याना वेगळे काढता येणार नाही व हिंदूमध्ये तथाकथित आर्यासह अनेक अनार्य वंशाची झालेली संकरित संतती म्हणजे भारतीय हे लक्षात घेतले पाहिजे

तिसरे असे की, लो. टिळकानी जरी आर्य उत्तरध्रुवावरचे मूळचे होते असे सशोधनाने सिद्ध करण्याचा प्रयत्न केला असला तरी ते निरपवादरीत्या मानण्यात आलेले नाही. चवथे असे की, काही तज्ज्ञांच्या मते उत्तरध्रुव ही एका जागी स्थिर असणारी गोष्ट मानतो, तसे नसून, पृथ्वीच्या आयुष्यात उत्तर व दक्षिण ध्रुव बदलत गेलेले आहेत. एके काळी बिहारमध्ये उत्तरध्रुव होता असे काही अभ्यासकांचे मत डॉ बी. आर आंबेडकर यांनी 'हू वेअर द शूद्राज' ह्या त्यांच्या ग्रंथात देऊन, आर्य भारताबाहेरून कोठूनही आलेले नव्हते तर ते येथील रहिवासी होते, असा सिद्धांत माडला आहे. पाचवे असे की, वेदात घोडा व वृष किंवा बैल ह्या दोन प्राण्याचा वारंवार उल्लेख आहे व हे दोन्ही प्राणी उत्तर ध्रुव व त्या भोवतालच्या शीत कटिबंधीय प्रदेशात आढळत नाहीत. हेही आर्यांचे मूलस्थान ठरविताना विचारात घेतले पाहिजे. सहावे असे की, पृथ्वीच्या कवचाचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ असे सांगतात की, एके काळी दक्षिण भारत, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, दक्षिण अमेरिका हे सर्व भाग एकत्र जोडलेले होते व हिमालयाच्या जागी समुद्र होता. सातवे असे की, मानववंशशास्त्रज्ञ, भारत, ऑस्ट्रेलिया, द. आफ्रिका, द. अमेरिका इत्यादी ठिकाणच्या वनवासी जमातीमध्ये विविध साम्ये दर्शवितात. तसेच पशुपक्षी, वनस्पती यामध्येही साम्य आढळते, हेही विचारात घ्यावे लागेल. आठवे असे की, हिंदूमधील ज्या संप्रदायाची व पंथाची स्थापना एखाद्या व्यक्तीने, आचार्य, संस्थापकाने केलेली आहे ते भारतातच होते. हे ऐतिहासिक सत्य आहे याउलट आर्यांचा म्हणून म्हटलेला जो संप्रदाय, त्याचा अमुक एक संस्थापक आहे व अमुक इतकी वर्षे स्थापना होऊन झालेली आहेत असे सांगता येत नाही. तर ती सतत बदलत जाणारी जीवनपद्धती आहे असेच फक्त म्हणता येईल. त्यात प्रसंगानुरूप बदल होत गेले. त्यातले काही बदल योग्य तर काही अयोग्य होते असे फार तर म्हणता येईल. यज्ञपूर्व अवस्थेतून यज्ञावस्थेत, त्यानतर मूर्तिपूजेत व त्यानंतर मूर्तिरूप दैवताच्या भक्तांची भांडणे व भांडणावरील शंकराचार्यांचे पंचायतनाचे उपाय, गोमांसभक्षणापासून गोपूजा व शाकाहारापर्यंत इ. सतत होणारे बदल पूर्वग्रहरहित होऊन अभ्यासण्यासारखे आहेत. एवढेच नव्हे तर जातिभेद व अस्पृश्यता नाहीशी करण्याचे व शुद्धी करण्याचे हिंदुराष्ट्रवाद्यांचे प्रयत्न हे नव्या होऊ घातलेल्या बदलाचेच निदर्शक मानावे लागतील.

प्रश्न ८ : भारतीय संस्कृतीत मुस्लिमानी भर घातली आहे, त्याकडे कसे दुर्लक्ष करता येईल ?

उत्तर : पहिली गोष्ट अशी की, मुस्लिमांनी भारतीय संस्कृतीत जी भर घातलेली आहे असे म्हटले आहे, त्यातील खरोखरच किती भर त्यानी घातली आहे ते तपासून पहावे लागेल. आपला मुस्लिम व ख्रिश्चन आक्रमकाच्या काळातील बराच इतिहास खोटा लिहिला गेला आहे–एक उदाहरण 'ताजमहाल'. हा कोणी बांधला ? आपण शहाजहानचे नाव घेतो; पण खुद्द बादशहानाम्यात तो शहाजहानने बांधल्याचा उल्लेख नाही. इतरही असे अनेक पुरावे आहेत. इतिहास नि पक्षपातीपणाने तपासून पाहिला पाहिजे हे खरे. अर्थात हा एक मोठा व स्वतंत्र विषय आहे म्हणजे एवढेच की, जी भर त्यानी घातलेली आहे तेवढेच श्रेय त्याना द्यावे. दुसरे असे की, त्यानी ज्या चांगल्या गोष्टीची भर घातलेली आहे असे सिद्ध होईल ती नाकारण्याचा प्रश्नच येत नाही.

प्रश्न ९ : भारत, नेपाळ समधर्मी असूनही वेगळी राज्ये आहेत.

अनेक मुस्लिम वा ख्रिश्चन धर्मांचे खूप लोक असूनही वेगळी राज्ये आहेत त्याचे काय ?

उत्तर : स्वतंत्र भारताने नेपाळमधील राजाशाही नष्ट करायला मदत केल्यानंतर नेपाळचे त्या वेळचे राजे त्रिभुवन यांनी भारतात वलीन व्हावयाची इच्छा प्रदर्शित केलेली होती; पण पंडित नेहरूंनी ते मान्य केले नाही. आता तो प्रश्न आंतरराष्ट्रीय राजकारणाचा बनला आहे. तसेच नेतृत्वाच्या राजकीय स्वार्थाचा अगर महत्त्वाकांक्षेचा बनला आहे. जसे आपल्या भारतातील पांडिचेरी-सारखे केंद्रशासित प्रदेश आपल्या भाषेच्या प्रांतात विलीन होण्यास तयार नाहीत. कारण तेथे नेत्याचा प्रामुख्याने राजकीय स्वार्थाचा भाग आहे.

प्रश्न १० : भारतीय संस्कृतीत आर्यांखेरीज आर्यपूर्व संस्कृतीचा मोठा वाटा आहे, अवैदिकाचाही मोठा वाटा आहे, त्याचे काय ?

## उदारमतवाद

उत्तर : हिंदुराष्ट्रवाद आर्य-आर्यपूर्व-आर्येतर सर्वांचा हिंदू संस्कृतीत असलेला कमीअधिक सहभाग आदरपूर्वक मान्य करतोच. त्यात मतभेद नाहीत. हिंदुराष्ट्रवाद म्हणजे आर्यांचा राष्ट्रवाद आहे, तसेच तो ब्राह्मणवाद आहे व तो अनार्यांच्या, ब्राह्मणेतरांच्या विरुद्ध आहे ही फारच चुकीची समीकरणे आहेत व पुष्कळ वेळा राजकीय कारणास्तव ती मांडली गेली.

प्रश्न ११ : उदारमतवादी परंपरेला लागलेले ग्रहण म्हणजे हिंदुराष्ट्रवाद असे अनेकांना वाटते, त्याचे काय ?

उत्तर : अगदी अलीकडील काळ सोडला तर युरोप, मध्य आशियामधील भागात धार्मिक अल्पसंख्यांकाचे प्रमाण व प्रकार आणि भारतातील विविध उपासना करणाऱ्यांची संख्या व प्रमाण पहा म्हणजे लक्षात येईल की, भारतातील उदारमतवादी परंपरा फार प्राचीन व अखंडित स्वरूपात चालत आलेली आहे. हिंदुराष्ट्रवाद ही परंपरा मानतो. काहींच्या मनात हिंदुराष्ट्रवाद म्हणजे एका विशिष्ट धर्मपंथाची लष्करशाही असे समीकरण असेल तर हिंदुराष्ट्रवाद्यांनी ते दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यातून प्रामाणिक मते असलेल्यांची भीती दूर होईल. मात्र अन्य लोकांचे समाधान हिंदुराष्ट्रवादी सर्वसत्ताधारी बनल्याशिवाय करता येणार नाही. कारण तेव्हाच पुरावा मिळू शकेल मात्र फुटीरतेकडे जाऊ इच्छिणाऱ्यांनासुद्धा ते स्वातंत्र्य असावे असे म्हणता येणार नाही व जगातील कोणतेही राष्ट्र हे स्वातंत्र्य देत नाही. ह्याला उदारमतवादाला विरोध असे म्हणता येणार नाही.

प्रश्न १२ : धर्माने मोक्षप्राप्तीपुरते सांगावे या जगातील गोष्टी राज्याने कराव्या अशी फारकत गांधीजींनी केली आहे. त्यावर हिंदुराष्ट्रवादाचे मत काय ?

उत्तर : हिंदुराष्ट्रवाद ह्या मताशी सहमत आहे.

प्रश्न १३ : धर्माधिष्ठित राज्य लोकशाहीशी विसंगत आहे त्याचे काय ?

उत्तर : इंग्लंडमध्ये अधिकृत धर्म अँग्लिकन चर्च हा आहे व राजपदावरील व्यक्ती त्या पंथाची सर्वश्रेष्ठ धर्मगुरू मानली जाते. इंग्लंड हे लोकशाहीचे माहेरघरही मानले जाते. त्यामुळे लोकशाही व धर्माधिष्ठित राज्य ह्यामध्ये विसंगती असलीच पाहिजे असे नाही. शिवाय हिंदुराष्ट्रवाद इंग्लंडचे उदाहरण अनुकरणीय मानतो. कारण हिंदुराष्ट्रवाद लोकशाही व धर्मस्वातंत्र्य मानतो. मात्र एखाद्या धर्मातील विसंगत गोष्टीमुळे इतरांच्या धर्मपालनात व्यत्यय येत असेल, तसेच समाजहितविरोधी वेगळी चाल चालण्याला त्यांचा विरोध आहे.

प्रश्न १४ : व्यक्ती तितक्या प्रकृती 'वन मॅन वन व्हॅल्यू' हे हिंदुराष्ट्रवादात मान्य आहे काय ?

उत्तर : होय, मान्य आहे. ती ह्या देशाची परंपरा आहे.

प्रश्न १५ : धर्माधिष्ठित राज्य म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद नाही.

उत्तर : असे समीकरण मांडणे प्रत्येक वेळी बरोबर ठरणार नाही. वर इंग्लंडचे उदाहरण दिलेले आहेच.

प्रश्न १६ : सावरकरांचा विज्ञानपुरस्कार शुद्ध नाही. तो सामर्थ्याचा पुरस्कार आहे.

उत्तर : सावरकरांच्याबद्दल बरेच गैरसमज आहेत. त्यातील हा भाग आहे. सावरकरांची विज्ञाननिष्ठा ही शुद्ध बुद्धिनिष्ठ आहे. त्यांनी विश्वबंधुत्वाचा विश्वराज्याचा, पुरस्कार केलेला आहे. मात्र ते व्यवहारी आहेत. इतरांइतकीच त्याबाबत पुढे जाण्याची त्यांची तयारी आहे. त्यापेक्षा जास्त नाही. त्यांचा हिंसेचा पुरस्कार व अहिंसेचा विरोध हेही मर्यादितच आहे. मात्र त्यांच्या दृष्टीने हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हे तातडीचे कार्य होते व ते फक्त हिंदुसमाजच करू शकेल व त्यासाठी हिंदुसमाज सामर्थ्यसंपन्न होणे आवश्यक आहे. तसेच हिंदुसमाजामध्ये एकता निर्माण करणे व तो शस्त्रसज्ज करणे आवश्यक आहे. शिवाय ह्या गोष्टी प्रवाहाच्या विरुद्ध पोहोचण्याच्या प्रकारातील होत्या. त्यामुळे त्यांनी सामर्थ्यावर खूपच भर दिलेला आढळतो.

प्रश्न १७ . देशातील एकात्मतेला हिंदुराष्ट्रवादामुळे तडे जाणार नाहीत का ?

उत्तर : श्रीमती इंदिरा गांधींसारखे कणखर व गतिमान व सामर्थ्यशाली नेतृत्व हिंदुराष्ट्रवादामध्ये निर्माण झाले तर विघटन होणारच नाही. ब्रिटिशांनी मुस्लिमांच्या लग्न, घटस्फोट व वारसा वगळता बाकी सर्व गोष्टी मुस्लिम कायद्याऐवजी ब्रिटिश कायद्याखाली आणल्या तेव्हा मुस्लिमांनी कठोर विरोध केला.

प्रश्न १८ : खोजा मुस्लिमांचे धर्मगुरू आगाखान भारतात होऊन गेले. त्यामुळे खोजा मुस्लिमांची भारत ही 'पुण्यभू' व वाडवडील भारतीय म्हणून 'पितृभू.' मग ते हिंदु आहेत का ?

उत्तर : माझ्या माहितीप्रमाणे आगाखान इराणी आहेत; परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे आगाखान हे मुस्लिम धर्मामधील एका पंथाचे प्रमुख आहेत व मूळ मुस्लिमधर्म अरबस्थानात निर्माण झाला. सर्व मुस्लिमपंथ मक्का हे धर्मस्थान व महंमद हा धर्मसंस्थापक होता असे मानतात. त्यामुळे खोजा मुस्लिमांची भारत पुण्यभू आहे असे म्हणता येणार नाही. आईवडील भारतीय म्हणून 'पितृभू' म्हणता येईल.

प्रश्न १९ : भारतीय ख्रिश्चनांचे वाडवडील भारतीय म्हणून भारत त्यांची पितृभू आहे व से. झेवियर्स धर्मगुरु भारतात होऊन गेले म्हणून भारत पुण्यभू तेव्हा ते हिंदू आहेत का ?

उत्तर : भारतीय ख्रिश्चनांची तसेच मुस्लिमांची भारत ही पितृभू आहे यात शंका नाही; परंतु त्यांचा मूळधर्म व धर्मसंस्थापक हे अरबस्थानातील आहेत. त्यामुळे भारत पुण्यभू मात्र ठरत नाही. से. झेविअर्स हे माझ्या माहितीप्रमाणे युरोपियन होते.

प्रश्न २० : हिंदू लॉ ज्यांना लागू आहे त्या सर्वांना हिंदू म्हणावे असे गोळवलकरगुरुजी म्हणतात. खोजा व बोहरी मुस्लिमांना हिंदू लॉ लागू आहे. तेव्हा त्यांना हिंदू म्हणता येईल का ?

उत्तर : अद्याप गोळवलकरगुरुजीविषयीचा माझा अभ्यास नाही. त्यामुळे त्यांच्याबद्दल मला सांगता येत नाही. मात्र बोहरी खोजा मुस्लिमांना हिंदू लॉ लागू नाही हे खात्रीपूर्वक सांगतो. □

श्यामचा संसार (कथा १८ वी)

फिरोझ रानडे

# लेखक होण्याची हौस व श्याम

"तुम्हाला कसली हौसच नाही बघा!" एक दिवस राधा कोठला तरी दिवाळी अंक वाचता वाचता म्हणाली.

'म्हणजे? हा संसार मुलाबाळांनी बहारलाय तो काय हौशीशिवायच काय?' श्यामचे लगेच उत्तर.

'तुम्हाला त्याच्याशिवाय काही सुचतच नाही का हो? त्या हौशीला काय अक्कल लागते? मी म्हणते, काही लेख लिहाल, गोष्टी लिहाल. गाण शिकणं वा तबला पेटी वाजवायला शिकणे आता तुम्हाला शक्यही नाही व ते योग्यही नाही. त्या अर्थी तुम्हाला कसली हौस म्हणून नाही म्हणत होते मी!' असे म्हणून राधा स्वैपाकघरात निघून गेली.

हिंदी सिनेमाचा एक फायदा झाला आहे तो म्हणजे माणसाला Flash-back पद्धतीने जुन्या गोष्टी आठवता येतात. त्या पद्धतीने श्याम विचार करू लागला.

एका अर्थी राधाचे म्हणणे खरे आहे. आपल्यासारख्या मध्यमवर्गातल्या, मध्यम बुद्धीच्या, मध्यवर्ती सरकारातल्या, मध्यम प्रतीच्या अधिकाऱ्याला कसल्या आल्या आहेत हौशी, अपेक्षा, आकांक्षा वगैरे.

श्याम हायस्कुलातच असताना—कारण त्या वेळी शाळांची 'उच्चतर–माध्यमिक' वा 'माध्यमिक–उच्चतर' अशी अवघड नावे निघाली नव्हती. मॉन्टेसरी वगैरे वर्गांना तर श्यामचे वडील चक्क बिगार वर्ग म्हणत असत! तर श्याम हायस्कुलात असतानाच देशाला रक्ताचा अेकही थेंब न सांडता स्वातंत्र्य मिळाले होते! स्वातंत्र्य मिळण्याच्या आधी अतिशय बुद्धिमान विद्यार्थीमंडळी म्हणजे आपल्या चिंतामणराव देशमुखांसारखी वगैरे, फक्त देशभक्तीचा अेक मार्ग म्हणून I. C S. परिक्षांना बसत व यशस्वी होऊन नाव व पैसा मिळवत.

जे जरा कमी बुद्धिमत्तेचे होते पण अंगात काही तरी करण्याची धमक असणारे होते तेही देशभक्तीचा एक मार्ग म्हणून कुठे लोखंडी पलंग बनव, कुठे बिस्किटाचा कारखाना काढ, कुठे काचेचे सामान बनव, असे उद्योगधंदे काढत. अर्थात एक देशभक्तीचा मार्ग म्हणूनच! अर्थात त्यात चांगले पैसे मिळत; पण ते वेगळे!

त्या वेळी देशभक्तीचा आणखी अेक मार्ग होता तो म्हणजे देशभक्त होण्याचा! त्यांच्यात काकासाहेबानी म्हटल्याप्रमाणे नवशे हौशे व गवशे लोक असत व ज्याची जशी श्रद्धा असेल तसे त्याला फळ मिळत असे.

अशा रीतीने सर्व भारतीय जनता देशभक्त असल्यामुळे देशाला रक्ताचा थेंबही न सांडता स्वातंत्र्य मिळाले ह्यात नवलाची अशी काही गोष्ट झाली नाही.

श्याम मॅट्रिक ऊर्फ अेस. अेस. सी. झाला त्या वेळी देशाला स्वातंत्र्य मिळून चांगली ७–८ वर्षं झाली होती. त्यामुळे हौशीने करता येण्याजोगे देशभक्तीचे सगळे मार्ग बंद झाले होते. I. C. S. व्हावे तर सरकारने त्या परीक्षाच बंद करून टाकल्या होत्या. त्यामुळे देशसेवेचा तो सुलभ मार्ग बंद झाला होता. त्या पोलादी चौकटीअेवजी एखादी पितळेची वा प्लॉस्टिकची वा शक्यतो रबरी चौकट बनवता आली तर बघावी ह्या विचारात सरकार होतं. असा विचार करत थांबणं सरकारला शक्य होतं पण श्यामला नव्हतं.

प्रथम लहानसा कारखाना काढून मग तो वाढवत वाढवत न्यावयाचा व सर्व महत्त्वाच्या जागावर आपली मुले-बाळे चिटकवून टाकायची. मग अेका महिनी 'निश्चयाचे बळ तुका म्हणे तेची फळ' वगैरे मथळ्याखाली ह्या नायकाचे चरित्र यावयाचे. ह्या चरित्रात चरित्रनायक कसा थोर, कष्टाळू, सर्वांशी सम भावाने वागणारा, याचे कथन असे. अर्थात ह्या सगळ्या कर्तृत्वामागे त्याची हसतमुख पत्नी असे हे वेगळे सागणेनकोच. अशा लेखातनायकाचे आपल्या बायका-मुलाबरोबरचे छायाचित्र पण असे. हे सगळे दिवस आता संपले होते!

म्हणजे मुलाखत घेण्याचे दिवस संपले होते असे नाही! देवाच्या दयेने महाराष्ट्रात 'कष्टाळू', 'थोर,' व 'सर्वांशी समभावाने वागणाऱ्या', 'हसतमुख' माणसाची कधीही चणचण पडली नाही. अजुनी दर महिनी, दर मासिकी अशा मुलाखती येतच असतात. फक्त पूर्वीच्या मुलाखतीत व आताच्या मुलाखतीत दोन फरक जाणवतात.

पूर्वीच्या फोटोत नायक व त्याच्या पत्नीबरोबर फक्त मुलां-मुलींचे फोटो असत. आता साधारण मुलगा व स्मार्ट, बॉबकट केलेली सून व साधारण मुलगी व स्मार्ट 'बो' वगैरे लावलेला जावई व बहुधा हे जावईबापू कॅनडात वा अमेरिकेत असतात, अशा मुलाखती व असे फोटो येतात.

दुसरा फरक म्हणजे आता लहानसहान कारखाने काढण्याचे व तो हळूहळू मोठा करण्याचे दिवस संपले होते. आता कारखाना काढावयाचा म्हणजे परक्या कंपन्यांशी संधान बांधून भला मोठा कारखाना काढावा लागतो. अशा परिस्थितीत श्यामसारख्या माणसाने काय करावे असा प्रश्नच पडे.

अशा प्रश्नचिन्हांकित परिस्थितीत श्याम मॅट्रिक झाला. सर्व मध्यमवर्गातल्या पालकांप्रमाणे श्यामने डॉक्टर वा इंजिनियर व्हावे अशी श्यामच्या आई–वडिलांची इच्छा होती म्हणून श्याम सायन्सकडे गेला व इंटरसायन्स झाला. दुर्दैवाने त्या वेळी, ज्याच्यामुळे हल्ली मेडिकल वा इंजिनियरिंग प्रोफेशन्स रसातळाला जाताहेत त्या दलितवर्गाच्या लोकांकरता जागा रिझर्व्ह नव्हत्या. दुर्दैव अशाकरता की आता कोणाही ब्राह्मण मुलाला अॅडमिशन मिळाली नाही की त्याच्या पालकाला शेजार–पाजाऱ्याना, 'ना आम्ही शेड्युल्ड कास्टचे, ना आमच्याकडे देणगी द्यायला पैसा, आमच्या मुलाना कोण अॅडमिशन देणार!' असे मोठे घिटपणे सागता येते. पूर्वी असे नव्हते. अेखाद्याला मेडिकलला

वा इंजिनियरिंगला प्रवेश मिळाला नाही तर मुलगा जेमतेम असणार असेच लोक समजत.

श्यामलाही अशा भारी कोर्सला प्रवेश मिळाला नाही व लोक त्याला जेमतेम बुद्धीचा समजू लागले व तो तसा होताच. मग श्याम B. Sc. झाला व मध्यवर्ती सरकारात कोणत्या तरी खात्यात लागला व सिनियॉरिटीच्या जोरावर चढत चढत काही तरी deputy-assıtant वगैरे झाला. श्यामचा Flash-back संपायला व राधा चहा घेऊन यायला एकच गाठ पडली. श्याम गंभीरपणे विचार करतो आहे हे बघून राधाने श्यामला विचारले, 'मग काही लिहिण्याचा विचार चाललाय वाटत ?'

'लिहायचा विचार कसला करतेस ? आम्हा सरकारी-नोकराना x x खाजवायला पण वेळ नसतो !' श्याम हे वाक्य म्हणाला व त्याच्या मनात विचार आला की ही म्हण वा हा वाक्-प्रचार कसा काय आला असेल बुवा ? म्हणजे त्या वेळी लोक फार शांतपणे खाजवत असत की खाजवण्याचे क्षेत्रफळ फार मोठे असे ? श्यामला पडणाऱ्या प्रश्नातला एक !

अर्थात राधाला श्यामच्या xx खाजवण्या बाबतच्या पडलेल्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला बिलकुल वेळ नव्हता. तिने परत श्यामच्या मागे घोशा लावला. 'अहो, काही गोष्टी लिहा, प्रवासवर्णन लिहा, एखाद्याचे शब्दचित्र लिहा, निदान सगळ्यात सोपं म्हणजे विनोदी काही तरी लिहा. तुम्ही बोलता किती विनोदी व छान !'

'अग छान बोलणे वेगळे व विनोदी लिहिणे वेगळे,' श्याम म्हणाला. त्याचे छान व विनोदी बोलणे म्हणजे पुलंचे आठवून आठवून केलेले विनोद असत. 'त्यातून मी पडलो सरकारी नोकर; मी कसचा लिहितो?'

'मग सरकारी नोकराला काय काही लिहिता येत नाही ? अहो पु. ल. तर म्हणे पूर्वी अगदी पक्क्या सरकारी खात्यातल्या नोकरीत म्हणजे Incometax खात्यात होते आणि व. पु. म्हणे म्युनसिपालिटीमध्ये कुत्री पकडण्याच्या खात्यात आहेत.'

'शहाणीच आहेस ! व पु. काही त्या खात्यात कायमचे नाही आहेत काही !' वपू श्यामच्या कॉलेजचे विद्यार्थी व श्यामला त्यांचे लिखाण खूप आवडायचे. म्हणून तो राधाने वपूंची कुत्री पकडण्याच्या खात्यात कायमची बदली केली म्हणून राधावर रागावला.

'अग, कुठे पुल, कुठे वपू आणि कुठे बाकी सगळे विनोदी लेखक ? मला का जमणार आहे ते ?'

'न जमायला काय झालं ? आणि बाकीच्याना तरी कोठे जमतंय ? पण लिहिताहेतच ना एव्हढे लोक ?' राधा म्हणाली. ह्या राधाच्या म्हणण्यावर श्यामकडे उत्तर नव्हते. तो म्हणाला, 'बघू, करीन प्रयत्न !' ह्या उत्तराने राधाला खूप आनंद झाला व त्या आनंदात तिने श्यामला परत गरम गरम चहा दिला.

चहा पिता पिता श्याम परत Flash-back पद्धतीने विचार करू लागला. स्वातंत्र्यपूर्व काळात फडके, खांडेकर, अत्रे, काणेकर अशी भारदस्त मंडळी लिहायची. त्यामुळे लिहिणे हे काही येऱ्या-गबाळ्याचे काम नाही ह्याची श्यामलाच नव्हे तर सगळ्याना खात्री पटली होती. नंतर गोखले, गाडगीळ, माडगूळकरबंधू, पुल वगैरे लोक पुढे आले. प्रत्येकाची लिहिण्याची तऱ्हा वेगळी, विषय वेगळे. ह्या लोकांचं वाचून त्यांचं कौतुक करण्याचे दिवस होते हे. त्या वेळी कोणा बायकोने असा नवऱ्याकडे काही तरी लिहा म्हणून हट्ट केला असेल ? कोणालाही लिहिता येईल–लिहिणे म्हणजे अगदी सोपी गोष्ट आहे अशी भावना लोकाच्या मनात, सरकारी नोकर लिहायला लागल्यापासून वा स्त्री-लेखिका मोठ्या प्रमाणात लिहायला लागल्यापासून तर निर्माण झाली नाही ना ? श्यामच्या आपलं मनात आलं.

असे सात-आठ दिवस गेले. राधा दिसली की श्याम एकदम गंभीर होत असे. त्याचा गंभीर चेहरा पाहून तो काही तरी लिहिण्याबद्दल गंभीरपणे विचार करतो आहे असं राधाला वाटत असे. विनोदी लेख लिहायला इतका गंभीरपणे विचार करायला लागतो ह्याचे राधाला खूप आश्चर्य वाटले; पण तो काही लिहिण्याचा विचार करत आहे, त्याला disturb कशाला करा म्हणून राधा काही बोलत नसे. लेखन जरी झाले नाही तरी राधाची इतर भुणभुण कमी झाली ह्याचा श्यामला आनंद झाला. लेखन करायचे असले म्हणजे बायकांची भुणभुण कमी होते म्हणून तर महाराष्ट्रात मोठ्या संख्येने लोक लिहायला लागले नाहीत ना ? श्यामच्या मनात एक प्रश्न चमकून गेला !

राधाला जसे श्यामने लिहावे, प्रसिद्ध लेखक व्हावे असे वाटत होते तसे श्यामला पण मनोमनी वाटत असे. तसा त्याने एक-दोनदा कचेरीच्या वेळात व कचेरीच्या स्टेशनरीवर प्रयोग पण केला; पण काही केल्या चांगला विषयच सुचत नसे !

त्याचे कोणी मित्र लेखक नसल्यामुळे त्याच्या पुस्तकाना प्रस्तावना वगैरे लिहिण्याचा प्रश्न नव्हता. व्यक्ति-चित्रे लिहावी तर त्याच्या ओळखीच्या व्यक्ती इतक्या भिकार होत्या की त्याची कितीही चांगली चित्रे काढण्याचा प्रयत्न केला असता तरी ती चांगली येणेच शक्य नव्हते !

बरं, कोणाच्या एकसष्ठीवर वगैरे लिहावं तर त्या थोर माणसाची एकसष्टी झाली हे म. टा. मध्ये येणाऱ्या एखाद्या प्रख्यात लेखकाच्या लेखावरूनच श्यामला कळत असे. आता एवढ्या प्रख्यात लेखकाचा एकसष्टीचा लेख येऊन गेल्यावर श्यामचा लेख कोणी घेतला असता ?

नाटक वगैरे लिहिण्याचा श्यामने विचारच केला नाही. गोष्टी लिहाव्यात असे वाटे व कधी कधी काही चांगल्या कल्पना सुचत; पण राधाला काय वाटेल, शेजारपाजारचे लोक काय म्हणतील व आता घरात मुलेही मोठी झाली होती. या सगळ्या सारासार विचारामुळे त्याचा गोष्टी लिहावयास धीर होत नसे. गोखले-गाडगिळांच्या गोष्टीतल्या वाङ्मयीन गुणापेक्षा त्यांच्या धाडसाबद्दलच श्यामला मोठे कौतुक वाटत असे.

आता राहिले प्रवासवर्णन व विनोदी लिखाण. तसा सरकारी कामानिमित्त श्यामने भरपूर प्रवास केला होता. ज्याला official भाषेत 'टूर' म्हणतात; पण अशा कचेरीच्या कामाकरता काढलेल्या टूरांवर त्याला किती वाङ्मयीन 'टुर टुर' करता आली असती ! हल्ली आणखी एक ताप झाला आहे. तो म्हणजे प्रवासवर्णन म्हणजे विनोदीच असायला पाहिजे, अशी लोकाची अपेक्षा निर्माण झाली आहे. सरकारी प्रवास, त्याचे वर्णन विनोदी करू करू म्हटलं तरी विनोदी होणं शक्य नव्हतं. तेव्हा नाद सोडलेला बरा, असा श्यामन विचार केला. बरं विनोदी

लिहावं तर परत परत पुलंचे विनोद आठवत त्यामुळं तेही लिखाण शक्य नव्हतं!

एक दिवस श्याम कचेरीतून आला तोच मुळी मोठा उत्तेजित होऊन बुट काढत काढत ओरडला, 'Come on darling!'

'अहो, झालंय काय तुम्हाला! हे डार्लिंग डार्लिंग काय?' राधा लटक्या रागानं म्हणत स्वैपाकघरातून बाहेर आली.

'अग, असं डार्लिंग–डार्लिंग म्हणण्यासारखंच झालंय! मला मस्कत, म्हणजे ओमान नावाच्या देशाला पाठवताहेत फोरीनला?'

'म्हणजे अबु–डुबाई, बहारिन वगैरेच्या जवळ तर नाही?' राधा मस्कत कुठे असावं ह्याचा अंदाज करत म्हणाली.

'आपल्याला त्याच्याशी काय करायचंय?' श्याम म्हणाला. खरं म्हणजे मस्कत कुठे आहे हे त्याला पण माहीत नव्हतं; पण परदेशला जायला मिळणार म्हटल्यावर हिंदी माणूस भान विसरतो तसाच श्याम पण भान विसरला होता. त्यान कशाकरता जाणार, किती दिवसाकरता जाणार, किती पैसे मिळणार हे सर्व राधाला सांगितले; पण राधाच्या चेहऱ्यावरून ती काही दुसराच विचार करते आहे असं श्यामच्या लक्षात आलं.

'मी एवढं सांगतोय आणि तुझं लक्ष दुसरीकडे आहे.'

'अहो, आता ही सुवर्णसंधी सोडू नका!'

राधानेच असे म्हटल्यावर मग काय? श्याम राधाजवळ सरकला. 'अहो, तशी सुवर्णसंधी सोडू नका म्हटलं नाही,' राधा श्यामपासून दूर सरकत म्हणाली 'अहो, मस्कत, अबुडुबाई वगैरेवर प्रवासवर्णन कोणी लिहिलेले नाही. तुम्ही आता छानसं–विनोदी प्रवासवर्णन लिहा!'

'फक्त प्रवासवर्णन!' मी तर छानसं पुस्तकच लिहिणार म्हणतो!'

आपला नवरा विनोदी प्रवासवर्णनाचं पुस्तकच लिहिणार आहे म्हटल्यावर राधाला आनंदाचं नुसतं भरत आलं. त्या भरत्याचा श्यामला खूप नफा झाला हे वेगळे सांगणे नकोच!

□

पुस्तके

# पेरणी : किर्लोस्करांची संपादकीये

## पुरोगामी विचार, व्यापक दृष्टी आणि विधायक आशावाद

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळवणाऱ्या 'किर्लोस्कर' मासिकाचा हीरकमहोत्सव मध्यंतरी साजरा झाला एखादी व्यक्ती साठ वर्षे पूर्ण करते तेव्हा त्यात त्या व्यक्तीच्या कर्तृत्वापेक्षा तीवर निसर्गाची कृपा अधिक असते! पण एखाद्या नियतकालिकाबद्दल वा संस्थेबद्दल असे म्हणता येणार नाही. 'किर्लोस्कर' मासिक साठ वर्षे चालले, याला निश्चित काही एक अर्थ आहे. मासिकाचा अंक एक तारखेला वाचकाच्या हातात देणे आणि लेखकांना मानधन देणे हे व्यावहारिक गणित 'किर्लोस्कर'ला साधले हे तर खरेच आहे; पण 'किर्लोस्कर'ला आज जे स्थान आहे ते केवळ असल्या गोष्टींमुळे नाही. याहूनही महत्त्वाचे म्हणजे, आधुनिक महाराष्ट्राच्या साहित्यिक आणि वैचारिक प्रबोधनात 'किर्लोस्कर'ने आपल्या परीने सतत महत्त्वाचा वाटा उचलला आहे. मनांची मशागत करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या ह्या मासिकाला प्रथम कै. शंकरभाऊ किर्लोस्कर आणि नंतर पुढे सुमारे पस्तीस वर्षे श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांचे संपादन लाभले. मध्यंतरी हीरकमहोत्सवी समारंभात मुकुंदरावांनी नियतकालिकाच्या संपादकाला क्रिकेटच्या कप्तानाची उपमा दिली, त्यांच्या म्हणण्याचा आशय असा की, क्रिकेटच्या संघात कप्तान जितका महत्त्वाचा, तितकाच नियतकालिकाचा संपादक महत्त्वाचा! कप्तान स्वतः किती धावा काढतो हे महत्त्वाचे नाही; तर तो डावपेच कसे आखतो आणि उत्तम खेळण्यासाठी सहकाऱ्यांना स्फूर्ती कशी देतो हे महत्त्वाचे. मुकुंदरावांची ही उपमा वापरूनच एका वाक्यात त्यांचे कर्तृत्व सांगता येईल–मुकुंदराव किर्लोस्कर हे किर्लोस्कर प्रकाशनाचे माईक ब्रेअर्ली आहेत!

मुकुंदरावांच्या कारकीर्दीतील 'किर्लोस्कर' मासिकाच्या महत्त्वाच्या संपादकीय लेखांचे संकलन मध्यंतरी 'पेरणी' या नावाने प्रसिद्ध झाले आहे. हे संकलन करण्याचे काम मुख्यत. प्रा. प्रभाकर ऊर्ध्वरेषे आणि सौ. शांताबाई किर्लोस्कर यांनी केलेले दिसते. प्रसिद्ध पत्रकार श्री. अनंतराव भालेराव यांची सुरेख प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे!

मुकुंदरावांच्या प्रास्ताविकावरून एक गोष्ट जाणवते ती म्हणजे वृत्तपत्रीय स्फुट-लेखनाच्या आणि त्याच्या संग्रहाच्या मर्यादांची जाणीव त्यांना आहे. एक तर असे स्फुटलेखन एक–दोन पानात बसवावे लागते. त्यामुळे तपशील सांगण्यापेक्षा एखादा विचार त्यात मांडावा लागतो. घडामोडींचा प्रचंड वेग लक्षात घेता असे लेखन संदर्भशून्य किंवा विसंगत ठरण्याचीही शक्यता असते. वीसपंचवीस वर्षांचे लेखन एकत्र केले तर विचारांमधली तफावत जाणवण्याचा संभव असतो. कारण व्यक्तीच्या विचारांची बैठक बदलू शकते. या सर्व मर्यादांचा उल्लेख प्रास्ताविकात केलेला आहे. हा संग्रह वाचकांपुढे ठेवताना बाळगलेले हेतूही मर्यादित आहेत. ही स्फुटे वाचून 'जुन्या पिढीच्या वाचकांना काही क्षण पुनःप्रत्ययाचा आनंद जरी मिळाला व तरुण वाचकांना विचाराचा एखाद–दुसरा नवा स्फुल्लिंग जरी सापडला' तरी कष्टाचे सार्थक होईल, असे प्रास्ताविकात नमूद केलेले आहे. 'पेरणी'चे मूल्यमापन करताना मर्यादांची ही चौकट लक्षात घेणे आवश्यक आहे आणि ती जर लक्षात घेतली तर ह्या संग्रहाचे स्वागतच करायला हवे. तात्कालिक स्फुटांच्या या संग्रहातले प्रासंगिक संदर्भ काळाच्या ओघात फिकट होणार आहेत; पण ह्या लेखनाला असणारी वैचारिक बैठक

मात्र काळाच्या मर्यादांच्या पलीकडची आहे. पुरोगामी विचार, व्यापक दृष्टी आणि विधायक आशावाद या गोष्टींमध्ये ह्या संग्रहाचे महत्त्व सामावलेले आहे.

संपादकाची दृष्टी चौफेर असावी लागते. मुकुंदरावांच्या संपादकीयामधील विषयाच्या विविधतेवरून त्यांच्या चौफेर दृष्टीची कल्पना येते. स्वातंत्र्यप्राप्ती, गांधीहत्या, चीन व पाकिस्तानशी झालेली युद्धे, संरक्षणसिद्धता, लोकसंख्यावाढीचा प्रश्न, निवडणुका, भाषावार प्रांतरचना, आणीबाणी, जनता पक्षाचा विजय, जनता पक्षाचे विघटन, इंदिरा गांधींचे पुनरागमन इ. राष्ट्रीय महत्त्वाच्या घडामोडी व प्रश्नांबाबत या संपादकीय स्फुटांमध्ये चर्चा केलेली आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या संदर्भातील संयुक्त-महाराष्ट्राची मागणी, कोयना-प्रकल्प, कोकण-विकासाचा प्रश्न, कोयना-भूकंप, पानशेतच्या पुराची आपत्ती इ. विविध गोष्टींचीही चर्चा आहे. तसेच लोकशाही, स्वातंत्र्य, गांधीवाद, तरुणांचे प्रश्न, समाजसुधारणा, 'बंद'चा अतिरेक, शेतीचा प्रश्न इ. गोष्टींबाबतची तत्त्व-चर्चाही मुकुंदरावांनी केलेली आहे ह्या सर्व चर्चेतून प्रकट होणारे विचार 'किर्लोस्कर'च्या भूमिकेशी सुसंगत असेच आहेत. पंडित नेहरूंविषयीचा लेख हे याचे उत्तम उदाहरण आहे नेहरूंच्या विचारधारेशी 'किर्लोस्कर' ची वैचारिक कुंडली अनेक बाबतीत जुळते. त्यामुळे नेहरूंविषयीचे मार्मिक विश्लेषण साहजिकच प्रभावी झाले आहे.

अग्रलेख वा संपादकीय लेख दोन गोष्टीमुळे संस्मरणीय होऊ शकतात. एक म्हणजे घणाघाती, आक्रमक असे विचारप्रतिपादन किंवा दुसरी म्हणजे साहित्यिकदृष्ट्या अतिशय सुंदर अशी शैली. मुकुंदरावांच्या संपादकीयामध्ये या दोन्ही गोष्टींचा काहीसा अभावच आहे. कारण आपले चिंतनशील लेखन विधायक सौम्यतेने आणि शक्यतेवढ्या सुबोधतेने सादर करण्याकडे त्यांचा कल आहे अशा लेखनाचे काही महत्त्व निश्चितपणे असते. श्री. अनंतराव भालेराव यांनी मुकुंदरावांच्या कर्तृत्वाबद्दल आणि शैलीबद्दल अतिशय सुन्दर विवेचन केले आहे. उदा. ते म्हणतात, 'कमी वाव असूनही मुकुंदरावांनी मासिकांच्या प्रकाशकीय निर्देशांना संपादकीयाचे स्वरूप दिले. अभ्यासक्रमातलेच धडे शिकवायचे परंतु मास्तर लक्षात राहावा असे शिकवायचे. माझ्या मते मुकुंदरावांनी नियतकालिकांच्या इतिहासाला दिलेली ही स्वतःची देणगी आहे. विहित मर्यादांचा भंग न करता त्यांना हे करावे लागले. त्यामुळे त्यांची शैली, त्याचे प्रतिपादन, त्याचा आविष्कार, त्याचे आविर्भाव आणि त्यांची भाषा यांना निराळाच आकार मिळाला. दैनिकाच्या संपादकाइतके मैदान नाही, शब्दांना शास्त्राचे प्रयोजन नाही, वाचकाना झपाटून टाकणारी पल्लेदार भाषा व मनाचा ताबा घेणारी शैली त्यांना वापरता आली नाही. एखाद्या प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञांना जेवढा संयम व थबकते संशोधन करावे लागते तेच मुकुंदरावांना किर्लोस्करच्या प्रयोगशाळेत करावे लागले. म्हणून त्यांच्या भाषेला सुबोधता आणि साधेपणाचा घाट मिळाला. उगाच शब्दांचे जडाव नाहीत. मोजक्या शब्दांच्या साहाय्याने मुकुंदरावांची भाषा व त्यांची शैली वाचकाची संगत करताना दिसते... त्यांची संपादकीये म्हणून 'गुफ्तगू' सारखी असतात. ताडन कमी, आर्जव आणि विश्वास अधिक' यावर वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नाही. सुबोधपणे लिहिताना मुकुंदराव सामान्य वाचकाना डोळ्यासमोर ठेवत असले पाहिजेत. या दृष्टीने ते वारंवार ज्या उपमा देतात, म्हणींचा वा प्रसिद्ध उद्गारांचा जो उल्लेख करतात तो फार प्रभावी ठरतो असेच म्हटले पाहिजे. छोट्या संदर्भातून व्यापकतेकडे वाचकांना नेण्याची त्यांची हातोटी लक्षणीय आहे.

उदा. भारत स्वतंत्र झाला या घटनेबद्दल आनंद व्यक्त करताना 'स्वातंत्र्य म्हणजे परकी सत्तेचा अभाव' अशा नकारात्मक (निगेटिव्ह) विचारापलीकडे आपल्या कल्पनाशक्तीची धाव चटकन जातच नाही.' असे स्पष्टपणे नमूद करून ते लगेच आपली व्यापक भूमिका विस्ताराने मांडतात. (पृ. ३ ते ९) युद्धसज्जतेविषयी लिहिताना प्रत्येक व्यक्ती ही अप्रत्यक्ष रीतीने सैनिकच असते हे ते सांगून जातात. (पृ. २४) तेनसिंगच्या पराक्रमाबद्दल लिहिताना 'आता लक्षावधी तेनसिंग हवेत' अशी त्यांची हाक असते. येथे तेनसिंग ही व्यक्ती नव्हे तर प्रवृत्ती म्हणून ते विचारात घेतात. (पृ. ४४ ते ४६) सिंहस्थमेळाव्याच्या निमित्ताने लिहिताना नुसत्या मेळाव्यावरच टीका न करता ते खोलात जाऊन म्हणतात, 'आमचा देश मोठा गमतीशीर आहे. तेथे वृक्षारोपणासाठी प्रतिवर्षी लक्षावधी रुपये खर्च केले जातात; परंतु या देशातील जनतेच्या मनात नव्या विचाराची पेरणी करण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न करण्याचे भान मात्र कुणालाच असत नाही. लुळ्यापांगळ्या गायीबैलांची निगा राखण्यासाठी येथे मोठमोठे पांजरपोळ राखले जातात; परंतु अडाणी जनतेला अंधश्रद्धेच्या रूढीपरंपरेच्या चिखलातून बाहेर काढण्यासाठी खटपट करण्याची आवश्यकता मात्र कोणालाच जाणवत नाही ! (पृ ५१)

या संपादकीयाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आशावादी दृष्टी. अशा दृष्टीची सुधारणेसाठी आणि विशेषतः दुःस्थितीतून बाहेर पडण्यासाठी फार आवश्यकता असते. कोयनेच्या भूकंपानंतर किंवा जनता सरकार गडगडल्यानंतर मुकुंदरावांनी जी संपादकीये लिहिली आहेत, ती म्हणजे त्यांच्या आशावादाचे सुन्दर नमुनेच आहेत !

या सर्व लेखनामध्ये पुरोगामी विचारसरणीचे सूत्र कोठेही सुटलेले नाही. त्यांच्या पहिल्या लेखातच याची झलक दिसते. ते म्हणतात, 'आम्हाला चरखा (मध्ययुगीन उत्पादन साधने) हवा की तातडीचे औद्योगीकरण हवे ? औद्योगिक अशांतता व इतर अंदाधुंदी हवी की उत्पादनाची पराकाष्ठा हवी ? जुने पुढारी, त्यांची इतिहासजमा विचारसरणी व तंत्रे हवीत की नव्या दृष्टीकोनाचे, नव्या जोमाचे पुढारी हवेत ? याचा आम्ही आज निर्णय घेतला पाहिजे.' (पृ. २) व्यापक समाजहित डोळ्यांसमोर ठेवून आधुनिकता, वैज्ञानिकता, बुद्धिवाद यांचा हिरिरीने केलेला पुरस्कार ही ह्या संग्रहाची एक फार मोठी जमेची बाजू आहे.

'साधी पणती देखील प्रकाश देऊ शकते' हा एक सुन्दर लेख या संग्रहात समाविष्ट केलेला आहे. त्यातील 'पणती'ची उपमा घेऊनच या संग्रहाचे वैशिष्ट्य नमूद करतो. आक्रमक आघातांचा किंवा शैलीदार भाषेचा झगमगाट या संग्रहात नाही; परंतु अवतीभोवतीच्या अंधारात स्थिर आणि प्रसन्न प्रकाश देणाऱ्या पणतीप्रमाणे हा विचारप्रधान व आशावादी लेखसंग्रह वाचकांचे लक्ष वेधल्याशिवाय रहात नाही.

—राजा दीक्षित

**पेरणी**
मुकुंदराव किर्लोस्कर
किर्लोस्कर प्रेस प्रकाशन
पृ : १८०, मूल्य : २० रु.

फिनिक्स निवड

# Hongkong

By Edmund Swinglehurst
Pages 96/May flower Book
Around Rs. 100/–
Coloured Photos
and information about the city.

आंतरराष्ट्रीय मान्यता मिळविणारी अनेक शहरे या जगात प्रसिद्ध आहेत. अनेकाची प्रवासवर्णने वाचूनच सामान्य माणूस त्यांकडे आकर्षिला जातो; पण जर त्याला त्या शहराची सचित्र माहिती मिळाली तर त्याचा आनंद द्विगुणित होतो.

हाँगकाँग हे प्रसिद्ध ब्रिटिश बेट आहे.त्याचे सचित्र पुस्तक आमच्या फिनिक्स वाचनालयात आहे. पुस्तक पाहताच या मोठ्या शहराची कल्पना येते. ते चित्ररूपाने प्रसिद्ध करण्याची कल्पनाही फारच उत्कृष्ट आहे. इंग्लंडमधील कलर्ड लायब्ररीने ते प्रकाशित केले आहे.

हाँगकाँग बेट केवळ ३३ चौरस मैल लांबीचे आहे; पण लोकवस्ती ५० लाख असून 'चोवीस तास जागे राहणारे शहर' म्हणून त्याची ख्याती आहे. प्रचंड आर्थिक उलाढाल ह्या ठिकाणी चालते.

व्हिक्टोरिया पीक: १८०८ फूट उंचीवरील या डोंगराळ प्रदेशाला निसर्गाने दोन्ही हातांनी सौंदर्य दिले आहे. १३०५ फुटांपर्यंत ट्रामवे असून बंदराचा श्वास रोखून धरणारा हा नजराणा भासतो. हा भाग प्रवाशाचे खास आकर्षण म्हणून ओळखला जातो.

औ बून हाँ (Aw Boon Haw) याने टायगर बाम (हा एक अत्यंत उत्कृष्ट 'दु:खदबाव' लेप आहे!) नावाचे औषध विकून अमाप पैसा मिळविला आणि त्याच नावाने ओळखली जाणारी 'टायगर बाम' गार्डन आहे. नैसर्गिक वनस्पती ओरिएंटल इमारती, त्यांची गुतागुतीची रचना यामुळे ते प्रवाशाचे आल्हाददायक आवडते ठिकाण म्हणून ओळखले जाते.

शहराचा जुना भाग म्हणजे 'वेस्ट पॉइंट'. असंख्य जाहिरातीच्या मागे लपलेली घरे, गोलाकार रस्ते असे वैशिष्ट्य असणारा हा भाग. तेथे आपणास पुरातन वस्तू निश्चित मिळतील.

पुस्तकातील काही पानावर व्हिक्टोरिया पीकच्या खालच्या भागातील इमारती सायंप्रकाशाने उजळून निघालेल्या दिसतात. शहराचे सौंदर्य व सुबत्ता मोठमोठ्या इमारती व मोठे लांबलचक रस्ते यामुळे वाढलेले लक्षात येते. प्रकाशाच्या झगमगाटात न्हाऊन निघालेले हे शहर पाहून इंद्रनगरी तर इथे अवतरली नाही ना, अशी शंका येते.

जागा थोडी व वस्ती जास्त. कितीही उंच इमारती असल्या तरी अपुऱ्याच पडतात. त्याचमुळे अनेक कुटुंबे होड्यांमध्ये राहताना दिसतात, हे या चित्रावरून लक्षात येते. खेळणी बनविणारे शहर असल्याने त्याचे दृश्य मन मोहून टाकते. हा फोटो 'व्हिक्टोरिया पीक'वरून घेतलेला आहे तो उत्कृष्ट ठरतोच.

क्रॉस हार्बर या जगातील मोठ्या बोगद्याचे चित्र नजर खिळून ठेवते. जाहिरातीचे दिवे अंधाऱ्या रात्री प्रकाशित करतात. त्या प्रकाशात वाहनांच्या खुणा जादूनगरीची आठवण करून देतात.

६०० पेक्षा जास्त चिनी देवळे एकट्या हाँगकाँगमध्ये आहेत कलात्मक वास्तूवरील नक्षी अप्रतिम आहेत. देवळातून बाहेर पडावे तर भूक शमविण्यासाठी पुढील पानावरील जेवणाचे सजवलेले टेबल पाहूनच मन तृप्त होते.

भाजीमार्केटमध्ये फेरफटका मारावा म्हणून ठरविले तर आपण पाहतो ती फळे खरी का चित्रातली आहेत, हे आपण स्वतःस जागे आहोत का अशी खात्री करून ठरवावे लागते. सय पाण्यावरील प्रतिबिंबित रेल्वेस्टेशनचे दृश्य वर्णन करण्यास शब्द कमी पडतात.

नाइट क्लब, हस्तीदंती कोरीव चित्रे ह्यास उत्कृष्ट म्हणणे म्हणजे कौतुक न करण्यासारखेच वाटते

वैशिष्ट्यात भर टाकणारी बोटीवर केवळ हॉटेल्स म्हणून गाजलेली तै पाकसारखी हॉटेल्स होत.

शेवटच्या पानावरून उत्कृष्ट आधुनिक पद्धतीची शेती लक्षात येते.

उद्योगधंद्याच्या दृष्टीने हाँगकाँग पाहतांनी आपल्या लक्षात येईल की, हाँगकाँगच्या रगारगातून, नसानसातून 'धंदा' ओसंडून वाहताना दिसून येतो. धंद्यासाठी, गिऱ्हाइकाला विनासायास आकर्षून घेण्यासाठी व्यवस्थितपणा, अत्यंत स्वच्छता, उत्तम रचना, मालकाच्या चेहऱ्यावरचा हास्यरस आणि भडक झगमगाटाचे बाह्यदर्शन पोषक कसे आहे ते यातील चित्रांवरून दिसून येते.

उदबत्ती पेटवून ७।८ वेळा डोळ्यासमोर फिरवून ती डोळ्यासमोरून काढली तरी तिची झगझगीत वलये काही सेकंद आपल्या डोळ्यांसमोर दिसत राहतात हा अनुभव, यातील बरीच चित्रे पाहून अनुभवता येतो.

आपणाकडे विजेच्या दरात झालेल्या भयानक वाढीमुळे दुकानदारांनासुद्धा वीजरोषणाईत काटकसर करावी लागत आहे, तर त्याउलट गणपतीत करतो त्यापेक्षाही कित्येक पटीने झगझगीत रोषणाई रोजच हाँगकाँगमध्ये पाहायला मिळते, याचा खऱ्या धंदेवाईक माणसाला खरोखरच हेवा वाटेल. त्यामुळे तो मनातून खिन्न होईल. जाऊ दे, भारतात राहून हाँगकाँग पहायचं म्हणजे सुखाचा जीव दुःखात घालायचा! त्यापेक्षा आहे हे ठीक आहे!

एकंदर अत्याधुनिकतेच्या जोडीला आपल्याकडल्यासारखे पक्ष्याला चिठ्ठी उचलायला लावून भविष्य सागणारे धंदेवाईक, रस्त्यात जिभवरून तलवारीचे पाते फिरवणे वगैरे कृत्ये करून पैसे मिळवणारे हलके धंदेवाईक पाहून विरोधाभास जाणवतो.

येथील रस्ते पाहिल्यास रस्त्यावर गाड्यांची गर्दी व जरा मान वर करून पहावे तर साइनबोर्डसूचे जंगलच जंगल दृष्टीस पडेल. दाटीवाटीने उभे केलेले ते रुक्ष सिमेंट–कॉंक्रिटचे ठोकळे विविध प्रकारच्या मल्यामोठ्या पाट्यांनी, साइनबोर्डसूनी नजरेआड केलेले दिसतात. आपल्याकडे इतके सुंदर साईनबोर्डस् अत्यंत क्वचितच दिसतात आणि एखाद्या दुकानदाराने सुंदर बोर्ड दुकानावर लावला तरी कधी कुठला मोर्चा येईल आणि त्या बोर्डाची वाट लावेल याचा

नेम नाही ! ( म्हणूनच आमचा फिनिक्सचा बोर्ड जुनाट ठेवला आहे ! )

एकंदरीत काय, तर येथील लोकानी जगाला मोहून टाकण्यासाठी उभारलेला हाँगकाँग हा 'मायामहाल'च आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

देवळातूनसुद्धा प्रवेशद्वारापासून मुख्य देवापर्यंत पोहोचेस्तोवर आजूबाजूचा थाटमाट आणि कलाकुसरीचे कामच मन इतकं आकर्षून घेतं की, देवापाशी ते एकचित्त व्हायला काही शिल्लकच राहत नाही ! त्या मानाने आपल्याकडील देवळे अत्यंत साधी व देवाचे श्रेष्ठत्व टिकवून ठेवणारी वाटतात. कृत्रिम प्रकारचं अवडंबर देवळात तरी आढळून येत नाही.

एकंदर एकामागोमाग एक पॅरेग्राफ असणारी पुस्तके वाचून कंटाळलेले डोळे Hongkong सारखी सचित्र पुस्तके पाहून सुखावतात. याचे लेखक श्री. एडमंड स्वीगलहर्स्ट यांचे असेच सचित्र Wonders of the World नावाचे पुस्तक परवाच लायब्ररीत घेतले आहे. त्यातील चित्रांच्या मानाने या पुस्तकातील चित्रे फारच भडक वाटतात; पण असू दे ! वीजदरवाढीमुळं आमच्या लायब्ररीचं बाह्यरूप झगमगटाचं नसलं तरी Hongkong सारखी ( प्रखर, किमतीची ) पुस्तके लायब्ररीचं अंत:स्वरूप उजळून टाकतात यात शंका नाही.

सारांश, लांबी-रुंदीने छोटे असूनही कर्तबगारीने महान, निसर्गाची देणगी लाभलेले असे हे शहर विनासायास पाहण्यास हे पुस्तक फारच उपयुक्त ठरेल.

–सौ. वनिता हर्डीकर

–सौ. माधवी मुकुंद गोखले

# रेसकोर्सच्या मैदानावर

शनिवार, तारीख एक ऑगस्ट ! पुण्यातलं रेसकोर्स मैदान. दुपारी दीड-पावणे दोनची वेळ. मर्सिडीज, इम्पाला, प्लायमाउथ, टोयाटो अशा उंची गाड्यांची वर्दळ. गाडीतून आधी सेंट–अत्तराचे भपकारे. त्यापाठोपाठ तऱ्हेतऱ्हेच्या वेषभूषा (आणि केशभूषा) केलेले स्त्री–पुरुष. प्रत्येकाच्या हातात अश्वशर्यतीची सविस्तर माहिती देणारी पुस्तकं. असंख्य माणसं हिंडत-फिरत, स्वत:च्याच मनाशी वेगवेगळे हिशेब जमवत, हातातल्या पुस्तकामध्ये खुणा आणि नोंदी करत असलेली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर चिंता, कुतूहल, उत्कंठा !

अनेक माणसं स्कूटर आणि सायकलीवरूनही येणारी. शर्यतीमध्ये सहभागी होण्याची त्यांची आर्थिक कुवत कदाचित कमी असेलही, पण उत्साह भरपूर. कुणास ठाऊक यांच्यापैकीच कुणाच्या तरी ललाटावर आजच्या दिवशी लक्षाधीश होण्याचं भाग्य लिहिलेलं असेल.

पुण्यातल्या रेस हंगामाचा आज पहिला दिवस. दुपारी बरोबर दोन वाजता पहिली शर्यत सुटणार होती. लाख रुपये किमतीचे घोडे पळणार होते. ते यशस्वी व्हावेत म्हणून अनेकांनी गाळलेला घाम आणि श्रम आज कारणी लागणार होते. कुणाचं नशीब फळफळणार होतं, कुणाचं दगा देणार होतं !

पहिली शर्यत हजार मिटरची. शर्यतीत धावणारे घोडे ट्रॅकवर आले. त्यांच्या पाठोपाठ त्यांचे मालक, ट्रेनर्स आणि हजारो प्रेक्षकांच्या नजरा. शर्यत जेमतेम मिनिटभरच चालली. पण तिने सर्वांना देहभान विसरायला लावलं. घोड्यांना पळवणाऱ्या जॉकींना जीव तोडून प्रोत्साहन देणं चाललं होतं. सारा गलका काही क्षणात संपला. जो जिंकणार होता त्याने जिंकलं होतं. काहींचे चेहरे फुलले, अनेकांचे पडले. पुन्हा पुढल्या शर्यतीची तयारी सुरु. घोड्यांच्या पाठीवर शेवटची थाप, जॉकींचा जामानिमा पूर्ण होत आलेला. पैसे लावणारे चिंता व उत्कंठेचं मिश्रण घेऊन पुन्हा रिंगणाला खेटून उभे.

आज अशा एकूण आठ शर्यती होणार होत्या. एकाहून एक देखणे घोडे आपण कशासाठी, कुणासाठी एवढे जीव तोडून पळत आहोत हे न समजताही पळणारे. घोड्याने शर्यत जिंकली की आपणच जिंकल्याच्या थाटात त्याचा लगाम धरून येणारे 'घोडेमालक'. प्रेक्षकांची वाहवा स्वीकारणारे रुबाबदार जॉकी. सगळ्या परिसरालाच एक गतिमानता आली होती.

त्यातून यंदा रेसकोर्सवर जागोजागी क्लोज्ड सर्किट रंगीत टी. व्ही. बसवलेले होते. त्यामुळे अनेकजणानी या टी. व्ही. भोवतीच गर्दी केली होती. ट्रॅकच्या कठड्यावर किंवा बाल्कनीमध्ये ओणवं होऊन डोळे फाडफाडून बघण्यापेक्षा हे निश्चितच जास्त सुखावह होतं.

रेस हा सर्वसामान्यांच्या जीवनाशी सर्वार्थाने अपरिचित असलेला खेळ असला तरी तो 'खेळ आहे' असं मानणाऱ्या शौकीनांचा एक समाज आहे. रेस खेळणारे फक्त श्रीमंतच असतात असं नाही. अगदी मध्यमवर्गीयही रेस खेळणारे असतात.

पळणारे घोडे आणि पैसे मात्र आपण मिळवणार, ही कल्पना मुळात तपासून पाहणं, रेस खेळणाऱ्यांना कधीच गरजेचं वाटत नाही. ग्रामीण भागात कोंबड्यांची झुंज लावतात तसाच हा प्रकार, जरासा सोफिस्टिकेटेड. भारताच्या प्रमुख शहरात खेळला जाणारा हा खेळ खेळण्यासाठी, आपलं नशीब अजमावण्यासाठी आणि पैसे मिळवण्यासाठी देशाच्या विविध भागांतून हौशी लोक येत असतात.

घोड्याचा उपयोग फक्त टांग्यासाठी होतो (आणि पूर्वी युद्धासाठी होत होता) ही मध्यमवर्गीयांची समजूत. पण रेस हा आता लोकप्रिय होऊ लागलेला खेळ आहे. त्यामुळे या खेळाकडे नुसतं खेळ म्हणून पाहता येणार नाही. मूठभर लोकांच्या समाधानासाठी खेळल्या जाणाऱ्या या खेळाला एक अंधारात असलेली ही बाजू आहे.

## व्यावहारिक मूल्य

खरं तर रेस म्हणजे नेमकं काय ? कुणाला ४०–५० लाख रुपये एका फटक्यात मिळाल्याचं वृत्तपत्रात येतं आणि वाचकाचं कुतूहल जागृत होतं. ही नुसती घोड्यांची शर्यत नसते. एक शास्त्रशुद्ध

नियमानुसार खेळला जाणारा, पण ज्याला व्यावहारिक मूल्य आहे असा हा खेळ.

पुण-मुबई व्यतिरिक्त तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश व प. बंगाल या राज्यातही हा खेळ खेळला जातो. त्यासाठी खास 'रेसकोर्स मैदाने' तयार होतात. त्या ठिकाणी माणसापेक्षा घोड्याचीच जास्त बडदास्त ठेवली जाते. शेवटी एक खरं, घोडा हे एक 'आर्थिक मूल्य' म्हणून इथं जोपासलं जातं. त्यामुळे घोड्याचा खरारा कारणारा माणूस कसा जगतो हे पाहण्यापेक्षा घोड्याला शिंक आली तर त्यामागे धावणारे डॉक्टर्स इथं दिसतील!

*या खेळाला पैसा, संयम आणि अभ्यास हवा. हा काही मटक्याचा* आकडा नाही, लागला तर नाही लागला! रेसमध्ये ठरवून अभ्यास करून जिंकणाऱ्या अनेक व्यक्ती आहेत.

रेसला जाण्यापूर्वी अभ्यास करायचा म्हणजे नेमकं काय करायचं याबाबत बरीच माहिती मिळाली

रेसमध्ये 'हॅंडीकॅपिंग सिस्टिम' म्हणून एक पद्धत आहे. *या पद्धतीचं मूळ उद्दिष्ट हे की, विशिष्ट रेसमधील प्रत्येक घोड्याला* जिंकण्याच्या दृष्टीन समतोल संधी देणं. उद्देश हा की, त्यांच्यात जास्तीत जास्त चुरस निर्माण व्हावी व प्रत्येक घोड्यानं जिंकण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा. याला अपवाद टर्मस् रेसेस. ठराविक वयाच्या घोड्यासाठी ठेवलेल्या या रेसमध्ये सर्व घोड्याना सारखो वजनं किंवा 'हॅन्डिकॅप' देऊन पळवलं जातं.

हॅन्डीकॅपिंग' सिस्टिममध्ये घोड्याचा *अगदी बारकाईनं अभ्यास* केला जातो. त्याचं वय, त्याचं जन्मस्थळ, त्याची परंपरा, त्याचं वजन– एक ना दोन–सर्व बाजूनो त्या घोड्याची छाननी केली जाते. (हे बिचाऱ्या त्या घोड्यालाच तेवढं कळत नाही!) ज्या अंतराची रेस आहे ते अंतर विशिष्ट घोड्याला मानवणारं आहे किंवा नाही? ह्यापूर्वी त्यानं जिंकलेल्या रेसमधील इतर घोडे आता कोणत्या क्लासमधून धावत आहेत? त्यांना ह्या घोड्यानं कशा पद्धतीनं हरवलं आहे? ते सध्या कोणत्या क्लासमधून धावताहेत, तो जिंकला असताना दुसऱ्या किंवा तिसऱ्या घोड्याच्या वजनात व ह्या घोड्याच्या वजनात किती फरक होता व ह्यानं त्या घोड्याचा किती लेंग्थनं पराभव केला आहे अथवा हा जेव्हा हरला तेव्हा तो का हरला? जिंकणारा घोडा व ह्या घोड्याच्या वजनात विचारात घेण्याजोगा फरक होता का? अंतर कमी किंवा जास्त पडलं किंवा जिंकणाऱ्या घोड्यानं ह्याचा पराभव करून वरच्या क्लासमध्येसुद्धा इतर चांगल्या घोड्याचा पराभव केला आहे का? इतक्या विविध बाजूनी एकेका घोड्याचा विचार रेस खेळणाऱ्यांना करावा लागतो!

रेसमधील पळणाऱ्या घोड्यांची पळण्याची पद्धती उच्च क्लासमधल्या घोड्याच्या पळण्याच्या पद्धतीशी मिळती-जुळती आहे का? मागून येऊन पुढं जाणारा घोडा किंवा रेकॉर्ड टाईमिंगच्या जास्तीत जास्त जवळचे टाईमिंग करून जिंकणारा घोडा ह्या घोड्याना उच्च श्रेणीतल्या घोड्याची बरोबरी करता येईल ना? अशा अनेक चिंता रेस खेळणाऱ्याच्या मनात सतत असतात. नेहमीच्या 'चिंता' विसरू पाहणाऱ्याना या चिंतांमधून आनद मिळतो हीही एक गंमतच आहे!

हे रेसमधले घोडे तरी कसे? रेसमध्ये पळणारा घोडा जास्तीत जास्त दहा वर्षांचा असू शकतो; पण घोड्याचा उमेदीचा काळ तीन ते सहा वर्षं एवढाच मानला जातो. या वयातच त्याची जास्तीत जास्त उन्नती होऊ शकते. तियेच त्याची श्रेणी ठरवतात. सहाव्या वर्षानंतर घोडा रेसच्या दृष्टीनं उतरणीला लागतो. अशा वेळी तीन ते चार वर्षांच्या उमद्या, *ताज्या दमाच्या तरुण घोड्यापुढं* त्याची शक्ती कमी पडण्याची शक्यता असते. घोड्याचं 'ट्रॅक' वर्क तयार करून घेण्यासाठी ट्रेनर सतत झटत असतात. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त अंतर काटता येण्यासाठी ही सारी धडपड!

आता एवढं होऊनही रेस खेळणारे लोक रेस हारतातच; पण जर शिस्तीत अभ्यास करून हा खेळ खेळला तर हारण्याची शक्यता फार कमी, *असं मत एका रेसतज्ज्ञानं व्यक्त केलं.* रेस हा *एक प्रकारचा* जुगारच नाही का? यावर हा तज्ज्ञ म्हणाला, 'कोणत्याही पद्धतीचा जुगार हा प्रथम खेळ असतो. त्यात जेव्हा संयम सुटतो तेव्हा त्याला आणि तो खेळणाऱ्या माणसाला जुगाऱ्याचं स्वरूप येतं; पण आपण पैसे कमावण्यासाठी नाही, तर याही खेळातील आनंद लुटावा म्हणून, त्यातून मिळणाऱ्या करमणुकीचा योग्य मोबदला देण्याच्या तयारीन *हा खेळ खेळलात तर आपलं जुगारी मन काबूत ठेवूनही त्या* खेळापासून आनंद आणि काही फायदाही मिळवू शकता; पण त्यातही तुम्ही नियम व संयम या दोन मर्यादा पाळल्याच पाहिजेत!'

आता रेस खेळणाऱ्यानं घोड्याचा एवढा सारा अभ्यास केल्यानंतर एखाद्या घोड्यावर पैसे लावायचे ठरवलं तर तो विविध प्रकारानी ते लावू शकतो उदाहरणार्थ– 'टोट' क्लबतर्फे स्वीकार*ण्यात येणारे बेटिंग व अधिकृत बुकीकडून स्वीकारण्यात येणारं* बेटिंग. 'टोट' वर कमीत कमी बेटिंग ५ रुपयांपासून सुरू होते तर बुकीकडे कमीत कमी ६० रुपयापासून सुरू होतं. या दोन्हीत फरक असा की, टोटवरील भाव हे बेटिंगच्या प्रमाणात कमी–जास्त होत असतात आणि बुकीकडे खेळताना जो भाव दिला जातो त्याच भावात त्याना पैसे द्यावे लागतात.

*रेसच्या या उत्पन्नापैकी १६ टक्के रक्कम सरकारला कररूपाने* द्यावी लागते. (म्हणजे *या खेळाची सरकारी मान्यता निश्चित* झाली!)

कित्येक वेळा जॉकीला (घोडेस्वार) घोडा मागे ठेवण्यासाठी पैसे पुरवले जातात. या दृष्टीनं या वर्षीपासून जॉकीला इतरांपासून दूर ठेवण्यात येणार आहे!

*पळणाऱ्या घोड्याची 'बडदास्त' उत्तम रीतीने ठेवता यावी यासाठी* पुण्यातल्या एम्प्रेस गार्डनच्या परिसरात काही खास तबेले आहेत. पण तेही अपुरे पडताहेत म्हणून या वर्षी रेसकोर्सच्या परिसरातही नवे तबेले बांधण्यात आले आहेत. घोड्यासाठी खास पोहण्याचे तलावही गेल्याच वर्षी बांधण्यात आले आहेत!

## असुरक्षित कर्मचारी

*एवढ्या लाखो रुपयांच्या व्यवहाराचा केंद्रबिंदू घोडा असतो* आणि माणसाला मात्र यात कुठच स्थान नसतं. साऱ्यांचं लक्ष घोड्यावर! *त्या घोड्याची बडदास्त ठेवणाऱ्या माणसाच्या जीवन*मानाबद्दल कुणी ब्रही काढायला तयार नसतो किंवा त्याना ते माहीत नसतं–माहीत करून घेण्याची इच्छाही नसते. चार घटका करमणूक करून घेणाऱ्या या माणसाना, माणसापेक्षा घोडा प्रिय असावा *यातलं मनुष्यत्व शोषणं केवळ अक्षम्य आहे!*

रेस खेळणाऱ्या क्लबला दरवर्षी २५ लाख रुपये परवाना फी भरावी लागते, तर घोड्याची सरासरी किंमत ७७ हजार रुपये असते (असे ५०० घोडे ४०० मालकांनी विकत घेतलेत !) आणि या घोड्यांना शिकविण्याची मासिक-फी ९८५ रुपये असते !

रेस हा जसा खेळ आहे तसाच तो शौकही आहे! रेसमध्ये पळणाऱ्या घोड्यांच्या मालकांना या शौकासाठी लाखो रुपये खर्च करावे लागतात ! अर्थात अशा रीतीनं लाखो रुपये खर्च करू शकणारे मालक श्रीमंत आहेत असं म्हणण्याचं धाडस कोण करणार ! एका घोड्यावर मालकाला दरवर्षी किमान २५,४०० रुपये खर्च करावे लागतात! सर्व मालकांना मिळून वर्षभरात मिळणारं एकूण उत्पन्न ९० लाख रुपयांच्या आसपासच आहे. यावरून या खेळाच्या 'आर्थिक क्षमते'ची कल्पना येऊ शकेल.

एवढा खर्च केल्यानंतर जॉकी आपले पैसे 'वाजवून' घेतो, तर ट्रेनरला पैसे न देऊन भागतच नाही! राहता राह्यलं कोण तर मोतद्दार, जमादार, नालबंद किंवा साधा नोकर ! आर्थिक ताणाचा सारा भार या नोकरवर्गावर पडतो आणि त्याच्या अडीअडचणीकडे मात्र दुर्लक्ष केलं जातं. रेसकोर्सवर घोड्याची निगा राखणारे असे एकूण ८४७ कर्मचारी आहेत आणि त्याना दैनंदिन अक्षरशः अनंत अडचणींना तोंड द्यावं लागतं. या कर्मचाऱ्यांचे धनी ट्रेनर असतात; पण त्याना आर्थिकदृष्ट्या सुस्थिती वा इतर सुविधा मिळण्याबाबत एकूण मारामारच आहे.

घोड्याला रोज खायला घालणं, त्याला खरारा करणं आणि घोड्यावर सातत्यानं लक्ष देणं हे काम करणारे मोतद्दार काय किंवा रोज घोड्याला ट्रॅकवर पळण्याची सवय करणारा रायडिंग बॉय काय, त्यांच्या कामाच्या वेळा कायदेशीरदृष्ट्या मर्यादित असल्या तरीही त्यांच्यावर कामाचा ताण बराच असतो. घोड्यानं 'खुट्ट' केलं तरी हा सारा नोकरवर्ग जागा होतो आणि डोळ्यांत तेल घालून त्या घोड्याकडे लक्ष देऊ लागतो. अशा वेळी त्याना स्वतःच्या जिवापेक्षा घोड्याचा जीव अधिक प्यारा असतो. कारण शेवटी त्याच्या आधारेच त्याना पोटाची खळगी भरायची असते !

रेससीझनमध्ये तर या लोकांचे हाल 'घोडा' खात नाही ! सतत लक्ष ठेवणे आणि घोड्याला रेसमध्ये पळण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींच्या पूर्तता करणं यातच त्यांचा दिवस जातो.

या जमादाराना साधारणतः महिना ४०० रुपये मिळतात, तर मोतद्दारांना ३५० रुपये मिळतात. त्यांच्या वेतनातील वाढही फक्त १५ रुपयांनी होत असते. जिथं रेस असेल तिथं यांना घोड्याबरोबर जावं लागतं आणि त्यासाठी त्यांना ८ रुपये एवढा भत्ता दिला जातो.

तबेल्यात काम करणाऱ्या या कर्मचाऱ्याची संख्या घोड्यांच्या संख्येवर अवलंबून असते. अर्थात त्याच्या नोकरीची हमी घेणार कोण? ही टांगती तलवार कधी पडेल याचा नेम नाही. या कर्मचाऱ्याचा धनी ट्रेनर, त्यामुळं बदलत्या ट्रेनरमागोमाग त्याना धावावं लागतं. ही अट त्याच्या स्थैर्याच्या दृष्टीनं मानवणारी नाही. पुणे-मुंबई रेससाठी हे कामगार एकच असल्यानं त्यांना या दोन केंद्रामध्ये फिरतं रहावं लागतं. त्यामुळं त्याना आपलं कुटुंब एका ठिकाणी ठेवणं अशक्य असतं. अर्थातच धन्याबरोबर कुटुंबाचीही फरफट होते ! प्रचंड किंमतीच्या घोड्यांवर लक्ष ठेवणाऱ्या या कर्मचाऱ्यांना वेळकाळाचं बंधन नसल्यानं त्यांना केव्हाही बोलावलं जातं. या सर्व कर्मचाऱ्यांना तबेल्याजवळच राहण्यासाठी जागा दिली जाते, पण ही सुविधा त्यांच्यासाठी नसून घोड्यावर लक्ष ठेवण्यासाठीची सोय असते. एकेका खोलीत ३-४ कुटुंबांना रहावं लागतं आणि तरीही त्याना इतर कोणत्याच सोयी उपलब्ध होत नाहीत ! या सगळ्यांचा परिणाम या कर्मचाऱ्यांच्या मुला-बाळावर होतो सततच्या फिरतीमुळं त्यांच्या मुलाकडे दुर्लक्ष होत, ते योग्य शिक्षणही घेऊ शकत नाहीत आणि त्यामुळं मोतद्दाराचा मुलगा मोतद्दार होण्यापलीकडे आपल्या जीवनाच्या कक्षा रुंदावू शकत नाही. जमादाराचा मुलगा पुन्हा जमादार होतो आणि हा खेळ पुन्हा पुढ सुरू होतो ! त्याच्याकडे लक्ष द्यायला त्याच्या वडिलाना वेळ नसतो आणि त्यांची विनाकारण फरफट होते.

गेली दोन शतकं भारतात रेस खेळली जात आहे, त्यामुळं सरकारला काहीही न करता वर्षाकाठी ४ ते ५ कोटी रुपयांचं उत्पन्न होतं आणि या खेळात कोट्यवधी रुपयाची उलाढाल होते. या सगळ्यांमागे ह्या तबेल्यातील कर्मचाऱ्याचे कष्ट फार मोठे आहेत; पण तिकडं लक्ष द्यायला वेळ कुणाला आहे ? त्यांच्याशिवाय घोडा रेसमध्ये पळूच शकणार नाही, ही 'साधी' गोष्टही कुणाच्या ध्यानी येऊ शकत नाही आणि म्हणूनच हे लोक गेली अनेक दशकं त्याच त्या अडचणींना केविलवाणेपणानं कसंबसं तोंड देताहेत. या कर्मचाऱ्यांच्या अनेक पिढ्या या संकटांना तोंड देत आल्या आहेत आणि तरीही त्यांचं भविष्य फारस आशादायक नाहीच !

इतर कोणत्याही कर्मचाऱ्यांपेक्षा या कर्मचाऱ्याच्या सेवेच्या अटी जास्त खडतर आहेत आणि तरीही त्याच्याकडे माणूस म्हणून पाहण्याची उपरती कुणालाच होत नाही ! मौल्यवान 'जीवा'ची ते काळजी घेतात, या सबबीखाली त्याच्या अटींचं समर्थन होऊ शकतं, पण खरं तर ते तोकडं असतं. एवढं असूनही हे कर्मचारी आपली जबाबदारी ओळखून वर्षानुवर्षं कोणत्याही प्रकारची कुरकुर न करता आपलं काम नेटानं पार पाडताहेत.

या कर्मचाऱ्याना कोणत्याही कायद्यानं संरक्षण मिळू शकत नसल्यानं ते असुरक्षित आहेत. त्यामुळं केवळ धन्याच्या 'मर्जी' वर राहणं यासाठी त्यांना साऱ्या जीवनाचीच 'कसरत' करावी लागते. ही कसरत आणि पर्यंत कुणालाही सोसणारी किंवा मानवणारी नाही; पण कोट्यवधी रुपयांच्या उलाढालीत या कसरतीला 'पै' एवढीही किंमत नाही, ही वस्तुस्थिती मात्र नाकारता येत नाही !

आज हे कर्मचारी एकत्र आलेत. त्यानी संघटना बांधलीय. ते आपल्या मागण्या किमानपक्षी मांडू शकताहेत. संघटना प्रयत्नशील असली तरी तिला अजून बरंच करायचं आहे !

—मुकुंद संगोराम

# चित्रपटाबाहेर

## खेळण्याचा अभिनय

प्रेम–मोहब्बत, रोमान्स व देहप्रदर्शन या तीन स्वनिर्मित मूल्यांची जोपासना करण्यास 'हिंदी सिनेमा' कोणत्या कल्पन्या व युक्त्या वापरेल हे एक तर देव जाणे, नाही तर या सिनेमांचे दिग्दर्शक!

आता या खेळाचंच बघा ना! प्रत्यक्ष पडद्यावर नायक–नायिकांचा जो प्रेमाचा लपंडाव चालू असतो व नायक–खलनायकाचे 'द्वंद्व' चालू असते तेसुद्धा आमच्या फिल्मी दिग्दर्शकांना अपुरे पडते आणि मग अफाट व अचाट अशा फिल्मी प्रसंगाच्या मालिकेत सर्व प्रकारची निपुणता असलेल्या फिल्मी हिरो-हिरोईनला (अभिनय सोडून) कुठल्या तरी खेळात चॅंपिअन दाखविले जाते.

कथेच्या ओघात वगैरे तात्विक मुद्दे नेहमीच गैरलागू असलेल्या चित्रपटात या 'चॅंपिअन' नायक–नायिकांचे दोन ठरीव प्रसंग ठरलेले असतात. एक तर संपूर्ण चित्रपटात एक-दोनदा हिरो-हिरॉईन टेनिस-रॅकेट घेऊन कॅमेऱ्यासमोर येतात अथवा ही रॅकेट दाखविण्याचे कष्टसुद्धा काही दिग्दर्शकांना सोसवत नाहीत तर डायरेक्ट एखादे पारितोषिक घेऊनच नायिका घरात प्रवेश करताना दाखविली जाते. अर्थात 'हिरॉइन'च्या वेषभूषेचा भाग बनलेल्या 'टेनिस-रॅकेट'चा मुख्य उद्देश 'हिंदी सिनेमाचे' 'देहप्रदर्शन' या मूल्यांची जोपासना करण्यासाठीच वापर केला जातो.

कधी कधी 'क्लायमॅक्स'साठीही या खेळाचा उपयोग केला जातो. या प्रसंगातूनच नायक-नायिकांचे वर्चस्व सिद्ध केले जाते. सुरुवातीस जिंकत असलेला खलनायक अंतिम प्रसंगातून कलाटणी देऊन हरवला जातो. 'गंगाजमना' चित्रपटात 'कबड्डी' खेळ चाललेला असतो. दिलीपकुमारच्या टीममधील सर्व खेळाडू एक एक करून बाद होतात आणि सरते शेवटी दिलीपकुमार सर्वांना बाद करून विजयी होतो आणि मग सर्वच चित्रपटात ठरून गेलेला प्रसंग ... या पद्धतीने जिंकलेल्या नायकाला त्याचे मित्रगण खाद्यावर घेतात. जयजयकार होतो. नायकाची दृष्टी कोपऱ्यात उभ्या असलेल्या नायिकेवर पडते! दोनाचे चार डोळे! त्यांची टक्कर! आणि मग प्रत्यक्ष प्रेमाची बात, रुसवे-फुगवे आणि 'दि एंड'.

खेळ खेळत असताना गाणं म्हणणं हे निदान निष्णात खेळाडूना तरी अशक्य आहे; पण इथे निष्णातांचे बाप बसल्यामुळे असल्या करामती दाखविणे 'बाये हाथ का खेल है।'

आणि मग अशा वेळी नाच-गाणी व *खेळांचे बेमालूम मिश्रण किंवा घुसळण करून* नायक – नायिकांच्या प्रेमाचा पाणउतारा केला जातो. 'हमजोली' चित्रपटात बॅडमिंटन खेळताना '*ढल गया दिन हो गयी शाम जाना है–जाने दो – – !*' असं गाणं गायलं जातं तर '*जीने की राह*'मध्ये जितेंद्र आणि तनुजा हे दोघेही आंधळी कोशिंबीर खेळताना राग, लय व ताल सर्वांचा चुथडा करून एक विचारतो 'मैं आऽऽऽऊं?' तर दुसरा 'आऽजाऽऽऽ' (गीत : आ मेरे हमजोली आ खेले आँख मिचौली आ)...

स्केटिंग करतानाही अनेकवार या गाण्याचा उपयोग केला जातो 'सीता और गीता'मध्ये संजीवकुमार–हेमामालिनी आपलं प्रेम सोसाट्याच्या वाऱ्यासारखं कसं पळतं हे दाखविण्यासाठी 'हवा के साथ साथ – – ओ साथी चल (इथे साथी समाजवादी नाही बरं का! प्रेक्षक मात्र तिथेच बसतो.) असं म्हणत स्केटिंग करतात, तर 'आ गले लग जा' व 'वह कौन थी'मध्ये हेच घडतं. 'शोख नजर की बिजलियाँ' या स्व. मदनमोहनने स्वरबद्ध केलेल्या गीताचा प्रत्यक्ष चुथडाच आपल्याला पाहायला मिळतो.

'लव मॅरेज' चित्रपटात देव आनंद तर क्रिकेटपटू दाखविला आहे; पण तो मुकाट्याने खेळ खेळेल असं नाही. एक तर नायक, त्यामुळे चौकार, षटकारांची आतषबाजी ओघानेच. मग नायिकेचा लाडिक दृष्टीक्षेपही ओघानेच आणि मग गाणं 'एक नजरमे दिल बेचारा हो गया एल. बी. डब्ल्यू.'

बॅडमिंटन, कब्बडी हे खेळ जितक्या सहजगत्या हिंदी चित्रपटांच्या पटकथेत प्रवेश करतात अगदी तितक्याच सहजतेने स्पर्धा दाखविल्या जातात.

मग चित्रपटाची कथा ग्रामीण असेल तर बैलगाडीची स्पर्धा दाखविली जाते (उदा: मदर इंडिया) व कथा शहरी आधुनिक असेल तर मोटारसायकलची स्पर्धा दाखविली जाते. (उदा. रॉकी) पण कथा जर 'संक्रमण' काळातील असेल तर पंचाईत; पण यातून बी. आर. चोप्रासारखा दिग्दर्शक शक्कल लढवितो आणि चक्क टांगा आणि बसची शर्यत लावतो. बस जिंकण्यातील अटळता विसरून नायक स्वार झालेला टांगा जिंकताना दाखविला जातो.

अर्थात मोटारगाड्यांची शर्यत प्रत्येक *मारधाडवाल्या चित्रपटात असते. काही वेळा* विमान, होड्या याची शर्यतही दाखविली जाते. नशीब अजूनपर्यंत तरी रेल्वे गाड्याची शर्यत दाखविली नाही मात्र रेल्वे आणि मोटारसायकलची शर्यत नेहमीच पाहायला मिळते. अशा शर्यतीचा शेवट म्हणजे योगायोग असतो आणि आपलं दुर्भाग्य.

परंतु एखादा प्रथितयश चॅंपिअन घेऊन त्यालाच चित्रपटातील स्पर्धेत विजयी होताना दाखविण्याचा अचाटपणाही हिंदी चित्रपटानी केला आहे. शुभा खोटे ही विनोदी अभिनेत्री याचच अपत्य आहे लागोपाठ चार वर्षे भारताची सायकल चॅंपिअन गणल्या गेलेल्या खोटेने खरीखुरी पारितोषिकं आपल्या चित्रपटाबाहेरच्या जीवनात मिळवली; पण तिलाही खोटं खोटं चित्रीकरण करून खोटं खोटं पारितोषिक देण्याचा चहाटळपणा या चित्रपटानी केला आहे.

शुभा खोटेप्रमाणेच अनेक खेळाडूना आपल्या खेळातील किमयेमुळे चित्रपटात प्रवेश मिळाला आहे. यातील सर्वात भन्नाट आणि पहिले उदाहरण म्हणजे जानकीदास. जागतिक सायकल चॅंपिअन स्पर्धेत महात्मा गांधीच्या सल्यानुसार १९४६ साली तिरंगा झेंडा घेऊन भाग घेणाऱ्या जानकीदासने 'खजांची' या चित्रपटात पहिल्यादा व शेवटचीच सायकल चालविली. पुढे त्यांना खलनायकाची चमचेगिरी करणाऱ्या इसमाच्याच भूमिका कराव्या लागल्या.

*जानकीदासप्रमाणेच खेळात नैपुण्य* दाखविल्यामुळे चित्रपटसृष्टीत प्रवेश केलेल्यामध्ये स्विमिंग चॅंपिअन नफीसा अली (जुनून) क्रिकेटपटू सलीम दुराणी (जरूरत) व

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)

सुनील गावसकर ( सावली प्रेमाची ) इत्यादींचा समावेश आहे. अर्थात अभिनयापेक्षा त्यांच्या प्रतिमेभोवती असलेल्या वलयामुळेच त्यांना हा प्रवेश सुकर झाला.

या खेळाशिवाय बॉक्सिंग हा प्रकार चित्रपटातून सातत्याने हाताळला जातो ('हाताळला' हा शब्द बराचसा सयुक्तिक दिसतो. हाताने खेळला जातो म्हणजेच हाताळला जातो अस असावं.) मारधाड या एकमेव उद्देशापायी 'बॉक्सिंग' होते. स्टंटपटांचा जमाना जसा पकड घेऊ लागला तसा रुस्तमे हिंद दारासिंगही चित्रपटात झळकला आणि दारासिंगच्या चित्रपटाचा रतीबच सुरू झाला. कथा ठरलेली होती. फक्त मारामारी आणि थोडंसं प्रेम, काहीशी गाणी इतकंच. असे शेकडो चित्रपट आले आणि गेले. त्यातील काही चाललेही; पण दारासिंगला चित्रपटाच्या नायकापेक्षा फ्रिस्टाईल कुस्तीनेच सुप्रसिद्ध केलं.

दारासिंगच्या आगमनानंतर एके काळी बेढब अंगाच्या पैलवान मंडळींनी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. शेळपट नायकाला काही क्षणात गारद करण्याची क्षमता असलेल्या पैलवानांचे सुरुवातीस काही चित्रपट आलेही; पण हाय, शेवटी फिल्मी कथेप्रमाणे नायकाचीच सरशी झाली. ही पैलवान मंडळी पड्याआड गेली जे राहिले त्यांना खलनायकाचे साथीदार म्हणून काम करावं लागलं व हिरोच्या हातून खरपूस मार खावा लागला. एका अर्थाने केवळ सुखांतिका सादर करणाऱ्या फिल्मी दुनियेने पैलवानीची शोकांतिका केली.

बॉक्सिंगशिवाय घोडे, पत्ते याचे शौकीन नायक, नायिका, खलनायक मंडळी या चित्रपटात वावरताना दिसतात. पण आपल्या खाजगी जीवनातही फिल्मी दुनियेतील ८० टक्के लोक घोडे, पत्ते आदी जुगारी खेळाच्या आहारी गेलेले आहेत. 'ताश के बावन पत्ते, बन जे छक्के सत्ते, सबके सब लूट गये' याच गाण्याच्या चालीवर फिल्मी दुनियेचा जुगार चालू असतो. तेव्हा जुगार म्हणजे त्यांच्या जीवनातील एक मायनॉर आयटेम असतो.

या जुगारी फिल्मी दुनियेतही खऱ्या अर्थाने आपलं खेळाविषयीचं प्रेम व्यक्त करणारे दोनच आदरणीय कलाकार म्हणजे दिलीपकुमार व हृषीकेश मुखर्जी. यातील दिलीपकुमार हा पूर्वी म्हणे फुटबॉलपटू होता; परंतु त्याची प्रतिमा मात्र क्रिकेटशौकीन म्हणून आहे. वेळ मिळेल तेव्हा दिलीपच्या खाजगी जीवनातील युसूफखान जागा होतो आणि गल्लीतल्या पोराबरोबर तो क्रिकेट खेळतो, तर हृषीकेश मुखर्जी चित्रीकरणाच्या वेळीच बुद्धिबळ खेळत असतात.

बुद्धिबळावरून एक गोष्ट लक्षात येते की, बुद्धी शाबूत ठेवून खेळाचा वापर व खेळाडूच्या जीवनाचा कानोसा घेणारा एकही चित्रपट आपल्याकडे नाही 'टू हाफ टाइम्स इन हेल' हा फुटबॉलच्या मैदानावर रंगलेला चित्रपट आपल्याकडे निघू शकत नाही. अपवाद फक्त 'शतरंज के खिलाडी'चा; पण 'शतरंज के खिलाडी'ची सर्वच गोष्ट सर्वस्वी वेगळी होती. सत्यजीत रे सारखा दिग्दर्शक व प्रेमचंदची भरपूर पार्श्वभूमी व आवाका असलेली कथा रे यांनी मर्मभेदक स्वरूपात मांडली.

'शतरंज के खिलाडी' वगळता सर्व काही 'खेल खेलमे'च चालू आहे मुळातच बाजारू हिशेब असलेला जुगारी खेळ चालू असल्याने, खेळी खेळण्यातला खेळकरपणा इथे अपेक्षितच नाही. स्पर्धेला नफ्याची प्रेरणा असल्यामुळे खेळाची धारणा नाही. आहे ते चक्क खेळीमिळीत स्वीकारावे किंवा नाकारावे. एवढाच पर्याय आहे.

—बिलंदर

## खऱ्या इतिहासाकडे.... मुखपृष्ठावरून

exhorting the youths of India to enlist in the Armed Forces. These enlisted youths themselves provide us with trained men and soldiers for our Indian National Army.' (25 June 1944) काँग्रेसमधील बहुतेक अदूरदर्शी पुढारी ब्रिटिश हिंदी सैन्यास केवळ भाडोत्री व पोटबाबू म्हणून सारखे निंदीत असता ही उत्साहदायी गोष्ट आहे की, वीर सावरकर निर्भयपणे हिंदी तरुणांना सशस्त्र सेनादलात शिरा म्हणून सारखे उत्तेजित आहेत. ब्रिटिश हिंदी सैन्यात शिरलेल्या ह्याच हिंदी तरूणांतून आज आमच्या हिंदी राष्ट्रीय सैन्याला, INAला प्रशिक्षित सैनिकांचा पुरवठा होत आहे.'— तेव्हा मार्क्सवाद्यांची केवळ आर्थिक उपपत्ती किंवा गांधीवाद्यांची केवळ नैतिक उपपत्ती इतिहासाच्या कसोटीवर टिकणारी नाही. जागतिक परिस्थितीपासून एखाद्या बाबू गेनूच्या आत्मबलिदानापर्यंत व साध्या सुतकताईपासून ते सावरकर-सुभाषाच्या सैनिकी उठावाच्या प्रयत्नापर्यंत अनेक घडामोडींचा, उद्रेकांचा, घटनांचा परिपाक म्हणजे आपले स्वातंत्र्य होय, हे आता ३४ वर्षानंतर तरी आपण ध्यानात घेतले पाहिजे व आपल्या स्वातंत्र्ययुद्धाचे एकांगी, केवळ गांधीप्रणीत दृष्टिकोनातून केलेले चित्रण टाळले पाहिजे. एकांगी गांधीप्रणीत दृष्टिकोनाचा प्रतिवाद मग एकांगी सावरकर-सुभाषप्रणीत दृष्टिकोनाने केला जातो व त्यामुळे इतिहासाची नाहक ओढाताण होते. आणि इतिहास ज्यांना जसा घडला तसा स्वीकारता येत नाही ते भविष्य तरी कसे घडवू शकणार ?

महाराष्ट्र शासनाने २०४ ठिकाणी हुतात्मांची स्मारके उभी करण्याचा निर्णय घेतला तो या दृष्टीने स्वागतार्ह आहे. खरा इतिहास यामुळे लोकांच्या डोळ्यासमोर येण्याची प्रक्रिया सुरू झाली तर हवीच आहे.

पण एखाद्या स्मारकाच्या उद्घाटनासाठी, एस. एम. जोशी किंवा तत्सम, प्रत्यक्ष स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेल्या एखाद्या व्यक्तीची निवड का न व्हावी ? □